# पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी - ४११ ०१८

## मा.महापालिका सभा

## कार्यपत्रिका क्रमांक - ५७

## सभावृत्तांत

दिनांक - १८.०३.२०१६ वेळ - दुपारी २.०० वाजता

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेची माहे मार्च-२०१६ ची मासिक मा. महापालिका सभा शुक्रवार दि.१८.०३.२०१६ रोजी दुपारी २.०० वा.महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील यशवंतराव चव्हाण सभागृहात आयोजित करणेत आली होती. सभेस खालील सन्मा.सदस्य उपस्थित होते.

१. मा.धराडे शकुंतला भाऊसाहेब - महापौर
२. मा.पौर्णिमा रविंद्र (आप्पा) सोनवणे
३. मा.म्हेत्रे सुरेश रंगनाथ
४. मा.भालेकर अरुणा दिलीप
५. मा.सौ.स्वाती प्रमोद साने
६. मा.साने दत्तात्रय बाबुराव (काका)
७. मा.थोरात वनिता एकनाथ
८. मा.सायकर अजय शंकरराव
९. मा.जाधव साधना रामदास
१०. मा.जाधव राहुल गुलाब
११. मा.आल्हाट मंदा उत्तम
१२. मा.आल्हाट धनंजय मुरलीधर
१३. मा.काळजे नितीन प्रताप
१४. मा.विनया प्रदिप (आबा) तापकीर
१५. मा.बाबर शारदा प्रकाश
१६. मा.बहिरवाडे नारायण सदाशिव
१७. मा.सौ.मंगलाताई अशोक कदम
१८. मा.उल्हास शेट्टी
१९. मा.ठोंबरे सुभद्रा ईश्वर
२०. मा.उबाळे सुलभा रामभाऊ

२१. मा.बो-हाडे शुभांगी संजय

२२. मा.मंगेश श्रीकृष्ण खांडेकर

२३. मा.(चिखले) मराठे अश्विनी अजित

२४. मा.भारती फरांदे

२५. मा.आर.एस.कुमार

२६. मा.जावेद रमजान शेख

२७. मा.चारुशीला प्रभाकर कुटे

२८. मा.भालेराव प्रतिभा ज्ञानेश्वर

२९. मा.पांढरकर निलेश शंकरराव

३०. मा.राजू मिसाळ

३१. मा.नंदा विकास ताकवणे

३२. मा.नेटके सुमन राजेंद्र

३३. मा.तरस बाळासाहेब जयवंत

३४. मा.भोंडवे संगिता राजेंद्र

३५. मा.मोरेश्वर महादू भोंडवे

३६. मा.भोईर भाऊसाहेब सोपानराव

३७. मा.सूर्यवंशी आशा ज्ञानेश्वर

३८. मा.लोंढे गणेश नारायण

३९. मा.शमीम पठाण (पठाणबाई)

४०. मा. ॲड.संदीप गुलाब चिंचवडे

४१. मा.अश्विनी गजानन चिंचवडे-पाटील

४२. मा.अपर्णा निलेश डोके

४३. मा.अनंत सुभाष को-हाळे

४४. मा.शितल उर्फ विजय गोरख शिंदे

४५. मा.जयश्री वसंत गावडे

४६. मा.प्रसाद शेट्टी

४७. मा.श्रीमती टेकवडे सुजाता अविनाश

४८. मा.काळभोर वैशाली जालिंदर

४९. मा.सौ.ठाकरे मंदाकिनी अर्जुन

५०. मा.मासुळकर समीर मोरेश्वर

५१. मा.वाबळे संजय मल्हारराव

५२. मा.मडिगेरी वर्षा विलास

५३. मा.सौ.गवळी सुनिता (माई) पांडुरंग

५४. मा.सुपे आशा रविंद्र

५५. मा.चंद्रकांत (भाऊ) साहेबराव वाळके

५६. मा.मोहिनीताई विलास लांडे

५७. मा.अजित दामोदर गव्हाणे

५८. मा.गोफणे अनुराधा देविदास

५९. मा.जालिंदर (बाप्पु) शिंदे

६०. मा.श्रध्दा बाजीराव लांडे

६१. मा. ॲड.नितीन ज्ञानेश्वर लांडगे

६२. मा.लोंढे शुभांगी संतोष

६३. मा.सावळे सिमा रविंद्र

६४. मा.सौ.बनसोडे शकुंतला काशिनाथ

६५. मा.भोसले राहूल हनुमंतराव

६६. मा.पालांडे सुजाता सुनिल

६७. मा.बहल योगेश मंगलसेन

६८. मा.सौ.पानसरे अमिना महंम्मद

६९. मा.कदम सदगुरु महादेव

७०. मा.गिता सुशील मंचरकर

७१. मा.कैलास महादेव कदम

७२. मा.छाया जगन्नाथ साबळे

७३. मा.पहलानी गुरुबक्ष किशनदास

७४. मा.टाक अरुण मदन

७५. मा.आसवाणी सविता धनराज

७६. मा.वाघेरे सुनिता राजेश

७७. मा.आसवानी हिरानंद उर्फ डब्बू किमतराम

७८. मा.उषा संजोग वाघेरे (पाटील)

७९. मा.ताम्हणकर प्रमोद रघुनाथ

८०. मा.पाडाळे निता विलास

८१. मा.विनोद जयवंत नढे

८२. मा.तापकीर अनिता मच्छिंद्र

८३. मा.कैलासभाऊ गबाजी थोपटे

८४. मा.विमलताई सुरेश जगताप

८५. मा.अप्पा उर्फ संपत ज्ञानोबा पवार

८६. मा.बारणे निलेश हिरामण

८७. मा.बारणे झामाबाई बाळासाहेब

८८. मा.बारणे माया संतोष

८९. मा.ओव्हाळ शेखर अशोक

९०. मा.यमुनाताई रमणनाना पवार

९१. मा.विनय उर्फ विनायक रमेश गायकवाड

९२. मा.चौंधे आरती सुरेश

९३. मा.बापू उर्फ शत्रुघ्न सिताराम काटे

९४. मा.बोकड रामदास गेणभाऊ

९५. मा.जवळकर वैशाली राहुल

९६. मा.जगताप राजेंद्र गणपत

९७. मा.शितोळे शैलजा बाबुराव

९८. मा.सौ.तनपुरे सुषमा राजेंद्र

९९. मा.अतुल अरविंद ऊर्फ नानासाहेब शितोळे

१००. मा.प्रशांत शितोळे

१०१. मा.ओव्हाळ रमा नितीन उर्फ सन्नी

१०२. मा.काटे रोहितअप्पा सुदाम

१०३. मा.गायकवाड संध्या सुरदास

१०४. मा.काटे राजेंद्र भिकनशेठ

१०५. मा.शेंडगे आशा सुखदेव

१०६. मा.मोटे किरण बाळासाहेब

१०७. मा.सोनकांबळे चंद्रकांता लक्ष्मण

१०८. मा.संजय केशवराव काटे

१०९. मा.धुमाळ बाबासाहेब निवृत्ती

११०. मा.गावडे हनुमंत बाळासाहेब

१११. मा.पाटील सुजित वसंत

११२. मा.लोखंडे गोरक्ष जाकाराम

याशिवाय मा.राजीव जाधव - आयुक्त, मा.उल्हास जगताप - नगरसचिव, मा.तळदेकर -मुख्यलेखापरिक्षक, मा.कांबळे - प्र.शहर अभियंता, मा.डॉ.अनिल रॉय - आरोग्य वैदयकीय अधिकारी, मा.ठाकुर - उपसंचालक नगररचना, मा.भोसले - मुख्यलेखापाल, मा.गावडे - सह आयुक्त, मा.पाटील, मा.चव्हाण, मा.तुपे - सह शहर अभियंता, मा.सुरगुडे - विकास अभियंता, मा.डोईफोडे, मा.गायकवाड, मा.माने, मा.खांडकेकर, मा.खोसे, मा.दंडवते, मा.कडूसकर, मा.दुरगुडे - सहा.आयुक्त, मा.पवार - कायदासल्लागार, मा.दुधेकर, मा.निकम, मा.कुलकर्णी, मा.बरशेट्टी, मा.कांबळे, मा.ओंभासे - कार्यकारी अभियंता, मा.वाघमारे - पीएमपीएमएल हे अधिकारी सभेस उपस्थित होते.

------

**मा.महापौर -** उपस्थित मा.नगरसेवक व मा.नगरसेविका, मा.आयुक्त, अधिकारी वर्ग, पत्रकार, नागरिक या सर्वांचे स्वागत करुन सभा कामकाजाला सुरुवात करणेत येत आहे.

१) पिंपरी चिंचवड महानगरपालिका हद्दीत राहणा-या व पिंपरी चिंचवड महानगरपालिका हद्दीतील खाजगी मान्यताप्राप्त विदयालयातील इ. १० वी १२ वी च्या विदयार्थ्यांना बक्षीस देणेबाबतचा मा.आयुक्त यांचा प्रस्ताव सभा कामकाजात दाखल करुन घेणेबाबत मा.आयुक्त यांची मागणी मतास टाकणेत आली असता -

अनुकूल - ८५ प्रतिकूल - ०

अशी मते पडली व सदरचा विषय सभा कामकाजात दाखल करुन घेणेत आला असल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

------

**मा.सुलभा उबाळे -** मा.महापौर साहेब, बळवंत शंकर काळभोर - निगडी खंडोबा ट्रस्टचे अध्यक्ष तानाजी काळभोर यांचे वडील, मिसाळ - चिंचवड स्टेशन येथील नागरीक यांचे दुःखद निधन झाल्याने त्यांना श्रध्दांजली अर्पण करणेत यावी अशी सूचना मी मांडते.

**मा.भारती फरांदे** - मा.महापौर साहेब, सूचनेस अनुमोदन देते.

**मा.महापौर** - श्रध्दांजली वाहणेसाठी सर्वांनी दोन मिनिटे स्तब्ध उभे रहावे.

(सर्वांनी दोन मिनिटे स्तब्ध उभे राहून श्रध्दांजली अर्पण केली)

**मा.भारती फरांदे -** मा.महापौर साहेब, विषय क्रमांक १ वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडते.

विषय क्रमांक -१

दिनांक - १८/३/२०१६ विभाग - मा.आयुक्त

संदर्भ :- १) मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.स्था/श.अ./तां/४/५१५/१५ दि.२८/१२/२०१५

२) मा.स्थायी समिती सभा ठ.क्र.१५१६६ दि.१७/०२/२०१६

पिंपरी चिंचवड महानगरपालिका हद्दीतील रस्त्यांमधून भुमिगत सेवा वाहिन्या टाकण्यासाठी मनपाकडे विविध शासकीय/निमशासकिय तसेच खाजगी संस्थेकडून रस्ता खोदाई परवानगीसाठी प्रकरणे वेळोवेळी सादर होत असतात. सदर सेवावाहिन्या नागरिकांच्या सोयीसाठी आवश्यक असल्याने महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम २३९ अन्वये सदर संस्थांना त्यांचेकडील भूमिगत सेवावाहिन्या टाकण्यासाठी रस्ता खोदाईस परवानगी महापालिकेमार्फत देण्यात येते. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम २४१(२) अन्वये संबंधित कंपनीकडून सदर खोदलेला रस्ता दुरुस्त करण्यासाठी जो खर्च येईल तो वसूल करावयाचा आहे. त्यासाठी सदर खोदलेले रस्ते दुरुस्तीसाठी मनपाने दर निश्चित केले असून सदर दर वेळोवेळी सुधारित करण्यात येतात. मनपाच्या सदर प्रचलित दरानुसार रस्ता दुरुस्तीपोटी येणारा खर्च संबंधित कंपनीकडून आगाऊ भरून घेण्यात येतो. सद्यस्थितीत सदर रस्ते दुरुस्ती शुल्कामध्ये रस्ता दुरुस्ती खर्च अंदाजे सरासरी रु.६५००/- व मनपा अधिभार सरासरी र.रु.३०००/- प्रती मी. दराप्रमाणे आकारण्यात येतो. त्यानुसार अद्याप पर्यंत सर्व खाजगी, शासकीय/निमशासकिय संस्थांना (महाराष्ट्र राज्य विज वितरण कंपनी मर्यादीत वगळून) त्यांच्या सेवावाहिन्या टाकण्यासाठी वरीलप्रमाणे शुल्क आकारुन रस्ता खोदण्यासाठी परवानगी देण्यात येत आहेत. खोदलेल्या रस्त्यामुळे वाहतुकीस होणारा अडथळा व त्यामुळे होणारे अपघात टाळण्याच्या दृष्टीकोनातून तसेच नागरिकांच्या सुरक्षित वाहतूकीसाठी मनपास रितसर निविदा प्रक्रिया करुन, सदर खोदलेल्या रस्त्यांची दुरुस्ती तातडीने करावी लागते. त्यासाठी महापालिकेकडून भुमिगत सेवावाहिन्या टाकणाऱ्या संस्थेंकडून रस्ता दुरुस्तीचा प्रचलित दरानुसार येणारा खर्च आगाऊ स्वरूपात वसूल करण्यात येतो.

**<u>महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्या. यांचेकडील मागणीः-</u>**

म.रा.वि.वि.कं.मर्या., यांच्याकडील पायाभुत आराखडा - २ अंतर्गत भुमिगत केबल टाकणेसाठी मा.आयुक्त यांच्याकडील दि.१०/०२/२०१५ चे मान्य प्रस्तावानुसार व आदेश क्र.स्थापत्य/शअ/तां/४/५९/२०१५, दि.१०/०२/२०१५ अन्वये र.रु.२३००/- प्रती रनिंग मीटर प्रमाणे

(एकत्रित रस्ता दुरुस्ती खर्च व मनपा अधिभार) याप्रमाणे सवलतीच्या दराने शुल्क आकारुन रस्ता खोदाईस परवानगी देण्यात येत आहे. दि. १४/०९/२०१५ व दि.१६/१०/२०१५ च्या पत्रांन्वये म.रा.वि.वि.कं.मर्या., यांनी महापालिका हद्दीमध्ये यांच्याकडील पायाभुत आराखडा - २ अंतर्गत भुमिगत केबल टाकण्यासाठी व दुरुस्तीसाठी रस्ता खोदाई करण्यास विनाशुल्क परवानगी देणेबाबत मागणी केलेली आहे.

**<u>महाराष्ट्र नॅचरल गॅस लि.व भारत संचार निगम लि.यांचेकडील मागणीः-</u>**

तसेच, महानगरपालिकेकडील दर जास्त असल्याने रस्ते दुरुस्तीचे दर कमी करुन पुणे महानगरपालिकेकडील सदर कामासाठीच्या दराप्रमाणे शुल्क आकारुन रस्ता खोदाईस परवानगी मिळणेबाबत महाराष्ट्र नॅचरल गॅस लि. यांनी त्यांचेकडील दि. २०/०७/२०१५ व दि.०६/१०/२०१५ च्या पत्रांन्वये विनंती केलेली आहे. त्याचप्रमाणे भारत संचार निगम लि. यांनी त्यांचेकडील दि. ०१/०७/२०१५ व दि.१९/११/२०१५ च्या पत्रांन्वये रस्ते खोदाईस परवानगीसाठी महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्या. यांना देण्यात येणा-या दरातील सवलतीनुसार रस्ते खोदाईस परवानगी मिळणेबाबत तसेच महानगर पालिकेच्या विकास कामातील रस्ता सुधारणांमुळे पुर्वी टाकलेल्या केबल तुटल्यामुळे सदर केबल दुरुस्तीसाठी विनाशुल्क रस्ता खोदाईस परवानगी मिळणेबाबत विनंती केलेली आहे. पिंपरी चिंचवड महानगरपालिका क्षेत्रातील सर्व मुख्य व अतंर्गत रस्त्यांवरील उपस्कर विद्युत वाहिन्यांद्वारे महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्या. यांचे मार्फत शहरातील नागरिकांना विद्युत पुरवठा केला जातो. शहर सौंदर्यीकरण व अपघात टाळण्याच्या दृष्टीने सदर उपस्कर विद्युत वाहिन्या भुमिगत करणे आवश्यक आहे. महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्या. यांचे मार्फत बहुतांश मुख्य रस्त्यांवरील सदर उपस्कर विद्युत वाहिन्या भुमिगत करण्यात आलेल्या असून उर्वरीत ठिकाणांचे कामकाज करणे बाकी आहे. तसेच, घरगुती स्वयंपाक व इतर वापरासाठी तसेच, शहरातील वाढत असलेल्या मोठ्या प्रमाणातील प्रदुषण रोखण्यासाठी चार चाकी वाहनांसाठी नैसर्गिक वायूचा वापर करण्याचा केंद्र शासनाने महत्वाकांक्षी उपक्रम हाती घेतलेला आहे. त्याचप्रमाणे, शहरी भागात सी.एन.जी. चा वापर वाढवून घरगुती वापरातील एल.पी.जी. सिलेंडर ग्रामिण भागासाठी जास्तीत जास्त प्रमाणात उपलब्ध करून देण्याचे उद्दीष्ट केंद्र शासनाने निश्चित केलेले आहे. नैसर्गिक वायू ( सी.एन.जी.) हा एल.पी.जी. पेक्षा सुरक्षीत व स्वस्त असल्याने व २४ तास अखंडीत पुरवठ्याची शास्वती असल्याने शहरातील नागरिकांसाठी त्याचा उपयोग होणार आहे. शहरात अशा प्रकारच्या नैसर्गिक वायूचे ( सी.एन.जी.) भुमिगत पाईपलाईन टाकण्याचे व पुरवठा करण्याचे कामकाज महाराष्ट्र नॅचरल गॅस लि. यांचे मार्फत चालू आहे. तसेच शहरातील नागरिकांसाठी आवश्यक असलेले दळणवळणातील एक मुख्य साधन, दूरध्वनी व भ्रमणध्वनी तसेच इंटरनेटची सुविधा केंद्र शासनाचा उपक्रम असलेली भारत संचार निगम लि.

यासंस्थेमार्फत  पुरविली जाते. तसेच, संरक्षण विभागासारख्या अती महत्वाच्या विभागासाठी देखील सदर संस्थेमार्फत सुविधा पुरविली जाते वरील तीनही संस्थेंच्या त्याचप्रमाणे केंद्र शासन, राज्य शासन यांच्या व त्यांच्या अंगीकृत संस्था तसेच इतर निमशासकिय संस्थेंच्या भुमिगत सेवावाहिन्या शहरातील नागरिकांसाठी उपयुक्त असल्याने त्यासाठी महानगरपालिकेचे देखील योगदान असणे आवश्यक वाटते. त्यासाठी सदर तीनही संस्थेंच्या भुमिगत सेवावाहिन्या टाकण्यासाठी त्यांना आवश्यक असणा-या रस्ता खोदाई परवानगीसाठी महापालिकेमार्फत आकारण्यात येणारे शुल्कात सवलत देणे आवश्यक वाटते.  केंद्र शासन, महाराष्ट्र शासन, एम.एन.जी.एल. व शासनाच्या इतर अंगीकृत संस्था यांना पुणे महानगरपालिका हद्दीत भूमिगत केबल टाकणेसाठी पुणे मनपाचे मान्य रस्ते खोदाई शुल्कामध्ये चालू दराच्या ५०% सवलत देणेस व एम.एस.ई.डी.सी.एल (एम.एस.ई.बी.) यांना र.रु.२३५०/- या दराने रस्ते खोदाई शुल्क त्यांचेकडील कार्यालयीन परिपत्रक क्र. पथ १९९३, दि.१०/०७/२०१५ अन्वये आकारण्यात येत आहेत. सद्यस्थितीत, पिंपरी चिंचवड महानगरपालिकेमार्फत भुमिगत सेवा वाहिन्या टाकण्यासाठी सर्व शासकिय / निमशासकिय व खाजगी संस्थांकडून प्रचलित दरानुसार शुल्क आकारून रस्ता खोदाईस परवानगी देणेत येत आहे. तथापि, वरील प्रमाणे नमुद केलेनुसार सर्व शासकिय/निमशासकिय संस्थेंच्या सेवा वाहिन्या शहरातील नागरिकांसाठी उपयुक्त असल्याने व त्यासाठी महानगरपालिकेचे देखील योगदान आवश्यक असल्याने, पुणे महानगरपालिकेच्या वरील प्रमाणे धोरणानुसार, पिंपरी चिंचवड महानगरपालिका कार्यक्षेत्रात केंद्र शासन, महाराष्ट्र शासन, महाराष्ट्र नॅचरल गॅस लि. व शासनाच्या इतर अंगीकृत संस्था, निमशासकिय संस्था यांना भूमिगत सेवा वाहिन्या टाकणेसाठी पिंपरी चिंचवड मनपाचे प्रचलित रस्ते खोदाई दुरूस्ती शुल्कामध्ये चालू दराच्या ५०% सवलत देणेस ( मनपा अधिभार न घेता ) व **महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्या. यांना र.रु.२३५०/- या दराने रस्ते खोदाई शुल्क आकारून रस्ता खोदाईस परवानगी देणेबाबत,** तसेच, सदर शासन अंगीकृत कंपन्यांच्या सेवा वाहिन्या नादुरूस्त झाल्यास त्यांची दुरूस्ती तातडीने होणे आवश्यक असल्याने, सदर शासन अंगीकृत कंपन्यांच्या ५ मी. पर्यंत लांबीच्या सेवा वाहिन्या दुरूस्तीसाठी विनाशुल्क व ५ मी. पेक्षा जास्त लांबीच्या सेवा वाहिन्या दुरूस्तीसाठी वरील प्रमाणे शुल्क आकारून रस्ता खोदाईस परवानगी देणेबाबतचे धोरण निश्चित करणेसाठी मा. महापालिका सभेची मान्यता घेणे आवश्यक आहे. पुणे महानगरपालिकेच्या वरील प्रमाणे धोरणानुसार, पिंपरी चिंचवड महानगरपालिका कार्यक्षेत्रात केंद्र शासन, महाराष्ट्र शासन, महाराष्ट्र नॅचरल गॅस लि. व शासनाच्या इतर अंगीकृत संस्था यांना भूमिगत सेवा वाहिन्या टाकणेसाठी पिंपरी चिंचवड मनपाचे वेळोवेळी वापरात असलेल्या प्रचलित रस्ते खोदाई दुरूस्ती शुल्कामध्ये चालू दराच्या ५०% सवलत देणेस ( मनपा अधिभार न घेता ) व **महाराष्ट्र राज्य विद्युत  वितरण कंपनी मर्या. यांना र.रु. २३५०/- या दराने रस्ते**

**खोदाई शुल्क आकारून रस्ता खोदाईस परवानगी देणेबाबत,** तसेच, सदर शासन अंगीकृत कंपन्यांच्या सेवा वाहिन्या नादुरूस्त झाल्यास त्यांची दुरूस्ती तातडीने होणे आवश्यक असल्याने, सदर शासन अंगीकृत कंपन्यांच्या ५ मी. पर्यंत लांबीच्या सेवा वाहिन्या दुरूस्तीसाठी विनाशुल्क व ५ मी. पेक्षा जास्त लांबीच्या सेवा वाहिन्या दुरूस्तीसाठी वरील प्रमाणे शुल्क आकारून रस्ता खोदाईस परवानगी देणेबाबतचे धोरण निश्चित करणेची मा.आयुक्त यांची मागणी असली तरी सदर विषय दप्तरी दाखल करणेत येत आहे.

**मा.प्रतिभा भालेराव -** मा.महापौर साहेब, ठरावास अनुमोदन देते.

**मा.प्रशांत शितोळे -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. या विषयाबाबत प्रशासन आणि नगरसेवक अतीशय व्दिधा मनस्थितीत आहेत. याचे कारण असे आहे की संपुर्ण शहरात सगळीकडे खोदाई काम चालू आहे. एमएनजीएल, एमएसईबी त्यांचा महापालिकेशी तसा काही संबंध नाही, अडचण काय आहे की प्रत्येक ठिकाणी, काही ठिकाणी तर अशी परिस्थिती आहे की एकाच बाजूला एमएनजीएल आणि एकाच बाजुला एमएसईबी आहे. दोघांचीही लाईन शेजारी आलेली आहे, भविष्यातील धोक्याची जबाबदारी ते घेणार नाहीत. हे सगळीकडे नाही काही ठिकाणी आहे. याच्या व्यतिरीक्त माझ्या माहीती प्रमाणे हा ईश्यू जो आहे तो गेल्या अनेक वर्षापासूनचा पेन्डीग विषय आहे. महापालिकेनी त्यांच्याकडून पैसे भरुन घेत असतील तर अतीशय चांगली गोष्ट आहे. दुसरी गोष्ट जर आपल्याला फ्रि करुन दयायचे तर शासनाने आपल्याला आदेश दयावेत, महापालिकेचे नुकसान व्हावे अशा मताचे कुठलेही नगरसेवक असतील असं मला तरी वाटत नाही. इलेक्शन आमच्या डोळयासमोर आहे. इलेक्शन डोळयासमोर असताना तुम्ही विकास काम आताच एक वर्षे अगोदर काढलय का, तुम्हांला रस्ता केल्यावरच खोदाईला सुचतोय का. तुम्ही मुद्दाम रस्ते खराब करत चाललेला आहात अशाप्रकारे वाईट हेतूने नगरसेवकांकडे बघण्याचे काम चालू आहे. या कंपन्याना अनेक खाजगी लोक सुध्दा त्रास देतात. या लोकांना स्थानिक गल्ली-बोळात अनेक लोक त्रास देतात हे बरेच जण अनुभवतात. स्थायी समितीमध्ये प्रस्ताव ठेवला होता त्याठिकाणी स्थायी समितीने असा निर्णय का घेतला याच्यावर सुध्दा आम्हांला विचार करण्याची गरज आहे. पण तुमच म्हणण नेमक काय आहे. शहरामध्ये किती कि.मी.साठी परवानगी दिलेली आहे. किती कि.मी. रस्ते खोदून झाले आणि जर हा प्रस्ताव दप्तरी दाखल केलातर तुम्ही हे काम असच जैसे थे सोडून दयायला लावणार का. जे खोदाई केलेले रस्ते आहेत ते रस्ते दुरुस्त कोण करणार. बीव्हीजी कडे खोदाईच बरेचसे काम आहेत. खोदून केबल पण टाकल्या नाहीत आहे तसच टाकून पळून गेला आहे याची जबाबदारी कोण घेणार. आज एमएनजीएलच ठिक आहे. एमएनजीएलना प्रत्येक घरामध्ये जायच आहे. एमएसईबीच काम हे ट्रान्फॉर्मर पर्यंतच असतं. एमएनजीएलना प्रत्येक घरामध्ये जावून कनेक्शन दयायचे आहे त्यांना कुठही पकडता येईल तुम्ही हे केबलच काम जर केल नाहीतर आपल्या शहरात भूमीगत वाहीन्या या ६० ते ७०

टक्के झाल्या, काही ठिकाणी राहीलेल्या आहेत. एमएसईबीने तुम्हांला ईम्फ्राच्या माध्यमातून कोटयावधी रुपयाची काम दिलेली आहेत. मा.ना.अजीतदादा पवार ऊर्जामंत्री असताना या शहराला शेकडो कोटीची काम त्यांनी ईम्फ्राच्या माध्यमातून दिली आणि त्यातून हे अंडरग्राऊंड केबलचे काम चालू आहे परंतु त्यांना कुठेही खंड होऊ नये आणि आपल्या महानगरपालिकेच कुठेही नुकसान होऊ नये अशा पध्दतीचा निर्णय येथे घ्यावा लागेल. पण मा.महापौर साहेब, प्रशासनाकडून खोदाई केलेल्या आणि जिथ फक्त खोदाई केली केबल टाकली नाही, डक्टींग टाकलेली नाही त्याचा खर्च कोण करणार, ते काम तातडीने कोण दुरुस्ती करणार याचे स्पष्टीकरण व्हावे जेणेकरुन निर्णय घेणे सोपे जाईल, धन्यवाद.

**मा.राजेंद्र जगताप -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह या विषयावर आपल्या प्रभागाच्या मिटींगमध्ये सुध्दा बरीचशी चर्चा झालेली आहे. ड प्रभागाचे सर्व अधिकारी होते. बीव्हीजी कंपनीने आपल्या सांगवी, पिंपळेगुरव परिसरामध्ये जी केबल लाईन टाकण्याचे काम करतात, आतापर्यंत एमएसईबी आणि बीव्हीजी कंपनी यांच्यात विचार होतात पण महापालिकेच्या स्थापत्य विभागाला विचारले जात नाही त्यानी पैसे भरले का नाही याचा खुलासा व्हावा. कारण पैसे न भरता स्थानिक नगरसेवकाना विचारायला पाहीजे. स्थापत्य विभागाला विचारल पाहीजे. नको तिथ वाकडी-तीकडी लाईन खोदतात. एमएसईबीला प्रभागाच्या मिटींगमध्ये अधिका-यांना मी विचारले अशी खाली खोदाई किती करता आणि त्यात केबल टाकता तर त्यांनी मला सांगीतले चार फुटाच्या खाली खोदकाम करतो. त्याच्यामध्ये पहील्या टप्प्यात एक थर वाळूचा दयावा लागतो त्याच्या वर केबल ठेवली जाते त्याच्यावर पाईपचे अर्धे टुकडे ठेवावे लागतात व त्याच्यावर विट ठेवायची आणि त्याच्यानंतर भर टाकायची. अशा पध्दतीने त्यांच्या कामाची पध्दत टेंडरमध्ये आहे असं त्यांनी कबुल केल आहे. आपल्या परिसरामध्ये जे काम चाललेल आहे त्याठिकाणी असे काम होत नाही. दोन ते आडीच फुट खोदाई करतात आणि माती ढकलून देतात असे चाललेले आहे. मागच्या आठवडयात चांगले डांबरीकरण केलेले रस्ते आपल्या स्थापत्य विभागाला न सांगता खोदाई केलेली आहे आणि तेथून केबल टाकली गेली. दोन ते आडीच फुटावर केबल टाकत असताना मातीचे काम करतात नागरीकांना त्याचा त्रास होतो कारण माणुस ज्यावेळेस पडतो त्यावेळेस ते खाली खचल जातं आणि ती केबल वर येते एखादयाची त्याठिकाणी मानसीक हानी झालीतर आपण काय करणार. अशा पध्दतीने कामकाज चाललेले आहे. म्हणून बीव्हीजी कंपनी विरोधात स्थापत्य विभागाने कम्प्लेन्ट दिलेली आहे त्यांना अटक सुध्दा झालेली होती, परंतु असे काम चाललेतर महापालिकेच नुकसान होत. त्यांनी प्रोसीजर प्रमाणे काम केले पाहीजे. सदस्यांनी स्थापत्य विभागाचे अधिकारी त्यांच्याशी बोलले पाहीजे. त्यांनी पहिल कुठ काम करायचे हे सदस्यांना विचारले पाहीजे. डायरेक्ट ते ज्याठिकाणी पाहीजे त्याठिकाणी काम करतात. काम होवून गेलतरी तेथील राडारोडा सुध्दा उचलला जात नाही त्यामुळे नागरीकांना नाहक त्रास होतो

अनेक प्रश्न त्यांच्यामुळे वाढलेले आहेत. आता आपण डांबरीकरण केले दुस-या दिवशी खोदाई केलीतर तो रोड त्या लेव्हलला येतो का याचीही पाहणी केली पाहीजे. बीव्हीजी, एमएसईबी यांच्याकडून उडवाउडवीची उत्तर आम्हांला मिळाले. महापालिकेच्या अधिका-याना त्यांनी विश्वासात घेतले पाहीजे आणि त्यांनी त्यांचे काम केले पाहीजे. २५ टक्के काम झालेले आहे. पिंपरी चिंचवड शहरामध्ये ९८ कोटीचे काम आहे आणि त्यात २५ टक्के काम झालेले आहे त्यांनी आपल्याला खोदाई कामाचे पैसे भरलेले आहेत का नाहीत याचा खुलासा पाहीजे. त्यांच्या कामाची पध्दत बघीतलीतर आपल्या स्ट्रिट लाईटची केबल सरळ गेलेली आहे यांची आडवी-तीडवी जसे पाहीजे तसे खोदकाम करतात आणि जसं पाहीजे तसं ते काम करुन घेतात. आपले त्यांच्यावर नियंत्रण पाहीजे आणि विचारलेनंतर काम केले पाहीजे.

**मा.कैलासभाऊ थोपटे -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. आता प्रशांत शितोळे आणि राजेंद्र जगताप यांनी विषय मांडलेला आहे. आपल्या परिसरामध्ये एमएसईबीचे काम चाललेले आहे ते काम होणे गरजेचे आहे. ते काम आपण पिंपरी चिंचवड महापालिका अंडरग्राऊंडचे काम करत होतो. २०१० पासून ते धोरण बदलले त्यानंतर मा.बंड साहेब असताना एमएसईबीने हे काम करावे असे धोरण ठरलेले आहे. आज बघीतलेतर प्रभागामध्ये एका एका एमएसईबीच्या खांबावर पन्नास पन्नास कनेक्शन आहेत. त्याठिकाणी संपुर्णपणे जाळ झालेले आहे. आयुक्त साहेबांना मी अनेकवेळा विनंती केलेली आहे. एमएसईबीच्या अधिका-यांना विनंती केलेली आहे की हे काम होणे गरजेचे आहे. याच्यावर काहीतरी धोरण ठरले पाहीजे. महाराष्ट्र शासनाने धोरण ठरविले पाहीजे. प्रभागामध्ये अनेकवेळा चर्चा झालेली आहे त्याठिकाणी त्या चर्चेतून असे ठरले होते की २३००/- रु. मी. ने त्यांच्याकडून पैसे घ्यायचे आणि त्यांना परवानगी दयायची याच्यावर शासनाने निर्णय घेतला का नाही. आज काही ठिकाणी काम बंद केलेले आहे. प्रभागामध्ये चर्चा झाली त्याच्यानंतर बीव्हीजीचे अधिकारी आलेले होते त्यांनी काम बंद केलेले आहे. काही ठिकाणी खोदाई केलेली, केबल गाडून ठेवलेली आहे काही ठिकाणी काहीच काम झाले नाही. मग आपण जर हे काम बंद केल्यास शहराचा बकालपणा आहे तो तसाच राहून जाणार आहे. अनेकवेळा एमएसईबीच्या सर्व एक्झिक्यूटीव्ह इंजिनीअरला घेवून गेलो याच्यावर काहीतरी निर्णय घ्यावा म्हणून सांगीतले आहे असे खांब झालेले आहेत की ते कधी गळून पडतील हेही सांगता येत नाही. ते पडल्यानंतर त्याठिकाणी धोकाही निर्माण होण्याची शक्यता आहे. हे काम होणे खुप गरजेचे आहे. याच्याकरिता शासनाचे काय असेल त्याच्यावर धोरण ठरवावे, धोरण ठरवून याच्यावर रोड कटींगचे काय पैसे घ्यायचे असतील ते घ्यावेत आणि ही काम झाली पाहीजेत. एमएनजीएलने पाईप टाकलेले आहेत त्यांच्याही कामाचा दर्जा खराब आहे. काळेवाडी फाटयावर एक दिवस ट्रायल घेत असताना ती लाईन जोडलेली नसताना त्याच्यामध्ये पाणी सोडून ट्रायल घेत होते. त्याठिकाणी एवढा मोठा स्फोट झाला की असे वाटले या परिसरामध्ये कुठेतरी बॉम्बस्फोटच झाला.

एमएनजीएलवाल्यांना सुध्दा तुम्ही वॉर्निंग दयावी. काम करताना चांगल्या दर्जाचे काम झाले पाहीजेत. मा.आयुक्त साहेबांना, सिटी इंजिनीअर यांना मी पत्र सुध्दा दिलेले होते. त्याठिकाणी दहा ते बारा फुटाचा रस्ता आहे. त्याठिकाणी एमएनजीएलची लाईन टाकतात. पहीलीच त्याठिकाणी एचटी लाईन गेलेली आहे, ड्रेनेजची लाईन गेलेली आहे, वॉटरची लाईन गेलेली आहे, आशा दहा-बारा फुटामध्ये एवढया लाईन पडत असतीलतर त्याठिकाणी का धोका होणार नाही. मग धोका झाल्यावरती आपण त्यावरती विचार करणार आहेत का. त्याच्यावर धोरण ठरवावे. एमएनजीएलने किती मीटरवर लाईन टाकली पाहीजे ही दक्षता घ्यायला पाहीजे. आमच्या भागात अजून ब-याचशा ठिकाणी अंडरग्राऊंड केबलचे काम राहीलेले आहेत. गेली पाच ते सहा वर्षापासून प्रयत्न करत आहोत. मा.अजीतदादा पवार यांनाही अनेकवेळा पत्र दिलेले आहेत की, अंडरग्राऊंड केबलचे काम होणे गरजेचे आहे. आयुक्त साहेब याच्यावरती काहीतरी निर्णय झाला पाहीजे. काम बंद पडले नाही पाहीजे, आमच्या ऐरीयामधील अजून बरीचशी काम राहीलेली आहेत, हीच मी आज सभागृहाला मा.महापौरांना आणि आयुक्त साहेबांना विनंती करतो आणि याठिकाणी थांबतो, धन्यवाद.

**मा.सुरेश म्हेत्रे -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. हा विवीध कंपन्या मार्फत सेवासुविधा पुरविण्यासाठी आपल्या महापालिका अंर्तगत जे रस्ते खोदाई काम करायचे आहे त्याच्या बद्दलचा हा विषय आहे. आमच्या वॉर्डाला मिळणारे लिमीटेड बजेट आणि या अनुषंगाने ज्या ज्या रस्त्याला रस्ता खोदाईची परवानगी दिलेली आहे मग ते रिलायन्स असो, व्होडाफोन असो, एमएनजीएल असो किंवा महावितरण असो याबद्दल डिसेंबर २०१५ ला पत्र लिहून शहर अभियंता, कार्यकारी अभियंता या सर्वांना पत्र दिलेले होते परंतु एकाही अधिकाऱ्या मार्फत त्याच उत्तर देण्यासाठी तसदी घेतलेली नाही. डांबरीकरणास सुरवात केली, मागच्या हाप्त्यामध्ये रिलायन्सवाले आले आणि खोदाई चालू केली आम्हांला माहित नाही. राजेंद्र जगताप आणि प्रशांत शितोळे यांनी सांगीतल की नगरसेवकांना माहिती होत नाही की वॉर्डात खोदाई चालू आहे. त्यांचे काम नाही का खोदाई चालू करतो म्हणून सांगायचे किंवा आपण कळवायला पाहीजे होते. आमच्या छोटया गल्लीतील रस्ते अशा ठिकाणी जर तो रस्ता एक मीटरचा खोदला तर उरलेल्या तीन मीटर किंवा आडीच मीटर रस्त्यामध्ये चालणही मुश्किल होते. तो रस्ता रिपेअर करण्याकरिता वाट पहावी लागते. दुसरा विषय असा आहे की, आपण जे खोदाईचे रेट घेतो ते किती फुटावर घेता का रिपेअर वर्कच्या रुल नुसार घेता हा महत्वाचा भाग आहे. जर त्यांना खोदाई एक मीटर लागत असेलतर आपल्याला ते रिपेअर करण्यासाठी तीन ते चार मीटरचा रस्ता पुनश्च करावा लागतो. आपल्याला मिळणा-या खोदाईचे पैसे खरोखरच परवडतात का हा विषय महत्वाचा आहे. केलेली खोदाई आणि त्यांचे मिळणारे पैसे आपण जे डांबरीकरण करणार आहोत त्याचा कुठे ताळमेळ आहे का. नाहीतर त्यांच्या ऐरीयाप्रमाणे, स्क्वेअर मीटर प्रमाणे रेट कसे लावून पैसे घेतो आणि खरोखरच आपले रस्ते

होतात का हा महत्वाचा विषय आहे. प्रत्येक प्रभागामध्ये नगरसेवकांच आपआपले पत्र जायला पाहीजे की आपल्या ऐरीयामध्ये या या परवानग्या संबंधीत कंपनीना खोदाईसाठी दिलेल्या आहेत. हे एक सेवाभावी काम आहे त्याचा फायदा आपल्या शहराला, आपल्या नागरीकांना होणार आहे. फोरजी असेल किंवा गॅस पाईपलाईन असेल जुने वायर आहेत ते अतीशय कमकुवत झालेले आहे ते वा-याने तुटून पडणार किंवा सप्लाय बरोबर मिळत नाही, व्होल्टेज नाही असे अनेक कारण आहेत त्यामुळे अंडरग्राऊंड होणे गरजेचे आहे. परंतु होणारी खोदाई नियोजनबध्द पध्दतीने व्हायला पाहीजे असे मत आहे आणि मिळणा-या खोदाईचा रेट दुरुस्त करणे याच्यामध्ये ताळमेळ व्हावा एवढेच बोलतो, धन्यवाद.

**मा.शमीम पठाण -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. एमएसईबी याच कंपनीबद्दल मला बोलायचे आहे. आपल्या शहरामध्ये अनेक प्रकारच्या केबल टाकल्या जातात. रिलायन्स बीएसएनएल आणि जेवढया म्हणून ज्या ज्या कंपन्या आहेत त्या सगळया कंपन्या आपल्याकडून परवानगी घेत असतील किंवा परवानग्या घेत नसतीलही ते मला माहीत नाही. परंतु त्यांची तर खोदाई अशीच सुरु होते भर, भर, भर, भर खोदतात, सहा इंच, फुटभरच खोदतात. त्यांच्या त्या केबल टाकतात कुठेतरी त्याचा एण्ड करतात, कुठेतरी वेटोळे तसेच पडलेले असतात. तुम्हांला उदाहरणच पाहायच असेलतर चिंचवड स्टेशनचा ओव्हरब्रीज डावीकडची बाजू इकडे येताना बघीतलेतर तुम्हांला दिसतील की पदपथावर सुध्दा त्या केबल तशाच ओपन आहेत. अनेक अशा कंपन्याच्या केबल आहेत त्या कधी टाकतात, केव्हा काम होत हे काहीच कोणाला माहिती नसते, आणि ईथे महापालिकेमध्ये स्थापत्याच्या कोणत्याही अधिका-यांना त्याची माहिती नसते. ते पैसे भरतही असतील पण तुमच्याकडून ती माहिती खालपर्यंत पोहचली जात नाही स्थापत्य विभागाला, एवढ मात्र निश्चित. तुम्ही कोणाला परवानगी दयावी त्याबद्दल मला काही बोलायचे नाही पण फक्त एमएसईबीची आपण जी वीज वापरतो त्या वीजेच्या उपस्कर वाहीन्या ज्या आहेत त्या केबल आहेत त्याचे जाळे संपुर्ण शहरभर पसरलेले होत व आता सुध्दा आहे आपण त्यांच्याकडून वीज वापरतो. १९९७ ला डिसेंबरमध्ये आपण सुरवात केली या शहरामध्ये या विदयूत वाहीन्या अंडरग्राऊंड करण्याची आणि जवळ जवळ दहा ते बारा वर्षे आपल्या महापालिकेकडून त्या केबल अंडरग्राऊंड करण्याचे काम खुप मोठया प्रमाणावर झालेले आहे. मला वाटत साधारण ते साठ ते सत्तर टक्के झालेले असेल, नक्की मला माहित नाही. परंतु ब-याचशा प्रमाणात ते काम झालेले आहे, माझ्याही वॉर्डमध्ये साधारणत: ७० टक्के काम झालेले आहे. काही केबल अशा आहेत की त्या केबल या अंडरग्राऊंड केल्याच पाहीजेत. आपण आपल्या शहरामध्ये हरीतक्रांती करायची म्हणतो. काल आमच्याकडून सांगीतले की जे रस्ते पुर्ण विकसीत झालेले आहेत त्याच्या दोन्ही बाजूला जर आपण वृक्षारोपण केल, वृक्षसंवर्धन केले, वृक्ष वाढवलेतर आपले शहर नक्कीच जास्त हरीत दिसेल. मग अशा वेळेस त्या केबल जर वर असतीलतर झाडे कसे वाढणार.

वा-यामुळे त्या झाडांचे घर्षण होते त्याठिकाणी हानी, अपघात होण्याची शक्यता असते. ज्या ज्या ठिकाणी आपण रस्ते वाढविलेले आहेत, रस्ते रुंदीकरण झालेले आहे अशा रुंदीकरणामध्ये या केबल वाहीनीचे जे पोल आहेत ते पोल रस्त्यात आलेले आहेत. ते पोल काढणे आवश्यक आहे. मग पोल काढून ते पुन्हा मागे घ्यायचे मग ते फुटपाथवर येणार म्हणजे केबल या अंडरग्राऊंड झाल्याच पाहिजेत. हे आपले धोरण आहे आपण ते काम सुरु केलेले आहे त्या कामासाठी हा जो विषय आलेला आह. एमएसईबीचा त्या कामासाठी आपण शेकडो कोटी रुपये खर्च केलेले आहेत, मला वाटत हजारो कोटी रुपयेही खर्च केलेले असतील. साहेब, त्यावेळेला रस्ते खोदाई आपणच करायचो, केबल आपण टाकायचो आणि पुन्हा टेंडर वगैरे काढून आणि पुन्हा रस्त्याची दुरूस्ती अपणच करायचो वर आपण एमएसईबीला १५ टक्के सुपरव्हीजन चार्जेस देत होतो. १९९८ ते २००० या कालावधीमध्ये आम्ही स्थायी समितीला असताना प्रत्येक विषयपत्रीकेवर विषय असायचे या या भागातील एमएसईबीचे केबल अंडरग्राऊंड करायचे आहेत त्यासाठी एमएसईबीला एवढे एवढे सुपरव्हीजन चार्ज देणे १५ टक्क्याप्रमाणे तिथ आपण रक्कम दयायची. आमचे नेते मा.अजीतदादा पवार हे ऊर्जामंत्री होते त्यावेळेला त्यांनी ठरविले की महापालिकेचे पैसे यामध्ये घालण्यापेक्षा आपण एमएसईबीला हे काम देऊ म्हणून त्यांनी त्यांच्याकडे हे सगळे काम सोपवलं. आणि म्हणून ते लोक हे काम करतात. आपण सगळच काम करत होतो वरती आणखीन १५ टक्के वर सुपरव्हीजन चार्ज देत होतो, आता हे सगळ वाचलेले आहे. फक्त रस्ते खोदाई करिता म्हणून त्यांचे काम आडवायच का आणि आम्हांला ते आवश्यक आहे. आता निम्म्या ठिकाणी काम झालेले आहेत. ज्या ज्या ठिकाणी टॉवर उभे आहेत, पोल उभे आहेत, ट्रान्सफॉर्मर आहे, त्याच्या जवळ जाऊन त्यांनी केबल आणुन ठेवलेल्या आहेत. अर्धवट त्यांची टोक वर आहेत आजून त्यांनी चार्ज करण्यासाठी थांबलेले आहेत ते. तरी ते काम करायचे आहे त्यामुळे काम सगळ अर्धवट आहे आणि अशा परिस्थितीमध्ये तुम्ही सांगता त्यांनी किती दयाव आणि आपण किती घ्याव. तुम्हांला रोखठोक हे कळून सुध्दा वर्षे झाल असेल, त्यांनी परवानगी मागून सुध्दा. त्यांचे टेंडर निघालेले आहे, ज्या कंपनीला त्यांनी टेंडर दिलेले असेल त्यांनी काही काही ठिकाणी विकास काम चालू केलेली आहेत. आम्हांला विचारण न विचार तो भाग वेगळा. आमच लक्ष वॉर्डामध्ये पाहीजे की कुठे काय काम चालू केले आहे ते. आम्हांला एकच माहीती आहे की वॉर्डामधील काम झाली पाहिजेत परंतु मला हे ही समजावून सांगा की हा विषय जर असाच दप्तरी दाखल केला, आमच्या म्हणण्याप्रमाणे, पक्षाच्या व्हिपप्रमाणे तर तो विषय कसा राहील. मी त्यांच्याशी बोलले, तुमच्याकडे ते आलेले होते. एक्झिक्यूटीव्ह ईंजिनीअर बरेचसे दिवस एक ते दिड वर्ष झाले हे काम खोळंबलेले आहे. किती पैसे रस्ते खोदाईचे दयायचे आणि ते दुरुस्त करायचे त्यासाठी मला वाटत दिड एक वर्षे झालेले आहे हे काम खोळंबलेले आहे. असं जर असेलतर त्याचा लवकर निर्णय घेतला पाहिजे, आम्हांला काम पाहिजे. एवढी सगळी आपली बचत होत

असेलतर आपण याला साथ दिली पाहीजे. साहेब, आता जो दप्तरी दाखल विषय करतात आणि त्याप्रमाणे जर मा.आयुक्तांनी आणलेल्या विषयाप्रमाणे किंवा तुमच्या ठरलेल्या दराप्रमाणे खोदाई दर घेणार असालतर मी मा.पक्षनेत्यांना विनंती करेल की हा विषय निदान तहकूब तरी करावा, याच्यावर चर्चा होईल. त्यांचे अधिकारी, ईंजिनीअर संबंधीत आहेत त्यांच्याशी तुम्ही चर्चा करा आमचे काही नेतेमंडळी आहेत त्यांना बोलवा परंतु हा जो दुराग्रह आहे, दुरुस्तीच्या कामाचे पैसे दिले पाहीजे हे चुक आहे. आपले किती वाचतात हे बघा. आपली किती बचत होते  ते आपण बघत नाहीत. साहेब, झोपडपट्टीमध्ये तुम्ही फिरत असताल तिथ हाताला येईल अशा आहेत केबल, असं जाळे आहे. एकदातर पऱ्याच्या त्या शेडवर वायरच कनेक्शन पडल आणि तो संपुर्ण पत्रा आग ओकत होता. साहेब, अशाप्रकारे भयानक परिस्थिती आहे. या केबल अंडरग्राऊंड झाल्या पाहीजेत या मताशी आम्ही आहोत. आपली बचत होत असेलतर काही खर्च आपणही सोसला पाहीजे असं माझ मत आहे. याद्दष्टिने आपण हे पाऊल उचलावीत किंवा याबद्दल कार्यवाही करावी असं मला वाटत.

**मा.धनंजय आल्हाट -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह.  या विषयासंदर्भात अनेकानी चर्चा केलेली आहे.  खरंतर शासकीय संस्था आणि  ज्या काही नागरीकांना  सेवा देणा-या संस्था आहेत या संदर्भात संपुर्ण शहरामध्ये खोदाई त्याठिकाणी सुरु झालेली आहे परंतु अनेकांनी अनेकांची मते मांडलेली आहेत. की पुण्याच्या धर्तीवर ज्या पध्दतीने रनींग मीटरवर दर घेतले जातात त्याप्रमाणे आपल्याकडे घ्यायचे व त्या पुण्याच्या धरतीवर त्यांना ५० टक्के कमी करायचे अशा संदर्भातील विषय आहे.  विषय मंजूर करायचा,  दप्तरी दाखल करायचा हा मुद्दा असलातरी त्याही पलीकडे जावुन काही सत्य परिस्थिती याठिकाणी कथन करणे गरजेचे आहे. एमएसईबीच्या माध्यमातून ओव्हरहेड किंवा अंडरग्राऊडचे काम होतात. ज्या काही नागरीकांना सेवा देणा-या कंपन्या आहेत. रिलायन्स असेल, एअरटेल असेल अन्य कुठल्या कंपन्या  असतीलतर या सगळया कंपन्याचे नेटवर्क आपल्या शहरात पसरते. परंतु प्रत्येक्षामध्ये ज्या आपल्या विभागामध्ये हे पैसे भरुन घेतले जातात. ज्यावेळेला भोसरी परिसरामध्ये ही खोदाई सुरु झाली, नॅशनल हायवेच्या बाजूने असेल, अंतर्गत रस्त्यावरती असेल, डीपी रस्त्यामध्ये असेल जे रस्ते पुर्वी बीआरटीएसच्या माध्यमातून झालेले आहेत जे अंतर्गत् त्याठिकाणी पाईपा टाकलेले आहेत, त्या पाईपमधुन टाकण्याचे काम असु दयात त्या पाईपमध्ये टाकण्याच सुध्दा त्यांना जा काही खोदाईचा दर असतो त्याची रॉयल्टी भरावी लागते. मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह माझा याठिकाणी फार मोठा आरोप आहे की एक कुठेतरी या शहरामध्ये रॅकेट निर्माण झालेले आहे.  या कंपन्याचे कन्सल्टन्सी रॅकेट आहे त्यानी त्या वॉर्डामध्ये सगळयाना ॲडजेस्ट करायचे, प्राधिकरणाला मॅनेज करायच, सगळया यंत्रणेला मॅनेज करायचे व रात्रीमध्ये त्याठिकाणी खोदाई करायची महापालिकेला एकही रुपया भरायचा नाही. म्हणजे हा जो काही महापालिकेला  निधी येणार होता, पैसा येणार होता,

रॉयल्टी येणार होती.  प्रत्यक्षामध्ये २५ टक्के सुध्दा रॉयल्टी महापालिकेला जमा झालेली नाही त्या विभागाची आम्ही माहिती काढली. माझ्याच वॉर्डातील माहिती काढली,  चिखली असेल, च-होली असेल, भोसरीच्या काही भागामध्ये असेल, एमएसईबी असेल, रिलायन्स असेल किंवा एअरटेल असेल त्याठिकाणी आम्ही पाहीले. प्रत्येक ठिकाणी खोदाई करुन वाहीन्या टाकलेल्या आहेत. परंतु ज्यावेळेस पेपरवरती पाहील की ज्या भागामध्ये ज्या डीपी रस्त्यावरती, ज्या अंतर्गत रस्त्यावर वाहीन्या टाकलेल्या आहेत कुठल्याही प्रकारचा त्या रस्त्याचा नकाशा नव्हता, त्याला कुठल्याही प्रकारचे कामाचे आदेश  नव्हते. एक रुपया सुध्दा न भरतात बेकायदेशिर परिस्थितीमध्ये संपुर्ण परिसरात या वाहीन्या टाकलेल्या आहेत.  या पाठीमागे फार मोठे रॅकेट आहे. कोटयावधी रुपयाचा भ्रष्टाचार याच्यामध्ये झाकलेला आहे. प्रशासन डोळेझाक करते, मुद्दामहून डोळे झाकतय त्यांना माहिती आहे हे काय चाललेल आहे ज्यावेळेला नगरसेवक प्रशासनाकडे तक्रार करतो त्यावेळेला प्रशासनाचे अधिकारी सांगतात की आम्हांला काही माहिती नाही. कुठ खोदाई चाललेली आहे हे माहित नाही. मग नगरसेवक त्याठिकाणी जागा दाखवतो बंद करतो लगेच ते तासाने पुन्हा चालू होते हे असं कस होत, कुठल्याही प्रकारचा एफआयआर दाखल करत नाहीत. त्यांना जर विचारल तु कुठले पैसे भरलेले आहेत त्याची पावती आम्हांला दाखव, नकाशा दाखव, आदेश दाखव तर कुठल्याही प्रकारची माहिती अधिका-याना नसते. कधीही आपले अधिकारी त्याच्यावर कुठल्याहीप्रकारचा एफआयआर दाखल करत नाहीत. याचा अर्थ एकच होतो की या संपुर्ण प्रकरणामध्ये कोटयावधी रुपयाचा भ्रष्टाचार झालेला आहे.  सभागृहातील अनेक सदस्य याच्याशी सहमत आहेत या शहरातील चांगली चांगली बडी मंडळी त्या रॅकेटमध्ये आहेत. कोटयावधी रुपयाचा महसुल महापालिकेचा बुडविलेला आहे.  एका बाजुला आपण म्हणतो उत्पन्न नाही आणि जर आपण याठिकाणी प्रशासनाने कानाडोळा केला. आपल्या समोर अशाप्रकारच उत्खनन होतय. एक रुपया सुध्दा भरला जात नाही आणि आपण काहीच करत नसेलतर १०० टक्के सगळे अधिकारी त्याला मिळालेले आहेत आणि नियमबाहय, बेकायदेशरी अशाप्रकारचा कोटयावधीचा भ्रष्टाचार याठिकाणी झालेला आहे. याठिकाणी विषय आलेला असताना स्थायी समितीमध्ये आम्ही तोच मुद्दा मांडला की यांना कुठले रेट दयायचे ते आपण नंतर ठरवू यांना मोफत दयायचे का कुठला रेटने दयायचे ते आपण नंतर ठरऊ. पहील दक्षता कमिटीच्या माध्यमातून पुर्ण शहरातील याची चौकशी करावी. कांबळे साहेबांना सुध्दा आम्ही  सांगीतले आहे पण कांबळे साहेब यांना सध्या दोन महीने राहीले रिटायर्ड होण्यासाठी त्यामुळे त्यांनी मौन धारण केलेले आहे, ते मौनात गेलेले आहेत. कारण त्यांना वाटत आपण आपली हयात चांगली घालवलेली आहे आणि शेवटी शेवटी जर या चौकशीच लचांड मागे आलेतर काय करायच म्हणून त्यांनी सध्या आता ध्यानामध्ये गेलेले आहेत. दोन महीने अतीशय मौन, अतीशय मधुर, अतीशय गोड  अतीशय कमी वेळ ते बोलतात आणि सुंदर पध्दतीने हासतात. त्या हस्यामध्ये स्मित

हस्य घेतलेल आहे. शांततेचा महामेरु कांबळे साहेब असतील अस मला वाटत आणि त्यांनी ते मौन आता सोडाव या शहरात जो काही भ्रष्टाचार सुरु आहे, मी तर म्हणतो आपल्याच सहमतीने त्याठिकाणी भ्रष्टाचार सुरु आहे म्हणून या सगळया प्रकरणाची चौकशी झाली पाहीजे. जर आपण चौकशी करत नसालतर आपणही प्रशासनाची सर्व मंडळी भ्रष्टाचाराला सामील आहेत असा स्पष्ट माझा आरोप आहे. नंतर या ठरावाला मान्यता दयायची किंवा काय करायच हे नंतर ठरवा. मा.महापौर साहेब, आपल्याला फार मोठी महापौरांची कारकीर्द मिळालेली आहे. तुमच्या डोळयासमोर चाललेले विषय आहे, मला माहिती महापौरताई आपले काम अतीशय शुध्द आहे. पण या कामा मध्ये अजून जर शिरपेच तुम्हांला रोवायचा असेलतर एक चांगला आदर्श प्रशासनाला दया की संपुर्ण शहराची जी काही खोदाई चालू आहे त्याची सगळी दक्षता कमिटी मार्फत चालू करुन पंधरा ते महीनाभरामध्ये त्याचा अहवाल सादर करावा तोपर्यंत हा विषय बंद होऊ नये किंवा तहकूब करु नये असा निर्णय आपण घ्यावा असे आदेश दयावेत एवढीच या शहरातील एक करदाता म्हणून या शहराचा विकास व्हावा याद्दष्टिने मागणी आहे ती मागणी आपण याठिकाणी पुर्ण करावी. सन्मा.आयुक्त साहेबांनी माझ्या बोलण्याचे स्पष्टीकरण करावे, याठिकाणी स्पष्टीकरण करुन जी काही मागणी मांडलेली आहे त्याचे स्पष्टीकरण करावे अशी मी विनंती करतो.

**मा. किरण मोटे -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. आज हा जो विषय सभागृहा समोर आलेला आहे हा विषय आल्याबद्दल मा.आयुक्त साहेबांचे आभारी आहे कारण १९९७ साला नंतर ज्या काही ओव्हरहेडस लाईन काही भागामध्ये राहीलेल्या आहेत हे काम एमएसईबीने करायचे असे ठरलेले आहे. या विषयाच्या माध्यमातून आपल्या प्रशासनाने त्यांच्याकडून ज्या ऐरीयामध्ये राहून गेलेले आहे ते कासारवाडीत पण हिराबाई लांडगे झोपडपट्टी असे दोन भाग आहेत तेथील ब-याच वर्षापासून हे काम रखडलेले आहेत. याच्यावर निर्णय झाल्यानंतर शहरातील असेच भाग असतील प्रत्येक नगरसेवकांच्या या समस्या आहेत. पावसाळयामध्ये तर एका एका विदयुत खांबावरुन पन्नास पन्नास सर्व्हीसलाईन गेलेल्या असतात, आग लागण्याचे प्रकार कासारवाडी सारख्या ठिकाणी झालेले असतात. त्याच्यावर काय निर्णय व्हायचा तो सभागृह घेईलच परंतु महापौर साहेब माझी आपणास विनंती आहे की एमएसईबीने या मोठमोठया केबल बरोबर ज्या कन्झुमरच्या केबल आहेत त्या केबल पण टाकण्याचे धोरण लवकर घ्यावे आणि पावसाळयापुर्वी ते टाकून दयावे असे आदेश मा.महापौरांनी दयावेत, धन्यवाद.

**मा.उल्हास शेट्टी -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. हा विषय माझा आवडता विषय आहे. सगळयांना माहिती आहे. मी गेली दोन-तीन वर्षे या विषयावर बोलत असतो. हा जो विषय आहे काल मी बजेटसंदर्भात या विषयावरती बोललो आहे. एमएनजीएल आणि एमएसईबीच्या संदर्भात बोललो. पठाणताई सांगतात त्यात सुध्दा तथ्य आहे. काही

गोष्टी आमच्या ज्या वॉर्डमध्ये फुलफिल होण्याच्या दृष्टीने तो एक मार्ग होऊन जातो कारण आपल्याला बजेटमध्ये प्रोव्हीजन करा ती व्यवस्था करता करता नाकीनऊ येतो. आमच्याही ब-याचशा गोष्टी क्लेअर झालेल्या आहेत पण त्याच्यानंतरच्या ज्या फॉर्मलीटीज आहेत त्या पुर्ण कोणी करायच्या. यामध्ये स्थायी समितीने जो निर्णय घेतला तो त्यांच्या अधिकारातला आहे. जनरल बॉडीचा हा वेगळा अधिकार आहे. तुम्ही ॲक्च्युअली याच्यामध्ये क्लेरीफिकेशन दयायला पाहीजे. कारण चेअरमन आमच्या शेजारीच बसलेले आहेत ते म्हणत होते की त्याठिकाणी कर्मचारी वर्ग कुठल्याच बाबतीत यासंदर्भात पुढे येवून आम्हांला क्लेरीफिकेशन दयायची तयारी दाखवत नाही. की ॲक्च्युअली एमएनजीएलचे किती रनिंग फुटच काम चालेले आहे. एमएसईबीच किती रनिंग फुटच काम चालेले आहे याच्यामध्ये ऑडीट करुन हे ॲक्च्युअली कितीच काम आहे. वॉर्डामध्ये असं वाटत की एवढे चांगले काम करत असताना अचानक कोणीतरी खड्डे करुन जातो आणि तो सहा सहा महीने असाच राहतो आणि त्याच्यानंतर ज्येष्ठ नागरीकांचा तुम्हांला माहिती आहे की त्यांचे पत्रव्यवहार असतात, आम्ही आता पडलो, आम्हांला चालता येत नाही, मुलांना सायकल चालवता येत नाही. याच्यामध्ये आल्हाट यांनी सांगीतले खुप मोठा भ्रष्टाचार आहे, वगैरे वगैरे. याच्यावर किती बोलावे तेवढे कमी आहे. मला याठिकाणी तुम्हांला एकमाहिती दयायची आहे की श्रीकर परदेशी साहेब असताना ओव्हरहेड केबल जे शहरामध्ये पसरते त्या संदर्भात कोणी निर्णय आपण घेत नाहीत. महापालिकेची बिल्डींग किंवा महापालिकेचे स्ट्रिटलाईट, या गोष्टीवरुन उदा. टिव्ही केबल असतील, स्पोर्टसचे चॅनल्स असतील आतातर टाटा स्कायवाल्यानी तुमच्याकडे यायचेच बंद केलेले आहे. टाटा स्कायवाले का येत नाही तर तुमची जी एनओसी घ्यायला वेळ लागतो आणि पैसे परवडत नसल्यामुळे येत नाहीत. शहरात तुम्ही बघावे डिश, टाटा स्कायच्या केबल्स सर्रास ठिकाणी आहेत. त्यांच्या ओव्हरहेड हवेत केबल आहेत. आता तुम्ही म्हणताय आकाशचिन्ह विभाग काही नसताना लोकांकडून पैसे तुम्ही गोळा करतात, मग हे हावेत एमएसईबीच्या वायरींग फिरतात त्याच्याबद्दल कधी सभागृहात हा विषय आलेला नाही त्या विषयी धोरण आलेले नाही. किंवा आपल्या अधिका-यांनाही असं वाटल नाही की आपल्याला आता हा रेव्हेन्यू कमी पडतो तो गोळा करण्याच एक सोर्स निर्माण कराव याकडे का दुर्लक्ष करायच. फॉरेनमध्ये गेल्यास तुम्ही बघावे, प्रत्येक ठिकाणी रस्त्याला एक डक्ट असतो त्याच्या मार्फत सगळया कॉमन वायर जात असतात आणि ते देश रेव्हेन्यू गोळा करत असतात. आपला एवढा मोठा हायवे होता त्याठिकाणी एखाद डक्ट निर्माण केल असत आणि तीकडून अशा केबल गेल्या असत्यातर आपले किती पैसे वाचले असते आणि आपल्याला किती पैसे मिळाले पण असते. आपण त्याचा कधीही विचार केलेला नाही. आपण चांगले फुटपाथ खोदाई करुन केबल टाकतो म्हणजे आपले लोक कुठ कमी पडतात, का कमी पडतात. एवढ मोठ डेव्हलप करत असताना स्पाईन रोड असु दयात, एक्सप्रेस हायवे असू दयात काबर अगदी

एखाद छोटेसे ३X३ चा वेगळा डक्ट तयार केला असतातर त्या ठिकाणाहुन सर्व केबल गेल्या असत्यातर ते मेन्टेनन्ससाठी सुध्दा सोपे आहे, रेव्हेन्यू पण मिळणार, डांबर टाकायची गरज नाही. मग याच्याकडे आपण का दुर्लक्ष केलेले आहे. श्रीकर परदेशी साहेब असताना एक आदेश दिलेला होता आणि आख्या पिंपरी चिंचवडमध्ये जेवढया केबल आहेत तेवढयाना त्यांनी कात्री लावलेली होती. टाटास्काय, ऐअरटेल असू दयात या जेवढया जेवढया केबल आहेत नेटवाल्यांचे त्यात इन्कम आहे. एखाद नेट घेतलतर काय चार्जेस घेतात लोकांकडून किती चार्जेस घेतात, आपल्याला एक रुपया सुध्दा ते भरत नाहीत. घराघरामध्ये नेट आहे. सगळे बिझनेस, हॉटेल, पानटपरी कुठही बघीतलतर नेट आहे ते आपल्याला चार्ज करतात ते तुमच्याकडे काही पैसे भरतात का, नाही भरत. ते इकडून तीकडे वायर टाकतात, बॉम्बे-पुना रोड क्रॉस करतात, हायवे क्रॉस करतात, एमएसईबी बघत नाहीत, काही बघत नाहीत, डेन्झर झोन बघत नाहीत. तुम्ही याच्यावर एखादी कमिटी नेमा. सजेशन ऑब्जेक्शन घेवून एक मोठ इन्कम सोर्स महापालिकेच्या माध्यमातून तयार होवू शकते. आयुक्त साहेब, याच्यावर तुमच काय म्हणंन आहे, तुम्हाला याच्याबद्दल काय वाटते. तुम्ही या गोष्टी करत असताना आपल्याला किती मोठा भूर्दंड बसणार आहे आणि किती लोकांना यामधुन आमच्या लोकांना त्रास आहेच. साहेब, सध्या वॉर्डामध्ये काम करत असताना, आम्हीतर बघतो कि कोणी परमीशन घेतलय नाही घेतल. मी मागच्यावेळेस म्हणालो होतो शाहूनगरच्या शेजारी माझ्या वॉर्डात अचानक गेलोतर त्याठिकाणी एमएनजीएलने खोदाई करुन मोकळे होते. ते संबंधित नगरसेवकांना विश्वासात सुध्दा घेत नाहीत. आम्ही तिथ आटापीटा करतो, आमचे भांडण होतात की आम्हांला तरतूद करुन दया, आणि त्याठिकाणी आमचे फुटपाथ खोदून मोकळे होतात. मग आम्हांला या छोटया छोटया गोष्टीची तरतूद करायला एवढे कष्ट घेत असू आणि वॉर्डामध्ये सत्यानाश होत असेलतर याला जबाबदार प्रशासन आहे का. तुमच्या डिपार्टमेंटला कोणालाही काही नाही की या गोष्टीवर संबंधीत नगरसेवकांशी सलाहमशुरा करायला पाहीजे. तुमच्या वॉर्डात एवढया कि.मीटरच काम होणार आहे त्यासाठी असं असं आपल्याला कराव लागणार आहे असं विश्वासात घ्यावे आम्हांला सुध्दा बरे वाटेल. परंतु कोणालाही ते विश्वासात घेत नाहीत. ते म्हणतात आमचे इस्टीमेट काढायचे काम आहे, इस्टीमेटवाले म्हणतात परमीशन ते देतात, ते म्हणतात परमीशन आयुक्त देतात, साहेब तुम्ही खुलासा करावा, तुम्ही बदनाम होतात. हे अधिकारी लोक तुम्ही करतात म्हणून म्हणतात, तुम्ही क्लेअर करा हे तुमच काम नाही म्हणून, धन्यवाद.

**मा.अनिता तापकीर -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. भुमीगत केबलचा विषय चाललेला आहे. आयुक्त साहेब, आमच्या येथे अक्षरश: केबलच्या वायरी लोंबकळत आहेत. काही काही ठिकाणी जाळ पण निघतो. करंट बसण्याची शक्यता आसते. एमएसईबीवाल्यांच्या घरातील ज्या वायरी आहेत नागरीक स्वत: कनेक्शन घेतात. त्याठिकाणी

जोडणीसाठी एमएसईबीवाले लवकर येत नाहीत. तिथे जाळ होतो हा प्रकार अक्षरश: घरात होतो. रोडवरच्या एक दोन टयुब असतात त्या सुध्दा बंद असतात त्या सुध्दा अशा व्यवस्थीत चालू नसतात. भूमिगत खोदाईचे काम असते ते काम केले की तेथील राडा कधीही उचलला जात नाही खडी वगैरे ते सर्व तिथं पडून असतं. त्याठिकाणी अपघात पण होवु शकतो. आमच्या वॉर्डात वायरी लोंबकळत आहेत. त्याठिकाणी दक्षता घेतली आणि नागरीकांच्यासाठी भूमिगत काम करुन दिलेतर बरे होईल, एवढ बोलून मी माझे दोन शब्द संपविते.

**मा.चंद्रकांता सोनकांबळे -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. हा विषय आपल्या समोर आलेला आहे या तीन्ही संस्था एमएसईबी, एमएनजीएलने आणि बाकीच्या केबलस आहेत त्याबाबत खोदाईचा काय दर दयायचा. माझ म्हणणं असं होत की आपण या तीन संस्था बाकीच्या केबलस आहेत हे लोकांकडून पैसे घेत असतात. या सेवा देत असताना त्यांच्याकडून पैसे घेतात बील देत असतात, एमएसईबी व्याज घेते, बील जर नाही भरलतर सोनारापेक्षा जास्त व्याज एमएसईबी घेते. मला वाटते आपल्या ज्या सार्वजनिक संस्था आहेत या सगळया संस्थामध्ये सर्वात जास्त व्याज घेणारी संस्था एमएसईबी आहे हे कोणाच्याही लक्षात येत नाही. वर्षभर त्यांचे व्याज घेण्यामध्ये त्यांची जेव्हा लाईट जाते, दिवसभर लाईट गेलेली असते अशा ब-याचवेळा लाईट जातात. जेव्हा एखादयाचे बील काढतात तेव्हा सरासरी बील काढतात. या सरासरी बीलामध्ये लाईट गेलेल्या दिवसाचे बील ते वजा करत नाहीत. व्याज घेणा-या या संस्था आहेत त्याच्यामुळे त्यांना अदिभार कमी करु नका. यांच्याकडून व्याज जरी घेता आले नाहीतरी आपला जो मार्केटरेट आहे खोदल्यानंतर दुरुस्त करण्याचा तोच आपण दर घ्यावा. ब-याचशा झोपडपट्टीमध्ये बघतो सर्व केबलस लोंबलेल्या आहेत. एवढी बेजबाबदार संस्था एमएसईबी आहे. इतक्या त्या केबल लोंबलेल्या आहेत आणि एका एका पोलवर जवळ जवळ पस्तीस पस्तीस चाळीस चाळीस वायर आहेत. माझ्या वॉर्डामध्ये सुर्यवंशी म्हणून एक माणूस तो पावसाच्या अगोदर घरावर प्लॅस्टीक आंतरण्यासाठी घरावर गेलातर त्यावेळेला शॉक लागून तो मरण पावलेला आहे. अशावेळी एमएसईबीवर गुन्हा दाखल व्हायला पाहीजे. परंतु आमची काही चुक नाही असे म्हणुन ते हात झटकतात मोठया हायटेन्शनच्या ज्या केबल्स आहेत त्या घरापर्यंत पोहचलेल्या आहेत. ज्या आम्ही स्वत: तक्रारी करुन भूमीगत केबलच काम दापोडीमध्ये सुरु झालेल आहे. परंतु हे होत असताना आता ज्या सभासदानी तक्रारी सांगीतलेल्या आहेत की खोदाईचा राडारोडा उचलत नाहीत. खोदाईही करत नाहीत जेवढया उंचीने ती केबल घ्यायला पाहिजे तेवढ खोदल जात नाही. साहेब, याच्यावर आपल कोणीतरी परिक्षण करणार किंवा आपल कोणीतरी त्यांच्यावर लक्ष ठेवणारा माणुस पाहीजे. आपला कोणीही माणुस नसतो, तो किती खोदाई करतो, पाण्याच्या लाईनला तो क्रॉस करतो का, सोप-सोप काम ते करतात आणि मग ते त्यांचे काम करुन निघून जातात. एमएसईबीचा डीपी आहेत हे लोकांकडून पैसे घेतात परंतु ज्या ज्या जागेवर त्यांनी डीपी

ठेवलेले आहेत किंवा बांधलेले आहेत मोठया ताराचे डीपी आहेत, उचंच्या उंच टॉवर आहेत टॉवरच्या सुध्दा ब-याचशा जागा त्यांनी फुकट घेतल्या आहेत. माझीतर आपल्याला विनंती आहे की यांचे बरेचसे डीपी महापालिका जागेमध्ये असण्याची शंभरटक्के शक्यता आहे.  त्या जागेचे भाड सुध्दा आपण एमएसईबीकडून घ्यावे. त्यांना अजीबात मोकळ सोडू नका. ते आपल्याकडून लाईट बील घेतात, फ्रि लाईट देतात का त्यामुळे त्यांना कुठल्याही पध्दतीच देता कामा नये. त्यांचे डीपी सुध्दा खाली जमिनीवरती ठेवलेले आहेत. डीपीचे दरवाजे सुध्दा उघडे असतात  ब-याचशा तक्रारी असतात. तेव्हा विनंती अशी असणार आहे की जो योग्य रेट  आहे तो लावावा. कुठल्याही पध्दतीची सवलत किंवा आदिभार कमी करण्याची सवलत देवु नका. आपल्या महापालिकेचा फायदा जास्तीत जास्त करावा अशी विनंती करते, धन्यवाद.

**मा.निता पाडाळे -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. आता हा परमीशनचा विषय आलेला आहे परंतु गेल्या वर्षी ब-याचशा वॉर्डामध्ये केबल टाकण्यात आलेल्या आहेत. त्यावेळेला मी आपल्याला एक पत्र दिलेले होते, आपल्या जागेतून त्यांच्या ज्या केबल जातात त्यांना आपण काहीतरी भाडे ठेवावे. ज्या कंपन्या आहेत त्या भरपुर पैसे कमवतात. वायरी टाकतात आज आपल्याला प्रत्येक माणसाला मोबाईल वगैरे वापरण ही नित्याची बाब आहे. मी त्यावेळेला आपल्यला पत्र दिलेल होत की आपण काहीतरी आपल्या जागेतून त्यांच्या वायर जातात त्याचे भाडे घ्यावेत त्याचे पुढे काय झाले याचा खुलासा करावा. त्याचप्रमाणे आयुक्त साहेब आपण आम्हांला सांगीतलेले आहे की तुमच्या ज्या वायरी जाणार आहेत, तुमचा जो रोड खोदला जाणार आहे, गेल्यावर्षी आपण ड प्रभागामध्ये मिटींग घेतली होती. जेवढे पैसे ती कंपनी आपल्याला भरणार आहे तेवढया प्रत्येक वॉर्डाला आम्ही पैसे तो रोड करण्यासाठी देणार आहोत असे सांगीतले आहे परंतु तसे काही दिलेले नाही. अजून पण आमच्या काळेवाडी ते पिंपरीच्या रोडमधुन त्या वायरी वायरी गेलेल्या आहेत. तो रोड तसाच पडलेला आहे. तो एवढा मोठा रोड डांबरीकरण करण्यासाठी वॉर्डामध्ये तरतूदच नाही. जे एमएसईबीने काम केलेले आहे. काही ठिकाणी लोक त्यांना आडवतात त्यावेळेला त्यांनी किमान अधिका-यांना, नगरसेवकांना सांगीतले पाहिजे की आम्हांला करुन देत  नाहीत. रस्त्याच्या मधुन ते खोदाईचे काम करायला सुरवात करतात. आता एक ते दिड महीन्यापुर्वी डांबरीकरण केले आणि आठ दिवसापुर्वी त्यांनी रोडच्या एकदम मधेमधुन खोदाई करुन टाकलेली आहे. मी विचार तीकडून का घेतल नाही तर म्हणाले ताई, त्या लोकांनी आम्हांला ईकडन टाकू दिल नाही म्हणून आम्ही इकडून घेतल. हे चुकीच आहे. अधिका-यांनी त्यांना रोडच्या बॉंड्रीतूनच घ्यायला सांगीतल पाहीजे. ब-याचशा प्रमाणात या जमिनीवर बॉक्स असतात त्यांची झाकण व्यवस्थीत नसतात ती सुध्दा ते बदलत नाहीत. त्याचप्रमाणे गंजलेला मिनी बॉक्स आहे. त्यातून धोका होवु शकतो, ते सुध्दा त्यांनी बदलेले नाहीत. आता आम्ही सांगीतल की हे बदला ते बदला तर म्हणतात ताई आमची कॉन्टेटी संपली, हे झालं ते झाल अशी उत्तर येतात. मग शेवटी आपल्या महापालिकेलाच ते

बदलाव लागत त्याच्यामुळे आयुक्त साहेब जो आपला रेट आहे त्याच त्याच रेटने यांना दयावे ही विनंती, धन्यवाद.

**मा.सिमा सावळे -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. मा.महापौर साहेब, रस्ते खोदाईचा विषय सगळया नगरसेवकांचा जिव्हाळयाचा विषय आहे. आयुक्त साहेब, मला वाटते वारंवार आपल्याकडे आम्ही तक्रारी करत असतो. परवानगी न घेता आपण रस्ते खोदू देतो. मागच्या आठवडयात माझ्याच वॉर्डात एमआयडीसीमध्ये रिलायन्स कंपनीचे खोदकाम चालू होते. तेथे एका सन्मा.आमदारांचे समर्थक ४० ते ५० पोर तेथे उभे होते. अर्ध्या कि.मी. रस्ता खोदाईसाठी. साहेब, त्या रस्त्याने येताना दिसल म्हणून थांबले, थांबले म्हणून विचारल तुम्ही रस्ता कसा काय खोदता, परवानगी घेतली का, पैसे भरलेले आहेत का. ते म्हणाले पैसे भरलेले आहेत आम्ही, आमच्याकडे परवानगी आहे. मी म्हणाले मला परवानगी बघायची आहे. तर त्यांच्याकडे परवानगी होती टेल्को रोडची आणि खोदत होते एमआयडीसीच्या आतमध्ये. इंद्रायणीनगरला मथुरा हॉटेल पासून जर लेफ्ट मारलातर आतमध्ये एमआयडीसीचा जो रस्ता जातो त्या रस्त्याने खोदत होते. परवानगी गवळीमाथ्या पासून बालाजीनगर पर्यंतची आणि खोदत होते एमआयडीसीच्या आतमध्ये आणि एकदम मोठया आवाजात म्हणतात, ऐ हे घे रे परवानगी दाखव बाईला. मला वाटल आपल्याकडून चुकल असेल एवढ जोरात बोलतो. त्यावेळेस असे वाटले कानफडात मारावी. खोदणारे ते महानगरपालिकेला बुडवतात दुर्दैवाने आपले महानगरपालिकेचे अधिकारी सुध्दा त्याठिकाणी बोटचेपी पणाची भुमिका स्विकारतात. साहेब, त्याठिकाणी मी त्यांना सांगीतले पावती मला दाखवा त्याचप्रमाणे मला नकाशा दाखवा आणि नकाशा पाहील्यानंतर लक्षात आल की त्यांनी आपल्याकडून परवानगीच घेतली नाही. मग रिलायन्स कंपनीला आपण दंड ठोकायला पाहीजे. समजा मी फोनवर तक्रार केलीतर तक्रारीच पुढे काय झाल याचा सुध्दा पाठपुरावा आम्हीच घ्यायचा का तुम्हांला सांगीतल्यानंतरही खोदाईचे काम बंद झाले नसतेतर नगरसेवकांनी जाऊन मारामा-या करायच्या का. मग अशाप्रकारे महापालिका दुर्लक्ष करत असेलतर, काल मसलपॉवरचा विषय काढला तर खुप लोकांच्या नाकाला मिरच्या झोंबल्या. ही मसलपॉवर नाहीतर काय आहे. महानगरपालिका काही यांच्या बापाची आहे का. ही सार्वजनिक मालमत्ता आहे. ही सार्वजनिक संस्था आहे. एखादा गैरकृत्य करत असेलतर, कंपनीकडून तुम्ही पैसे घेत असाल आणि ते पैसे जर महापालिकेमध्ये भरत नसतीलतर त्याचा जाब विचारण्याचा अधिकार हे सुध्दा नागरीक म्हणून करदाता नागरीक म्हणून विचारण्याचा या शहरातील प्रत्येक नागरीकाला आहे. परंतु साहेब, बोललतर राग येतो. मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, तुम्ही संपुर्ण एमआयडीसीमध्ये, पाठीमाग कांबळे साहेब बसलेत, दुधेकर बसलेत त्यांनी नकाशा दाखवावा मी तुम्हांला ती केबल खोदुन दाखविते दहा दहा कि.मी.ची केबल बीना परवानगीच्या टाकल्या गेलेल्या आहेत. त्या एक एक केबलची मी माहिती घेतली त्या केबल्सच्या आतमध्ये ज्या केबल्स असतात त्या

सुध्दा भाडयाने दिल्या जातात. डोक्यावरचे केस असतात तशी ती केबल सुध्दा भाडयाने देतात त्यासाठीचे लाखो रुपये संबंधीत त्या केबलधारकाला मिळतात. आणि मग त्याठिकाणी जर केबल टाकत असतीलतर आपल मॉनिटरींग काय. आपला कोणी ज्युनिअर इंजिनीअर, सुपरवायझर नसतो, तो ठेकेदारच होल ॲण्ड सोल मालक असतो. पैसे भरुन तुम्ही काम करावे निश्चितपणे त्यांचे स्वागत आहे. जरी लोकसेवा पुरवणारे काम असेल एमएसईबी असेल, एमएनजीएल असेल व इतर सर्व मोबाईल कंपन्या असतीलतर या सेवा देतात म्हणजे काय करतात,उपकार थोडाच करतात. या आमच्याकडून एक एक रुपया, पै ना पै वसूल करतात. मी तर असे म्हणले की यांच महापालिकेवरती दिवसाढवळया दरोडा टाकण्याचे काम चालू आहे. मी माहितीच्या अधिकारात अनेक फाईली खोदकामा विषईच्या सगळया कंपन्यांच्या नेल्यात ती फाईल आणि समोरच मॅच केलतर कुठेच मॅच होत नाही. मला त्याच्यावरुन पिटीशन फाईल् करायचे म्हणून मी या विषयावर काही बोलत नव्हते. केबलसाठी संपुर्ण शहर खोदाव लागलतरी चालेल. कारण की अशाप्रकारचा महानगरपालिकेचा महसूल बुडत असेलतर कोणीतरी बोललच पाहीजे आज विषय आला म्हणून. साहेब, सगळयात महत्वाच म्हणजे रस्ता खोदाईसाठी आपला रेट ९५००/- होता. ६५००/- रस्ताखोदाई आणि मनपा अधिभार ३ हजार घेतो. आम्हांलाही कळल नाही की कधी याचे रेट इतके कमी झाले आणि हे २३५०/- वर आले. याला महापालिका सभेने परवानगी दिली का. आयुक्तांनी त्यांच्या अधिकारात केले हे सुध्दा बघीतले पाहिजे. एखादे आरक्षण ताब्यात घेतल्यानंतर आपण जर त्याठिकाणी टिडीआर देत असूतर आपण ९५००/- च रेट लावतो. म्हणजे ज्या शेतक-यांनी तुम्हांला जागा दिली तो भूमिहीन झाला असेल कोणी घर दिलेले असतील, ते सगळे देशोधडीला लागलेले असतील. काहीना पैसे मिळतात काहीना मिळत नाहीत त्यांच्यासाठी आपण रेट कमी करत नाहीत आणि यांच्यासाठी मात्र आपण निश्चितपणे रेट कमी करतो. साहेब, मला अस याठिकाणी सांगायचे आहे की जर न्याय असेलतर तो सर्वांना समान न्याय असला पाहीजे. परंतु तो काही ठरावीक लोकांना डोळयासमोर ठेवून असे काम करणार असालतर निश्चितपणे याच्यामध्ये भ्रष्टाचार झाला आहे हे याठिकाणी ठामपणे सांगते. मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, आताच जवळपास एमएनजीएलचे ५२.२६ कि.मी. चे प्रकरण आपल्याकडे दाखल आहे आणि बीएसएनएलचे १.७८ कि.मी.चे प्रकरण त्यांच आपल्याकडे दाखल आहे आणि एमएसईबीचे जे आता बीव्हीजी ठेकेदार आहेत त्यांचे जवळपास ३५ कि.मी.चे प्रकरण आपल्याकडे दाखल आहे. मा.महापौर साहेब, आम्ही एमएसईबीच्या ज्या चार कंपन्या आहेत त्यामध्ये मागच्या महीन्यामध्ये या कामाची माहीती घेण्यासंदर्भात ईंफ्राकडे आम्ही गेलो होतो. त्याठिकाणी या कामाची माहिती त्यांनी दिली असता पहीले ते काम दहा कोटीचेच होते, बीव्हीजीला जे काम दिल ते. त्यावेळेला तेथील अधिका-यांनी सांगीतले, तत्कालीन आताचे मंत्रीमहोदय त्या मंत्र्यांनी सांगीतल दहाच्या वर एक शुन्य लावा आणि ते काम दिल, दहा कोटीच काम शंभर कोटीला जाऊ शकत. गेलतरी माझ

त्याच्याबद्दल काही म्हणण नाही. कारण त्यानंतर निवीदा झालेल्या आहेत, निवीदा कोट केल्या गेल्या. निवीदेमध्ये पारदर्शकता झाली असे त्यांचे म्हणणे आहे परंतु माझ असं म्हणण आहे की त्याठिकाणी दोनच कॉन्ट्रॅक्टर आले आणि दोनमध्ये बीव्हीजीने नंबर पटकावला. मग एकीकड जर तुम्ही १०० कोटीचे काम घेतलेले असेल तुम्हांला खोदाईचा दर काय आहे तो माहिती होता. येणारा खर्च तुम्हांला माहिती होता. मग १०० कोटीच तुम्ही काम घेतल असेलतर आज तुम्ही आमच्याकडून पैसे कमी करुन कसे काय मागता. म्हणजे एकीकडे तुम्ही सांगता की आम्हांला सुविधा दयायची आहे जास्तीत जास्त काम करायच आहे हे आम्हांला तुम्ही गाजर दाखवता. आमच असं म्हणण आहे की समजा एमएसईबी धर्मादाय संस्था असतीतर आम्ही एखादयावेळेस विचार पण केला नसता. एमएसईबी सुध्दा त्याठिकाणी नफा कमावणारी संस्था आहे मग यांना कशासाठी सुट दयायची. आता आपले लाईट पाहीलतर ३१ मार्च पासून नवीन दर लागू होणार आहेत. मीटरमध्ये काही फॉल्ट असेलतर, नवीन मीटर घेताने आम्हीच पैसे भरायचे असतात आणि दरवर्षी मीटरला आम्ही डिपॉझीट भरत असतो. जर आम्हांला एकही सुविधा त्यांच्याकडून फुकट मिळत नसेलतर आम्ही काय म्हणून त्यांच्या कामाला सवलत दयायची. मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, याठिकाणी एमएनजीएल कंपनी आहे, महाराष्ट्र नॅचरल गॅस. साहेब आता महाराष्ट्र, भारत, इंडीया, हिन्दुस्तान या नावाला आता बंदी आली कारण की अशा ब-याचशा संस्था त्याचा गैरवापर करतात म्हणून. परंतु ज्यांनी गैरवापर करायला सुरवात केलेली आहे त्यामध्ये एमएनजीएल सुध्दा आहे. नॅचरलचा गॅस घरापर्यंत येवू देत, जरी मी रेग्युलेटर चालू केला तरी मीटरमधुन मला कळणार आहे, बील मला मिळणार आहे मला सगळया सुविधा मिळणार आहेत त्या तुम्ही फुकट देणार का हे सांगा. सवलतीच्या दरामध्ये सुध्दा मिळणार नाहीत. त्याठिकाणी कनेक्शन घ्यायच्या अगोदर डिपॉझीट भरायचे आहे. म्हणजे आज जसं तिथ मी सिलेंडरच डिपॉझीट भरते तस ईथे सुध्दा डिपॉझीट भरायचे आहे. एमएसईबीचे बील आले ते भरले नाहीतर लाईट कट होते तस त्याठिकाणी सुध्दा माझ गॅस कनेक्शन कट होणार आहे मग यांना सुट कशासाठी दयायची. या संस्थांच्या बरोबर आपण आपले सुध्दा हीत जोपासले पाहीजे. आपले हित जोपासणार नसालतर ते योग्य नाही आणि याच्यामध्ये आम्हांला निश्चितपणे दाद मागावी लागेल. साहेब, दादागीरीचा विषय मी आता तुम्हांला सांगीतला त्याठिकाणी आपण स्वत: किती दिवसात कारवाई करणार आहात. रस्ता खोदून टाकलेली केबल आपली परवानगी न घेता केबल टाकलेली असेलतर आपण स्वत: इन्स्पेक्शनला यावे आणि ते जर पैसे भरले नसतीलतर त्यांनी त्याठिकाणी केबल खोदून दाखवावी. आमच्याकडे झोपडपट्टी असल्यामुळे किंवा एमआयडीसी असल्यामुळे आमच कोणाचही लक्ष नाही असे ब-याच जणांना वाटत. तुमच्याकडे एक रस्ता करायचा असेलतर दहा हेलपाटे मारत असु तर आमच सुध्दा तिथ लक्ष असतं. आमच म्हणण असं आहे की रस्त्याच्या मधोमध खोदू नका रस्त्याच्या कडेने घ्या. खोदताना

तसच टाकून जायच हे थांबल पाहीजे. साहेब, आपण याच्यावर आपण जातीने लक्ष दिले पाहीजे. मागच्या पंचवार्षीकमध्ये मा.मारुती भापकर नगरसेवक होते त्यांनी अतीशय सुंदर माहिती या सभागृहामध्ये प्रश्नोत्तराच्या रुपाने दिलेली होती. आपण महसुल किती जमा करु शकतो, भूमिगत केबलसाठी अपण काय काय करु शकतो. या सगळयावर कुठली कारवाई झाली नाही. विरोधी पक्षाच्या नगरसेवकांनी यायचे बोलायचे, आम्ही बोललो म्हणजेच आरोप आहेत असं नसत काही गोष्टीमध्ये ९९ टक्के तथ्य असते म्हणून आम्ही बोलत असतो. आम्हांला सुध्दा तुमच्या एवढीच काळजी आहे ही संस्था टिकली पाहिजे. मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, आपण आताच्या रेट प्रमाणे एमएनजीएलला ५२.२६ कि.मी. साठी रस्तादुरुस्ती खर्च ३४ कोटी ९६ लाख ४२ हजार ८१५ रुपये होतात. मनपा अधिभार होतो १२ कोटी १९ लाख ९७ हजार ६५० रुपये. एकूण होतात ४७ कोटी १६ लाख ४० हजार ४६५ होतात. परंतु आपण आहे तेच प्रस्तावीत दराप्रमाणे गेलो तर १७ कोटी ४८ लाख २१ हजार ४०८ रुपये होतात. मनपा आधिभार आपण जर नाही लावला तरी १७ कोटी ४८ लाख रुपये मिळतात. मग आपण का कमी करतो. आता यांनी जे पैसे भरलेले आहेत ते पैसे सुध्दा यांच्याकडून किमान ६५००/- प्रमाणे घ्या. बीव्हीजीला आपण जो रेट कमी केलेला आहे ते ५० रुपयानी वाढविणार. २३०० चा २३५०/- करणार आहोत. या सगळयाचे ६५००/- रुपयानी घ्यावे. मनपा आदिभार घेतला नाही तरी चालेल परंतु ६५००/- प्रमाणे घेतलतर आपण ४ कोटीने यामध्ये उत्पन्न कमवणार आहोत. आणि हे उत्पन्न कमवत असताना साहेब, निश्चितपणे आपल्याला महानगरपालिकेची आर्थीक स्थिती सुधारण्यास मदत होणार आहे. मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, परवाच्या दिवशी मी माहीती घेतली की आपल्याला एमएसईबी सवलतीच्या दरात वीज देतात का. रावेतचा जलउपसा केंद्र असेल, जलशुध्दीकरण प्रकल्प असेल, पाणीपुरवठा विभाग असेल २०१३-१४ ला आपण ३३ कोटी ७७ लाख रुपये बीलापोटी भरलेले होते. २०१४-१५ ला ३६ कोटी ३१ लाख रुपये भरलेले होते. २०१५-१६ ला जवळपास ३५ कोटी ६० लाख रुपये भरलेले होते मग याच्यामधे आपल्याला कुठेही सुट मिळत नसेलतर आपण यांना सुट का दयायची. बीएसएनएल ही जरी केंद्रशासनाची कंपनी असलीतरी तुम्ही एक महीना तारखेत बील नाही मिळलतरी तुमचा दुरध्वनी क्ट होतो. मग हे आपल्याला कमी करत नसतीलतर आपण यांना सुट का म्हणून दयायची. आपण सुध्दा गव्हर्नमेंन्ट अंडरटेंगींच संस्था आहोत मग आपण यांना का सुट दयायची. मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, एमएनजीएलला आतापर्यंत आपण ४२.८० कि.मी.ची परवानगी दिली होती. त्यामध्ये त्यांनी आतापर्यंत आपल्याला ३५ कोटी २६ लाख ५१ हजार रुपये भरलेले आहेत. आणि आता जर सवलत दिलीतर आपण किती कोटीने खाली येणार आहोत आणि अशाप्रकारच जर आपण काम करणार असूतर मला असं वाटत हे महानगरपालिकेच्या आर्थीक हिताच्या विरोधात आहे आणि म्हणून आपण हे काम करु नये. माझतर असं म्हणन आहे की एमएसईबी असेल, ईंफ्रा असू

देत, किंवा बीएसएनएल असु देत किंवा एमएनजीएल असु देत सरसगट सगळयांना ६५००/- रेट ठेवावा. मी तर म्हणेल की आधिभार सुध्दा घ्या. परंतु मी माहिती घेतली असता असं कळाल की आधिभार जर घेतलातर आणि समोरचा जर कोर्टात् गेलातर आपण ठिकू शकणार नाहीत. म्हणून त्यांना दयायचतर ६५००/- प्रमाणे दयाव. मा.महापौर साहेब, एमएनजीएल, बीएसएनएल, एमएनडीसीएल या सगळयाचे प्रस्तावीत दर आणि चालू दरामध्ये जर आपण फरक केलातर एमएनडीसीएलसाठी जर इतर प्रस्तावाप्रमाणे आपण शुल्क वसुल केले असतेतर आतापर्यंत आपल्याला २६ कोटी ५६ लाख रुपये मिळाले असते. या तीघाकडन जर आपण ६५००/- प्रमाणे दर वसुल केले असतेतर मला वाटत २६० कोटी रुपयाची वसुली झाली असती. आपण हे करत नाहीत म्हणून आपण २६० कोटी रुपयाला मुकणार आहोत. माझ वारंवार कांबळे साहेबां बरोबर भांडण असायच, हे जे काही आपण रस्ताखोदाईचे विषय करतो, परवानग्या देतो यामध्ये फार मोठ गौडबंगाल आहे. श्रीकर परदेशी साहेब असताना आम्हांला कळाल की, एक कि.मी. रस्ता करायला घेतलातर १४ कोटी रुपये खर्च येतो आणि त्याच्या अगोदर १८ कोटी रुपये खर्च येत होता. मग आता जर का ती सवलत दिलीतर रस्ता दुरुस्तीचा खर्च आपण त्याठिकाणी तोंडमिळवणी करुच शकणार नाही. मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, आपल्याला अशी विनंती असेल की आपण यांना कुठलीही सुट न देता जो ६५००/- रेट आहे प्लस ३०००/- रुपये हेच गृहीत धरुन यांना परवानग्या देण्यात याव्यात. एवढच बोलते आणि थांबते.

**मा.सुलभाताई ऊबाळे** - मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सर्व सन्मा.सभागृह, एका विषयाला सुरुवात झाली आहे. पण या विषयाचे गांभिर्य माननीय सर्व सभागृहाला नाही कारण या विषयातून कोण कुठून कुठपर्यंत पोचलेला आहे यासंदर्भात आम्ही काही माहिती देणार आहोत. आमची इच्छा आहे की, त्याची सखोल चौकशी करावी आणि जर चौकशी केली नाहीततर यात प्रशासन व प्रशासनाचे मुख्य म्हणून आपल्याला व्यक्तिशः जबाबदारी घ्यावी लागेल. मा.आयुक्त साहेब, आपल्याला माहित आहे की, आपल्याकडे जेव्हा जकात चालू होती, तेव्हा काही चौकडी जकात चोर म्हणून घोषित झाले होते. त्या चौकडीची नावे आजही जाहिरपणे बोलली गेली नाहीत. पण प्रत्येकाला माहित आहे. बरेच वेळा त्यांच्याकडून अशा प्रकारच्या चोरीची कामे झाली होती. आणि हिच सगळी चौकडी पुन्हा या रिलायन्स, व्होडाफोन, बीव्हीजी याच्या माध्यमातून शहरात कामे करते आहे. बिनापरवानगी खोदकाम केले, तुम्हाला विचारून केले नाही, हे सगळे विषय गौण ठरतील जेव्हा तुम्हाला यातला सिरिअसनेस कळेल की हे काय आहे. आपले अधिकारी आणि खरेतर मा.धनंजय आल्हाट यांनी सिटी इंजिनिअर यांच्याबाबतीत सांगितलेच आहे. खरेतर ते रिटायर्ड होणार आहेत. मला त्यांच्याबाबतीत सांगायचे नाही. आमचा त्यांच्याशी जवळचा संबंध आहे. कुठल्याही प्रकरणाशी ते टच नसलेतरी ते टच करुन घेत नाहीत, ही त्यांची स्वतःची खासियत आहे. कारण भ्रष्टाचार केला नाही किंवा मी करत नाही हे म्हणणे जेवढे सोप्पे असते, तेवढे भ्रष्टाचार होत असताना बघत बसणे, हे

तेवढेच खोटे असते. म्हणजे मी भ्रष्टाचार केला नाही म्हणून तो झाला नाही असे नाही. तो होतो आहे आणि तो होत असताना गप्प बसणे हा सुद्धा फार मोठा गुन्हा आहे. आणि अशा प्रकारचा गुन्हा आपल्या स्थापत्य विभागाची मंडळी करत आहेत. मा.महापौर साहेब, याठिकाणी बीव्हीजी कंपनीने इन्फ्राचे एमएसईबीचे काम घेतले आहे. मी तुम्हाला सांगू इच्छिते की, एक मीटरची परमिशन घेतात व दहा मीटरचे काम करतात. परमिशन नाही असे नाही. परमिशन आहे. पण त्या परमिशनचा ते अशा प्रकारे दुरुपयोग करतात. १० कि.मी. चे काम केल्यानंतर एमएसईबी २० कि.मी.चे बील घेते. स्वतः कॉन्ट्रॅक्ट घेतले आहे नावाला, परंतू सगळीकडे सबकॉन्ट्रॅक्ट दिले आहेत. आणि सबकॉन्ट्रॅक्ट कुणाकडे दिले आहे, ज्यांच्याकडे कुणाकडे स्वतःचे लायसन नाही, त्यांना कुठलाही अनुभव नाही. ही लोक रस्त्यात कुठेही काम करत असतात. त्यांना कशाचे काही गांभिर्य नाही. अशा अशिक्षित लोकांना कॉन्ट्रॅक्ट दिले आहे. ते फक्त राजकीय गुंडागर्दी करु शकतात. अशा लोकांना काम दिले आहे. खोदकाम करत असताना त्यांची खोली किती असायला पाहिजे, हे फक्त टेंडरमध्ये आहे. जसे आपल्याकडे शेड्युल बी मध्ये असते. मा.आयुक्त साहेब, परंतू माझ्याकडे दिघी भागातले काही फोटो आहेत. त्यात तुम्हाला दिसेल की वायर किती वर होत्या. त्याठिकाणी लोकांनी स्वतःचा जीव मोडून घ्यायचा का. मी हे फोटो तुम्हाला वॉटस्‌अपवर तुमचा नंबर असेलतर पाठवते. असे नित्कृष्ट दर्जाचे काम हे सबकॉन्ट्रॅक्टर करत आहेत. इन्फ्राचे काम कुठे केले जाते, का केले जाते याची मा.आयुक्त साहेबांना कल्पना असेल. इन्फ्राच्या कामाचे असे वर्गीकरण आहे, ज्या ठिकाणी लोकांनी डबल घरे बांधली आहेत, म्हणजे सामान्य घर आहे त्याच्यावर जेव्हा वरती घर बांधतो. तेव्हा तिथे लो व्होल्टेज होतो. कारण तिथे एकच ट्रान्सफॉर्मर असतो. त्याच्यावर लोड आला की ते अजून लो व्होल्टेज. त्यामुळे त्याठिकाणी अजून लोड वाढवण्यासाठी इथे इन्फ्राच्या कामाला सुरुवात झाली आहे. या कामाची मंजूरी घेतली गेली आहे. मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सर्व सन्मा. सभागृह मी तुम्हाला हे सांगू इच्छिते की, इन्फ्राच्या कामाची संपूर्ण परिभाषा बीव्हीजी प्लस एमएमईबी प्लस राजकीय पुढारी यांनी मिळून बदलून टाकली आहे. जिथे आवश्यक आहे तिथे काम केले जात नाही. इन्फ्राचे काम कुठे केले जाते, एखादा मोठा कारखाना, एखादा बिल्डर. जनतेचा पैसा, तुमची फुकट परमिशन, रिलॅक्सेशन सुद्धा परवानगीशिवाय, याचा उपयोग ही सगळी ठराविक मंडळी करत आहेत. बीव्हीजी कंपनीचे हे अंडरलाईन केबलचे मटेरीयल सध्या मार्केटमध्ये विकायला उपलब्ध आहे. त्यात कदाचित हनुमंत गायकवाड, दत्ता गायकवाड यांना माहितीसुद्धा नसेल. त्यांनी सबकॉन्ट्रॅक्टर दिले आहे. ही मंडळी सांगतात, १२५ फुट वायर लागते. प्रत्यक्षात लागते ५० फुट वायर. बीव्हीजी मोठं प्रस्थान आहे. त्यांना कदाचित या छोट्या-छोट्या गोष्टींची कल्पना नसेल. त्यातले राहिलेले ७५ फूट लोकांना बाजारात खाजगीत विकतात. तिथे नित्कृष्ट दर्जाच्या वायर वापरल्या जातात. याकडे कोण बघतोय. कोणाचे याकडे लक्ष आहे. मा.महापौर साहेब, बीव्हीजी, इन्फ्रा यांचे काम

आणि एमएसईबी यांनी त्यासाठी केंद्र सरकारकडून कर्ज घेतले आहे. हे अनुदान नाही. केंद्रसरकारने त्यांना ही रक्कम परत देण्याच्या कबुलीजबाबावर दिली आहे. मा.आयुक्त साहेब, मा.मुख्यमंत्र्यांनी आपल्याला बीव्हीजी यांच्या सांगण्यावरुन दोनदा पाचारण केले. आपली मुख्यमंत्री साहेबांसमोर बैठक झाली. रेट कमी करुन देण्यासाठी त्यांनी तुम्हाला विनंती केली. त्यानंतर हे रेट कमी झाले आहेत. म्हणजे ते तुमच्यावर दबाव आणतात. अशी कामे करायला सांगतात. तुम्हाला त्याठिकाणी उत्तर द्यायला काय झाले होते की, आम्ही करु शकत नाही. आम्हाला येत नाही. तुम्ही बघू म्हणालात, आणि फसलात. तुमच्या स्वभावाचा फायदा सगळे घेतात तसा त्यांनी सुद्धा घेतला. मा.महापौर साहेब, किवळे इथे काम पूर्ण झाले. काम पूर्ण होऊन बरेच दिवस झाले. पण अजूनही लोकांच्या मीटरपर्यंत यांनी वायरी जोडलेल्या नाहीत. तुम्ही सांगितले होते, जुन्या हद्दीतल्या कामाचे आम्ही पैसे घेणार नाही. अलिखित होते. ज्याठिकाणी नवीन काम होते आहे, फक्त त्याठिकाणीच पैसे घेऊ. तीन/चार प्रकारच्या वायरी वापरल्या जातात. त्यात फर्स्ट क्वालिटी वायर फक्त वर दाखवली जाते. आणि त्यामुळे वरच्यावर वायरी ब्रेक होतात. लोकांची लाईट जाते. किंवा काहीतरी शॉर्टसर्किट होते. मा.महापौर साहेब, २०१४ मध्ये रिलायन्स कंपनीचे १०० कोटींचे खोदकाम झाले. ज्यावेळी विधानसभेच्या निवडणूका होत्या. आम्ही सगळे त्यात गुंतलेलो होतो. त्यावेळी प्रेमकुमार पशुपती नावाच्या, व आपल्या काही राजकीय लोकांनी लायसन घेतले होते. तुम्ही सांगा, कुणाला विचारले होते. आपलेच लायसन्सर असतील तर अधिका-यांची काय टाप आहे कुणाला विचारायची की, कुठे खणताय, कशाला खणताय. उगाच म्हणत नाही कुंपणानेच जर शेत खात असेलतर कोणाला विचारायचे. अधिका-यांना एक माहित आहे, पण कोणी बोलत नाही. व्होडाफोन, एअरटेल व आयडीया या कंपनीचे खोदकाम झाले आहे याचा एक रुपयासुद्धा महापालिकेच्या तिजोरीत जमा झालेला नाही. जवळजवळ १०० कि.मी.ची लाईन टाकली गेली आहे. लाईन टाकणा-याचे नाव आहे. विक्रम जव्हेरी. त्याचे खडकी इथे ऑफीस आहे. त्याने आपल्या जागेतून या कंपन्यांकडून १०० कि.मी.ची लाईन टाकली आहे. एक रुपयासुद्धा जमा नाही. तो या कंपन्यांकडून केबलचे भाडे व्हाईट चेकने घेतोय. आपल्या हद्दीतून लाईन टाकली आहे. यांनी स्वतः टाकली. या चार कंपन्या त्याला चेकने पेमेण्ट देतात. भोसरी इथे खुलेआम गुंडाराज चालले आहे सिमाताई म्हणाल्या ती ही सगळी चाळीस पन्नास माणसे तिथे होती. खुलेआम चालले आहे. जनतेचे फुकटचे पैसे घेऊन, जनतेमध्ये दहशत, अधिका-यांमध्ये दहशत. होत असेलतरी विरोध करणार कोण. विक्रम जव्हेरी या माणसाची इन्कमटॅक्स विभागाकडून माहिती घ्या. व्होडाफोन,एअरटेल,आयडीया या कंपन्यांच्या फोर-जी च्या लाईन टाकल्या आहेत. त्याचे व्हाईट चेकने पेमेण्ट घेतले असेलतर कोणत्या जागेचे घेतले, कुठून घेतले, जागा कोणाची, भाडे कोण घेतो आहे. महापालिकेच्या जमिनी घेतल्या तरी मालक महापालिका आहे. ताबा महापालिकेचा आहे. टिडीआर पण घ्यायचा व जमिनीपण घ्यायच्या. सगळेच मला. तुम्ही कशी कामे करणार

आहात. मा.आयुक्त साहेब, तुमची चुप्पी अत्यंत महागात जाणार आहे. एकिकडे आपण उत्पन्नाचे स्त्रोत बघतोय, एकिकडे सगळ्या कामांना कात्री लावायचा प्रयत्न करतोय, आणि एकिकडे आपली जी सत्ता, सुबत्ता आहे ती आपण आपल्या लोकांवर उधळतोय. कुणाला कशासाठी रिलॅक्सेशन द्यायचे. वळसे पाटील जेव्हा विद्युत विभागाचे मंत्री होते. तेव्हा एमएसईबीकडे आपले १०० कोटी जमा आहेत. तेव्हापासून आपण त्यांच्याकडे पैसे मागतोय. ते तुम्हाला मिळणारच नाहीत. सगळीकडे कमर्शियल रेट आहे. एक दिवस भाडे भरू नका लगेच एमएसईबीची नोटीस येते. मनपाचे सुद्धा लाईट कापतात. एमएसईबी लगेच लाईट कट करते. मग कशासाठी रिलॅक्सेशन, कुणाच्या सांगण्यावरुन रिलॅक्सेशन. हा पैसा आमचा पैसा आहे, जनतेचा पैसा आहे. तुम्हाला रिलॅक्सेशन करायचे अधिकारी तुम्हाला कोणी दिलेले नाहीत माझी सर्व सन्नाननीय सभागृहाला देखील विनंती आहे की, या व्यक्तीचे खडकी इथे ऑफीस आहे. त्याने ज्या फोरजीच्या लाईन टाकल्या आहेत त्या बघा. फोरजीचे जे हेड कोण आहेत त्यांना कॉन्टॅक्ट करा. ते कुठे दिल्लीत बसू देत, नाहीतर अमेरिकेत बसू देत तुम्ही सगळ्यांना कॉन्टॅक्ट करा. लाईन कुठून टाकली, किती पैसे देतात, कोणाला पैसे देतात, याच्या फोनच्या सीडी तपासा मग तुम्हाला कळेल की, त्यांच्या लाग्याबांध्यामध्ये कोण कोण आहेत. मा.आयुक्त साहेब, हे गांभिर्याने घ्या. मा.स्थायी समितीने हा विषय जो दप्तरी दाखल केला आहे तो अत्यंत योग्य केला आहे. यात कोणतेही रिलॅक्सेशन न देता पूर्वी जो ६५००/- रेटने दिले आहे, त्याप्रमाणे संपूर्ण वसूली झाली पाहिजे, असे या निमित्ताने सांगते. ६,५०० आहे त्याप्रमाणेच घेतले पाहिजे. रिलॅक्सेशन करायचे कारणच नाही. आम्ही सेक्टर २२ मध्ये मीटर मागतोय. त्याठिकाणी ते सांगतात, मागची बिले भरा. एकतर आकडे टाकून कोणी कुठे लाईट वापरली कुणालाच माहित नाही. जो मीटर मागतो, त्याला एमएसईबी म्हणते, तुम्ही मागचे बील भरा. गोरगरीबांना फुकट लाईट द्या. देत नाहीत. मी सर्व सभागृहाला सांगते, आपले हे मोठे स्तोत्र आहे. उपसूचना दप्तरी दाखल करा. मी मा.मंगलाताईंना सांगते. मी मांडलीतर ते होणार नाही. तुम्ही सूचना मांडा, तुम्ही अनुमोदन द्या व त्याप्रमाणे विषय करुन घ्या अशी विनंती करते.

**मा.प्रशांत शितोळे** - मा.आयुक्त साहेब, माझा एक प्रश्न आहे की, यात किती पैसे भरलेत त्याची माहिती देण्यात यावी.

**मा.आर.एस.कुमार** - मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सर्व सन्मा.सभागृह, या विषयावर चर्चा चालू असताना मी नव्हतो. पण मला हे प्रशासनाच्या लक्षात आणून द्यायचे आहे की, २००७-०८ मध्ये १०० कि.मी. ची केबल पिंपरी चिंचवड शहरामध्ये पैसे न भरता टाकली होती मी अनेक अधिका-यांना विचारले, ते आहे पण म्हणत नाही आणि नाही पण म्हणत नाहीत. त्यावेळी असलेले असे अनेक अधिकारी महापालिकेत आहेत. जे केबल टाकले आहे ते ब्लॅक कलरचे केबल होते. मोठ्या मोठ्या कंपन्यांना भाड्याने दिलेल्या आहेत. कोणी अधिकारी सांगत

नाही अशा केबल टाकल्या नाहीत म्हणून. मी वेळोवेळी अधिका-यांना विचारले आहे, याचे पैसे भरले आहेत का. सगळे म्हणतात, नाही भरले. एक मात्र नक्की की, ५०/१०० कि.मी.ची केबल पैसे न भरता टाकली आहे. कोणीतरी डॉनचा मॅनेजर पिंपरी चिंचवडमध्ये राहतो त्या माणसाने केले असे म्हणतात. हे शोधून काढायचे काम तुमचे आहे. ५०/१०० कि.मी. म्हणजे थोडा एरिया येत नाहीत. यात तथ्य आहे, खरे आहे. केबल कुठे टाकली आहे. काय टाकली आहे. दुसरे म्हणजे एमएसईबी यांना सवलत देण्याची काय गरज होती. ते आपल्याला बिलात सवलत देणार आहेत का. रिलायन्स, व्होडाफोन कंपन्या रस्ता खोदतात. याच टर्मस आणि कंडीशन काय आहेत. तो रस्ता कोणी रिपेअर करायचा. डांबरीकरण कोण करणार. यासाठी खर्च किती येतो. एका कंपनीला ९,०००/- दुस-या कंपनीला ३,०००/- आणि बीव्हीजीला २,३००/-. असे म्हटले तर आपले लोक म्हणतात, एमएसईबीला कन्सेशन आहे. पण एमएसईबीचे काम प्रायव्हेट कंपनी बीव्हीजीच करते. आपल्या लोकांचा व बीव्हीजी यांचा काही संबंध तर नाही ना. कशासाठी एमएसईबी यांना द्यायचे. एक महिना बील भरले नाहीतर लगेच लाईट कट करायला येतात. आपल्याला कोणतीही सवलत देत नाहीत. ते आपल्याला कमर्शियल रेटने देतात. सामान्य माणसाला सुद्धा दीड हजार पेक्षा कमी बील येत नाही. रेट वाढत जातात. सिक्युरीटी डिपॉझिट वाढत जाते. मग सवलती कशाला मागतात. तुम्ही यात असेच म्हणावे की, जे खोदकाम यांनी केले आहे ते रिपेअर करुन दिले पाहिजे. आपण कशासाठी करायचे. माझी आपल्याला विनंती आहे की, त्यांना कन्सेशन द्यायची काही गरज नाही. धन्यवाद!

**मा.आयुक्त -** मा.महापौर साहेब,सर्व सन्मा.सभागृह, हा अतिशय महत्वाचा विषय आहे. या अनुषंगाने चर्चेला आला आहे. मी सर्वप्रथम प्रशासनापुढे विषय ठेवला असल्यामुळे विषय ठेवण्यामागची भूमिका थोडक्यात सांगू इच्छितो की, ब-याच सन्मा.सदस्यांनी जे काही मुद्दे उपस्थित केले. त्या सर्वांना टच करुन महापालिकेला काय-काय करता येईल. यावर मी माझे भाष्य करणार आहे. अतिशय महत्वाच्या गंभीर विषयावर ब-याच गोष्टी रेकॉर्डवर राहतील. पहिली गोष्ट म्हणजे आपल्याकडे शासकीय व अशासकीय अशा दोन प्रकारच्या संस्था आहेत. शासकीय मध्ये गव्हर्नमेंट ऑफ महाराष्ट्रच्या किंवा गव्हर्नमेंट ऑफ इंडियाच्या अंडरटेकींग असे दोन भाग होतात. महाराष्ट्र शासनाची एमएसईबी कंपनी आहे. एमएनजीएल व बीएसएनएल या गव्हर्नमेंट ऑफ इंडिया च्या अंडरटेकींग आहेत. अशासकीयमध्ये रिलायन्स, व्होडाफोन, एअरटेल या कंपन्या येतात. मी सर्वप्रथम हे क्लिअर करु इच्छितो आणि सभागृहाला हे सांगू इच्छितो की, आम्ही हा विषय फक्त शासकीय संस्थांसाठी आणला आहे. त्यात एमएनजीएल व बीएसएनएल या केंद्र शासनाच्या व राज्य शासनाच्या या संस्थांसाठी हा विषय आणला आहे. या मागील उद्देश्य एवढाच होता, या शहरात एमएसईबीने खूप काम केले आहे. अंडरग्राऊंड केबल टाकून शहराचे सुशोभिकरण झाले आहे. शहराचे विद्रुपीकरण कमी झाले आहे. पूर्वी महापालिका स्वतःच खर्च करुन हे काम करत होती, याची आपल्या सर्वांना कल्पना आहे. नंतर

सबसिक्वेंटली गव्हर्नमेंट ऑफ महाराष्ट्र व एमएसईबीने त्यांच्या खर्चातून करायला सुरुवात केली याची आपल्याला कल्पना आहे. म्हणून ते आपलेच काम करत आहेत असा गैरसमज आहे त्याला हे लॉजिक आहे. आता प्रश्न असा आहे की, एमएसईबीचे हे काम जर शहराच्या सुशोभिकरणात भर पाडणार असेलतर त्यामुळे लोकांची अडचण दूर होत असेल, शहरवासियांची सोय होत असेल आणि सर्वजण आग्रही असतील तर पुण्याच्या धर्तीवर त्यांनी एमएसईबीसाठी, महाराष्ट्र शासनासाठी हा निर्णय घेतला होता. त्याप्रमाणे कार्यक्रम करतोय. आज आम्ही जो विषय आणला आहे. एमएसईबी यांचे ३०० वर सुद्धा समाधान होत नव्हते. बीना शुल्क किंवा मुफ्त करा असे म्हणत होतो. माझ्या अधिकारांत केले होते. माझी सभागृहाला विनंती आहे की, जरी मी माझ्या अधिकारांत केले होते तरी त्यामागील उद्देश्य साधा व सरळ आहे. बीव्हीजीला करतेय का बीव्हीजीने आणखी १० लोकांना दिले का कोणाला दिले. बीव्हीजी यांना बघून केले नव्हते. तरीसुद्धा प्रती २३०० चे ६५०० या रेटने केले तरी महापालिकेच्या दृष्टीने चांगलेच होईल असे माझे स्वतःचे म्हणणे आहे. आणि आपण नाही केलेतरी तो माझा स्वतः निर्णय मी वापस घेतो असे इथे जाहिर करतो. यापुढे मी स्वतः काही निर्णय घेतला आणि महापालिकेचे नुकसान केले असे होणार नाही. त्यामुळे मी हा निर्णय मा.महापालिका सभेपुढे सोडतोय. त्यामुळे माझी ही पहिली विनंती राहील आणि आपण ते ६५००/- करावे. परंतू यामागील माझा उद्देश्य साधा आणि सरळ होता एवढेच मला याप्रसंगी सांगायचे आहे.

दुसरे म्हणजे एमएसईबी यांना २३००/- रेटने पुण्याच्या धर्तीवर दिल्यामुळे लगेच एमएनजीएल व बीएसएनएल या ज्या काही गव्हर्नमेंट संस्था आहेत त्याही पुढे आल्या. त्या म्हणाल्या की, आम्ही सुद्धा घरोघरी गॅस सिलेंडर  देतो. सर्व लोकांना गॅस आणण्यासाठी बाहेर जाण्याची गरज नाही. वाहतुकीची गरज नाही. मीटर लागेल. आम्ही जसे पाणी मीटरने देतोय तसे कोणालाही गॅससुद्धा मीटरने देऊ. इतरही भागात डेव्हलपमेंट होईल. आणि हे शहरासाठी आणि शहरातील प्रदूषण कमी करण्यासाठी योग्य आहे. दुसरा विषय आला, बीएसएनएलचा. बीएसएनएलची कनेक्टीव्हीटी आहे आणि ते देखील गव्हर्नमेंट ऑफ इंडियाचे डिपार्टमेंट आहे. बीएसएनएल आणि एमएनजीएल या दोन्ही संस्था यांनी एमएसईबीच्या धर्तीवर रु.२३००/- रेटने करावे असा आग्रह या दोन्ही संस्थांनी धरला. माझ्याकडे धरला नाही. त्यांनी धरला असता तरी मी त्यांना बिल्कूल जुमानले नसते. आमच्याकडे विभागीय आयुक्तांकडे पीसीएमसी व या ब-याच भागातील कोऑर्डीनेशन मिटींग होते. त्यावेळी त्यांनी विभागीय आयुक्तांकडेसुद्धा आग्रह धरला होता. विभागीय आयुक्तांनी सागिंतले जर पुणे करतेय तर तुम्हाला करायला काय हरकत आहे. तुम्ही सुद्धा मा.महापालिका सभेपुढे हा विषय घ्या. आज इथे नढे साहेब आहेत का नाही हे मला माहित नाही. परंतू ज्यावेळी विभागीय आयुक्तांना भेटले त्यावेळी त्यांनी सुद्धा त्यांना सांगितले की, शासकीय संस्था आहे. आपल्या समाजासाठी चांगले काम करतो आहे. जरी एमएनजीएल रु.६०००/- कनेक्शनसाठी डिपॉझिट घेत

असतीलतरी त्यात काही सवलत देत नाहीत तरी आपल्याला सवलत देता येते का. अशी त्यांनी आपल्याला विनंती केली. काल सुद्धा मी एका विषयासाठी विभागीय आयुक्तांकडे गेलो होतो. त्यावेळी एम.टी.कांबळे यांच्याकडे त्यांनी आग्रह धरला. मग मी सकाळी सकाळी सभागृह नेते यांच्याशी बोललो की, विभागीय आयुक्तांचा आग्रह आहे. शासकीय संस्था आहे. आपण त्यावर काहीतरी निर्णय घ्यावा. परंतू आजची चर्चा बघितल्यानंतर मी सभागृहालाच विनंती करेन की, त्यांनी काहीतरी योग्य तो निर्णय घ्यावा. हा विषय मांडण्यामागील उद्देश मी सुरुवातीलाच स्पष्ट केला आहे. आता मी मुळ मुद्यावर येतो आपल्याकडे दोन भाग आहेत. रिलायन्स, व्होडाफोन, भारती एअरटेल या अशासकीय संस्था आहेत. आत्ता मा.सिमाताई सावळे यांनी सांगितल्याप्रमाणे व आपण ठरवल्याप्रमाणे आपण सुरुवातीला ६५००/- ते ३,०००/- असे दर घेत होतो. एक्सेप्ट एमएसईबी. ते सुद्धा आजपासून बंद करणार आहोत माझे असे म्हणणे आहे की, यात दोन प्रकार आहेत. महानगरपालिकेची कामे आहेत. मी कुठली जिम्मेदारी काढत नाही. त्यांनी आपल्याकडे परवानगी मागितली की रोडच्या कडेने किंवा फुटपाथच्या खाली किंवा कडेने किंवा साईड मार्जिन मधून जेणेकरुन सोय उपलब्ध होईल. व आपली अटकळ होणार नाही. रिसर्वीसींगसाठी १० कोटी प्रत्येक प्रभागासाठी ठेवले आहेत. त्यामुळे रिसर्वीसिंग होईल जेणेकरुन जनतेला सेवा मिळेल व आपला रस्ता सुद्धा ॲज ईट ईज होईल. याप्रमाणे काम करण्याची ही पहिली जिम्मेदारी आमची आहे. आणि ती आपण करावी अशी अपेक्षा आहे. दुसरी जिम्मेदारी महत्वाची आहे आणि जी आपल्याकडे येतच नाही. आणि परस्पर आपल्या परवानग्या घेतात. त्याला कोणी विचारणारा नाही. समजा ती जागा खाजगी आहे तर मी समजू शकेन. पब्लिक प्लेस आहे किंवा शासकीय जागा आहे किंवा महापालिकेची जागा आहे असे आपण समजू. ज्याची मेंटेनन्स करायची जिम्मेदारी महापालिकेची आहे. मा.आर.एस.कुमार साहेबांनी २००८-०९ चे उदाहरण सांगितले. ऊबाळे मॅडम यांनी सुद्धा अशातलचे एक व्होडाफोनचे १०० कि.मी.चे उदाहरण दिले आहे. मी हे सांगू इच्छितो की, ही सुद्धा जिम्मेदारी महापालिकेची आहे. २००८-९ पासूनची आहे. आणि आज सुद्धा आहे. जर ते परवानगी घेण्यासाठी आपल्याकडे येत नाहीत, जर विचारणाच करत नाहीत. जे कोणी माहिती देतील, नागरीक देतील,पदाधिकारी देतील,अधिकारी देतील त्यांच्यावरच डिपेण्ड आहोत. या सगळ्या गोष्टींची जबाबदारी आमची आहे हे सुद्धा मी सुरुवातीला सांगू इच्छितो यासाठी यापुढे काही प्रकार होणार नाही याची आपण चौकशी करु. माझी सभागृहाला विनंती आहे की, पूर्वी का झाले हे आपण ऐकून घ्या. नंतर आपण पुढे जाऊ. मी उदाहरण सांगतोय, त्यांनी जर महापालिकेकडे परवानगीच घेतली नसेल, त्यांनी थोडक्यात महापालिकेला अंधारात ठेवून त्या लाईन टाकल्या आहेत. आपण त्याची सखोल चौकशी करु हा पहिला मुद्दा. यापुढे महापालिकेला अंधारात ठेवून शहरात कोणी असे काम करु नये. आपण बांधकामासाठी जसे बीट निरीक्षक नेमले आहेत. तसे आपण प्रत्येक वॉर्डसाठी जे संबंधित जे.ई. आहेत त्यांना वैयक्तिकरित्या जबाबदार धरण्यात येईल.

माझी सभागृहाला विनंती आहे की, सध्या आपल्याकडे अनधिकृत बांधकामे होत आहेत. मा.उच्च न्यायालयाने कारवाई करायला सांगितली आहे. पूर्वीसुद्धा आपल्याकडे माणसे होती पण फिक्स अशी माणसे नव्हती. म्हणून आपण बीट निरीक्षक केले. अनधिकृत बांधकामाचा स्पीड पहिल्यापेक्षा बराच कमी झाला आहे. हरकत नाही आणखी स्पीड कमी करु. आपल्याकडे सहा क्षेत्रीय कार्यालये आहेत. तिथे सहा एक्झिक्युटीव्ह स्थापत्य विभागाचे आहेत. प्रत्येकाकडे २/३ जे.ई. आहेत. त्यामुळे सर्व शहर स्थापत्यमध्ये वाटले गेले आहे त्यामुळे बीआरटी/स्थापत्य. त्यांच्याकडे रस्ता आहे. तात्काळ उद्याच्या उद्या ऑर्डर निघून त्यांची जिम्मेदारी फिक्स होईल. त्यांनी त्यांच्यावर डोळ्यात तेल घालून रात्रंदिवस पहारा ठेवावा. त्यांच्या निदर्शनास आले की, असे होते आहे तर त्यांनी तात्काळ निदर्शनास आणून द्यायचे आहे. अन्यथा संबंधित जे.ई., डेप्युटी याच्यावर शिस्तभंगाची कारवाई करण्यात येईल असे परिपत्रक काढू आणि त्यांच्यावरही कारवाई करु हेही मी याप्रसंगी सांगू इच्छितो.

**मा.सिमा सावळे** - मा.आयुक्त साहेब, तुम्हाला विभागीय आयुक्तांनी पत्र दिले होते का

**मा.आयुक्त** - मा.महापौर साहेब, सर्व सन्मा. सभागृह, मॅडम विभागीय आयुक्तांच्या पत्राची गरज नाही. त्यांनी तोंडी सांगितले तरी आपण ब-याच गोष्टी करतो.

**मा.सिमा सावळे** - मा.महापौर साहेब, हे अजिबात योग्य नाही. पत्राची गरज नाही म्हणजे काय.

**मा.महापौर** - आयुक्त साहेबांचे बोलून झाल्यानंतर तुम्ही बोला.

**मा.आयुक्त** - मा.महापौर साहेब, विभागीय आयुक्त माझे वरिष्ठ आहेत. मी जबाबदार अधिकारी आहे. मी सभागृहासमोर खोटे बोलणार नाही. असे तुमचे म्हणणे योग्य नाही. असे बोलायचे नाही. आपण राईटींगमध्ये घेऊन या. मी यापुढे सांगू इच्छितो की, यापुढे आपल्या अधिकारी/कर्मचा-यांची जबाबदारी कशी फिक्स होणार आहे ते सांगतो. विनापरवाना आपली फसवणूक करतात आणि आपल्या शहरात अशी खोदाई करत असतील तर त्यांच्याही विरुद्ध, ते कोणत्याही कंपनीचे केबल टाकत असू देत. कोण केबल टाकतोय याच्याशी मला देणेघेणे नाही. त्यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल करता येईल. सबलेट सबलेट कोणीतरी टाकतो. त्यामुळे ज्या कंपनीची केबल असेल त्या कंपनीविरोधात तात्काळ गुन्हा दाखल करता येईल. (सभागृहात गोंधळ)

**मा.महापौर** - सर्वांनी खाली बसा. आयुक्त साहेबांचे बोलून झाल्यानंतर तुम्ही बोला.

**मा.आयुक्त** - महत्वाचा विषय आहे. म्हणून मी सगळ्या गोष्टींवर काय-काय करता येईल ते सांगतोय. अशी व्यवस्थित स्ट्रॅटेजी ठरवली तर आपल्या अधिकारी/कर्मचा-यांची जिम्मेदारी फिक्स होईल. जे अनधिकृतपणे केबल टाकत आहेत, त्यांच्यावर आपण कंट्रोल केला असे होईल. आणि आपण त्यांच्याकडे ऊठसूठ येऊन गावात खोदाई केली आणि जनतेला त्रास दिला असे होणार नाही. म्हणून मी पुन्हा एकदा स्पष्ट करतो की, अश्या ज्या काही कंपन्या आहेत, कुठलीही कंपनी असेल व्होडाफोन असेल किंवा शासकीय कंपनी असेल एमएसईबी असेल,

एमएनजीएल असेल किंवा बीएसएनएल असेल, ऑफीशियली करुच. आपण दंडाची सुद्धा तरतूद यात ठेवू. दंड लावणे, ते रेग्युलराईड करणे, एफआयआर दाखल करणे या दोन तीन गोष्टी आपल्याला करता येतील. मी सभागृहाला महत्वाचा मुद्दा पुन्हा एकदा सांगू इच्छितो की मी ऑफीशियल परवानगी देतो त्यासाठी प्रभागनिहाय दहा कोटी ठेवले आहेत. आपण त्याला २१ तारखेला मंजूरी देणार आहात. त्यामुळे मी परत सभागृहाला हे सांगू इच्छितो की, हे १० कोटी प्रभागाला दिले आहेत. त्यांनी तिकडे परवानगीची खोदाई समोर झाली की लगेच चौकशी करायची आहे. यापुढे मी हेही सांगू इच्छितो की, आपले एक्झिक्युटीव्ह इंजिनिअर आहेत त्यांनी विदाऊट चौक रस्त्याच्या सेंटरला अशी खोदाई न घेता रस्त्याच्या कडेला आणि जास्तीत जास्त फुटपाथच्या कडेलाच खोदाई करावी अशी आम्ही सोय करणार आहोत. त्यांना ऑलरेडी सूचना आहेत. परंतू लेखी सूचना काढण्यात येतील. सगळ्यात महत्वाचे पुढचे सांगतो, त्यात महापालिकेने काय काय काळजी घेतली. आपण ज्या प्रायव्हेट कंपन्या आहेत, रिलायन्स, व्होडाफोन आणि भारती हे परवानगी मागायला आलेतर आपण ऑफीशियली परवानगी कशी घ्यायची याची प्रोसिजर सांगतोय. यात आपण महापालिकेचा कसा फायदा करुन घेतला आहे याचीही प्रक्रिया सांगतो. जे परवानगी मागतच नाहीत त्याबद्दल मला इथे काही बोलता येणार नाही. मा.सिमाताई सावळे यांनी, मा.ऊबाळेताईंना सांगितलेली आकडेवारी मी रिपीट करत नाही. एमएनजीएल यांना ४५ किमी. ची परवानगी दिली. एमएसईबी यांना २७ किमी. परवानगी दिली. रिलायन्स यांना २१ किमी., व्होडाफोनला २ किमी. भारती एअरटेल यांना .२० किमी. यामध्ये मी हे सांगू इच्छितो की, राज्य शासनाने १ एप्रिल २००६ मध्ये एक जीआर काढला होता. अशा आपण दोन प्रकारच्या केबल टाकतो. एक नेटवर्कींगसाठी आणि बाकी गॅस किंवा एमएसईबीच्या लाईन्स. नेटवर्कींग टाकणा-या अभिकरणांना,संस्थांना भागधारकाचे हक्क देण्याचे शासनाचे धोरण यात आहे. या धोरणाप्रमाणे त्यांनी ॲग्रीमेंट केले. त्यात त्यांनी ३.१ मध्ये चार्ज दिला आहे. ते म्हणतात अशा कंपन्यांना तुम्ही तुमच्या रेटप्रमाणे खोदाईची परवानगी द्या तथापि त्यांच्याकडून काही गोष्टी फुकट करुन घ्या. त्यात त्यांनी आपल्याला टू एमबीपीएस कनेक्शन द्यावे. शासकीय कार्यालये, निमशासकीय कार्यालये, महापालिकेची नव्हे. इतर सुद्धा शासकीय कार्यालये. ते जिथे डक टाकतात तिथे शासकीय कार्यालय असेल तर त्यांनी कनेक्टीव्हीटी द्यावी. रिलायन्स यांनी २ एमबीपीएस करुन दिले, २ एमबीपीएस आम्ही आमच्या स्तरावर करुन घेतले आहे, याची मा.सभागृहाने नोंद घ्यावी अशी माझी विनंती आहे आत्ता जसे शेट्टी साहेबांनी सांगितले,आपले स्वतःचे डक पाहिजेत. आणि आपण या सगळ्या कंपन्यांना त्यात परवानग्या दिल्या पाहिजेत. चांगली आयडीया आहे. आपण काँक्रीटचे रोड करु त्यावेळी असे डक करुन टाकू. ज्यावेळी नवीन रस्ता होईल त्यावेळी असे डक टाकता येतील. आपले स्वतःचे डक होईपर्यंत रिलायन्स कडून ॲडीशनल डक करुन घेऊ. त्यामुळे रिलायन्स जिथे जिथे ३०/४० किमी. मध्ये डक टाकले तेव्हा तो महापालिकेचा डक म्हणून राहील. याची

जिम्मेदारी पोमण साहेबांकडे दिलेली आहे. त्याप्रमाणे आपल्य़ाला व्यवसाय करता येईल. कोणीही परवानगी घ्यायला आला की, त्याला सांगता येईल, तुला परवानगी देतो. डक कशाला टाकतो. रेडिमेड डक आहेत. त्याचे भाडे आम्हाला दे. ती सुद्धा ऍडीशनल सोय सर्वांची परवानगी घेऊन करुन घेतलेली आहे. एक दीड महिन्यांपूर्वीच त्या कंपनीला दिलेले आहे. त्याप्रमाणे त्या कंपनीने ऍग्रीमेंट करुन घेतले आहे. आपण त्यांना नेहमीप्रमाणे परवानगी देतो आहोत. जे रिलायन्स यांच्याबाबतीत केले आहे, हेच आपण व्होडाफोन, एअरटेल जे कोणी फोर-जी वाले आहेत त्यांच्याबाबतीत हाच निर्णय केला आहे. आम्ही शासन म्हणून तुमच्या शासन जी.आर प्रमाणे, शासन धोरणाप्रमाणे ज्या नेटवर्क कंपन्या आहेत, त्यांच्यातील महत्वाच्या दोन अटी तुम्हाला इथे सांगितल्या आहेत. त्याप्रमाणे त्यांच्याकडून वाढीव सोर्स सुविधा घेतो आहोत. ज्या शासकीय किंवा शासनाच्या अंडरटेकींग कंपन्या आहेत त्यांनी सुद्धा इथून पुढे विनापरवानगी काम करावे अशी अपेक्षा नाही. कांबळे साहेब उद्या लगेच त्यांची मिटींग बोलवा, आपण त्यांना लेखी पत्र देऊ. त्यांची मिटींग घेऊ. ते म्हणतात, आम्हाला माहित नाही,साहेब. आमच्या खालच्या मंडळींनी केले. कुणीतरी लोकल माणसाने केले. हे आमची ऐकून घ्यायची तयारी नाही. हा त्यांचा हेडॅक आहे. त्यांनी शहरात काम करायचे असेल तर प्रोफेशनली काम करावे आणि प्रोफेशनली परवानगी घेऊनच पुढे जावे, या मताचे आम्ही पण आहोत. सभागृह सुद्धा आहे. सभागृहाच्या भावनांची जाणीव आम्हाला आहे. त्यामुळे त्याप्रमाणे पुढे चाललो आहोत. सभागृहाने त्याप्रमाणे निर्णय घ्यावा.

**मा.अजित गव्हाणे** - मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सर्व सन्मा.सभागृह, याठिकाणी खुलासा केला आहे. प्रशासनाने हा विषय सभागृहापुढे आणला आहे यामागील आपण आपली भूमिका स्पष्ट केली आहे. महाराष्ट्र शासनाच्या आणि केंद्र शासनाच्या अंडर ज्या संस्था काम करतात, त्यांच्यासाठी हा दर देण्याबद्दलची तुमची प्रशासनाची जी भूमिका होती, म्हणून हा विषय पुढे आले आहे. दुसरे म्हणजे खाजगी व्यावसायिक,केबल टाकणारे लोक यांचा वेगळा दर आहे. यात समाजाच्या भावना सर्वांच्या लक्षात आल्या आहेत. जे बोलतात किंवा बोलले नाहीत. सर्वांना वाटते, यात जे काम व्हावे ते नियमाप्रमाणे व्हावे. महापालिकेला त्यातून उत्पन्न मिळावे. मा.आयुक्त साहेब, यातील एक भाग असा आहे की, आपण खूप जास्त दर ठेवला तर चो-या होतात. त्यातून लोकांना नियमबाह्य काम करायची संधी मिळते. केबल टाकत असताना अनेक ठिकाणी रस्त्याची लांबी कमी दाखवली जाते. प्रत्यक्षात जास्त खोदाई केली जाते. तुमच्याकडे यंत्रणा नाही. तुम्ही जरी आत्ता म्हणत असताल की आमच्याकडे स्थापत्यची लोकं आहेत. ती सुद्धा काम करणारी माणसे आहेत. त्याठिकाणी काम करताना त्यांना कशा पद्धतीने काम करावे लागते. याची कोणी माहिती घेतली की नाही ते माहित नाही. परंतू त्यांच्याशी चर्चा केलीतर कोणीही येऊन दादागिरी करतो, आणि दादागिरी केल्यावर त्यांना तिथून गपचूप जावे लागते. आणि पोलिस कंम्पलेण्ट करायची सुद्धा हिंमत आपल्या अधिका-यांत नाही. कधी-कधी

मा.श्रीकर परदेशी साहेबांची सुद्धा आठवण येते. इतकी अनधिकृत बांधकामे या शहरात झाली नसती पण दूर्दैवाने या शहरात हे घडते आहे हे अत्यंत दूर्दैवी आहे. आणि आपण हे कितपत थांबवू शकतो ते माहित नाही. नागरीकांसाठी या सुविधा गरजेच्या आहेत. भले ते त्यातून व्यवसाय करत असतील. पण नागरीकांच्या दृष्टिकोणातून विचार केलातर ते घेणे बंधनकारक आहे. मा.उल्हास शेट्टी यांनी मुद्दा मांडला की, आपले स्वतःचे डक टाकले पाहिजेत. पण इथून पुढील काळात तसे प्लॅनिंग आपण केले पाहिजे. ज्या-ज्या रस्त्यावर आपल्याला वाटते, तिथे आत्तापासून प्लॅनिंग केले पाहिजे. सगळ्या शहरभर अशा पद्धतीने जर डक केलेतर त्यातून महापालिकेला चांगले उत्पन्न मिळू शकते. हे सगळे करत असताना तुम्ही दर मात्र त्या कंपन्यांना परवडतील याचाही विचार करावा. शेवटी कोणतेही काम करत असताना दोन पैसे मिळावेत या हेतूने काम करत असतील. जर आपण दर खूप जास्त ठेवले तर अशा प्रकारे चुकीच्या प्रवृत्तीला खतपाणी घातले जाते. चुकीच्या प्रवृत्ती समाजात वाढीस लागतात. आज जो तरुण वर्ग आहे त्यांच्यापुढील आदर्श या सगळ्या गोष्टी बदलत आहेत. आम्ही सुद्धा नगरसेवक म्हणून काम करतो. तुम्ही सुद्धा अधिकारी म्हणून काम करता. आमचेही काही मित्र हा व्यवसाय करतात. व्यवसाय करणारे खूप आहेत. याबद्दल आमचे बिल्कूल दुमत नाही. परंतू व्यवसाय करत असताना एक चांगला मेसेज पुढील पिढीपुढे गेला पाहिजे. अशा प्रकारचा व्यवसाय त्यांनीही करावा. आणि शहरात एका चांगल्या प्रकारचे वातावरण रहावे. कारण यातून गुन्हेगारी प्रवृत्ती वाढते म्हणून दर परवडतील असे ठेवावेत. आपल्या अधिका-यांना चांगले अधिकार द्यावेत. आणि जर कोणी त्रास देत असतील तर तुम्ही प्रमुख म्हणून खंबीरपणे त्यांच्या पाठीशी उभे राहिले पाहिजे अशी अपेक्षा यानिमित्ताने व्यक्त करतो. धन्यवाद.

**मा.आर.एस.कुमार** - मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सर्व सन्मा.सभागृह, आयुक्त साहेबांनी उत्तर परफेक्टली दिले आहे. त्यांनी दिलेल्या उत्तराप्रमाणे काम झालेतर सभागृहात कोणी बोंबही मारणार नाही. पण होते काय बीटनिरीक्षक असताना सुद्धा अनधिकृत बांधकाम होते का नाही ते सांगा. त्यांच्यावर काय कारवाई केलीत. तुम्ही बीट अधिकारी अपॉईंट केले आहेत. त्यांच्यावर काय कारवाई केलीत. प्रश्न काय आहे, तुम्ही इथे फार रोझी पिक्चर देताय. तशी पिक्चर नाही. तुम्ही बीट अधिका-यांकडून सगळे रेकॉर्ड नोंदी घेताय. पण तुम्ही बीट अधिकारी एक्झिक्युट करायला पाहीजेत. तुमच्या आयडीयाज चांगल्या आहेत. But that should be implemented to the bottom. पण तसे होत नाही. इथेच सगळा प्रॉब्लेम आहे. ज्या कंपन्या आहेत त्यांच्याकडून आपल्याला ग्रुप बीपीपीएस फ्रि ऑफ चार्ज मिळणार असे तुम्ही म्हणालात. एअरटेलचे फोर-जी झाले आहे. आपण त्यांच्याकडून घेतले का. मी सिटी इंजिनिअर यांना सगळ्यांना फोन करुन सांगितले. जोपर्यंत ते टूबीपीपीएस आपल्याला मिळत नाही. तोपर्यंत तुम्ही पुढील ऑर्डर देऊ नका. आमचे कोण ऐकतो. तुम्ही टर्मस् ॲण्ड

कंडीशन्समध्ये घातलेले आहे की, इतके बीपीपीएस फ्रि ऑफ चार्ज दिले पाहिजे. ज्यांचे नाही त्याबद्दल मी बोलू शकत नाही पण एअरटेलची जाहिरात सगळीकडे पेपरमध्ये येते आहे. मग एअरटेलकडून न घेता तुम्ही फर्दर परमिशन देताय. तुमची जितकी क्वांटीटी फ्रि ऑफ चार्ज वापरायला मिळायला पाहिजे, ते मिळत नाही. तुम्ही परवानग्या देत जा. आणि आपल्या टर्मस् ॲण्ड कंडिशन्सप्रमाणे फ्रि ऑफ चार्ज मिळाले पाहिजे. ते मिळत नाही. अंडर कोऑर्डीनेशन पाहिजे. पहिल्या दिवशी एक कंपनी, दुस-या दिवशी दुसरी कंपनी, तिस-या दिवशी तिसरी कंपनीस चौथ्या दिवशी चौथी नंतर एमएसईबी. साहेब,हे काय चालले आहे. हे सगळे कामाचे कोण करणार. तुम्ही कुठेतरी कोऑर्डीनेशन ठेवावे. या वर्षात कोणकोणती कंपनी कुठे कुठे काम करणार, त्याचे डांबरीकरण कसे करणार. फूटपाथ कसे बांधणार. काही नाही. कसेही काम चालते. फूटपाथ खोदून पडले असतील तर या चार पाच कंपन्यांपैकी एक कंपनी ते करते बाकी चार कंपन्या करत नाहीत. ते काम कोण करणार. त्यांचे करायचे असेलतरी केबल टाकणारा माणूस डांबरीकरण चांगले करु शकतो का. फूटपाथ रिपेअर करु शकतो का. म्हणून आपल्या इन्फ्रास्ट्रक्चरमध्ये जे अधिकारी आहेत त्यांनी बरोबर काम केले तर,पण होते काय. तुम्ही इम्प्लिमेंटेश एक्सप्लोअर करता, त्याचे प्रेझेंटेशन करता. पण काम काही होत नाही. त्याचा उपयोग होत नाही.

**मा.सिमाताई सावळे** - मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सर्व सन्मा.सभागृह, मा.आयुक्त साहेब, आपण आत्ता सांगितले की, विभागीय आयुक्तांची लेखी परवानगी आपल्याला लागत नाही. आपल्या एका निर्णयाने कोट्यावधी रुपयांचे नुकसान झाले आहे. त्याचे आपण काय करणार आहात ते सुद्धा तुम्ही सांगितले पाहिजे इतक्या बेजबाबदारपणे आपण उत्तर दिले नाही पाहिजे. दोन ओळींचे पत्र  त्यांच्याकडून निश्चित घेतले पाहिजे. ९५००/- मध्ये ज्यांना सूट दिली. त्या सगळ्या लोकांकडून मागची पूर्ण रक्कम भरुन घ्या. नवीन काही सुट द्यायची असेलतर सभागृहासमोर तसा विषय आणा. सभागृहाला कळू द्या तुम्ही काय करताय ते सगळ्यांचे म्हणणे आहे की, लोकांच्यासाठी, लोकांच्यासाठी, लोकांच्यासाठी तर ही संस्था सुद्धा लोकांसाठीच आहे, लोकांच्या पैशांतून चालते. लोकांच्या पैशांचे रक्षण करण्यासाठी ट्रस्टी म्हणून आमची निवड झाली आहे. किंवा आम्ही निवडून येतो. आम्ही ट्रस्टी म्हणून निवडून येतो तर आम्हाला सुद्धा या ट्रस्टची तेवढीच काळजी असली पाहिजे. जेवढी आपण लोकांच्या नावाखाली होणा-या प्रॉफीटची काळजी करतो. झालेले नुकसान आहे ते सर्व कंपन्याकडून पहील्याप्रथम वसूल करावी. तसेच रिपीट यात तुम्हाला सूटच द्यायची असेल, आणि आमच्या सगळ्यांची संमती असेल, आमची निश्चितपणे त्याला संमती नसेल. परंतु तुम्हांला करायच असेलतर विषय परत सभागृहापुढे आणावा. जर तसे झाले नाहीतर जे काही पुढे होईल त्याला आपण स्वतः जबाबदार असाल एवढेच याठिकाणी सांगते, थांबते, जयहिन्द जय महाराष्ट्र.

**मा.सुलभाताई ऊबाळे** - मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सर्व सन्मा.सभागृह, हा काय कोणाचा वैयक्तिक विषय आहे. सगळ्या महानगरपालिकेचा विषय आहे. मा.महापौर साहेब, आम्ही तुम्हाला कोणत्याच विषयावर त्रास देत नाही. आणि एखादे चुकीचे झालेचतर त्या विषयावर बोलतो. मा.महापौर साहेब, आयुक्त साहेबांनी जे काही सांगितले ते त्यांच्या स्वभावाप्रमाणे ते बोलले. त्यात त्यांचा काहीही दोष नाही. मागचे धुणे धुवायला त्यांना आवडत नाही. मागे जे झाले आहे त्याबाबतीत त्यांची जबाबदारी येत नाही ते बरोबर आहे. परंतू आपल्या सर्वांची जबाबदारी येते. याची चौकशी झाली पाहिजे अशी आमची साधी मागणी आहे. आम्ही लगेच म्हणत नाही की आम्हाला कुणाला फासाला द्या. ते होणार नाही. असे कुणाला वाटू नये, जब सैंया होवे कोतवाल फिर डर काहे का. मा.आयुक्त साहेब, माझी फक्त आपल्याला नम्र विनंती आहे की, हे झालेले आहे. ते बदलता येणार नाही. तुम्ही कुठेही जाऊन बघू शकता. बीट निरिक्षक काय, आपल्या घरात जर कुणी बाहेरचे येऊन नॉक करायला लागला तरी घरातल्या माणसांना कळते. महापालिकेच्या क्षेत्रात जे अधिकारी काम करता, जे.ई. असतील, सर्वेअर असतील, कोण आपला रस्ता खणतोय हे कुणाला कळत नाही हे म्हणणे खूप सोप्पे आहे. म्हणून मी गांभिर्याने तुम्हाला सांगते की, याची चौकशी व्हावी. वेळप्रसंगी गुन्हे दाखल व्हावेत. आणि तुम्हाला हे जमत नसेलतर आम्ही प्रायव्हेटरित्या हे गुन्हे दाखल करू. परंतू तुम्हाला यात घेऊन तुम्हाला लेखी देऊन आम्ही गुन्हे दाखल करू त्यामुळे कृपया मा.महापौर साहेब, यातून आपल्याला पैसे मिळणार आहेत, उत्पन्न मिळणार आहे. मला माहिती आहे की मा.मंगलताई कदम या सुद्धा या विषयाला सहमत असतील. कारण त्यांची सुद्धा तेवढीच जबाबदारी आहे. त्या कुठल्याही दबावाखाली हे करत नाहीत. त्यामुळे त्या सुद्धा निश्चितपणे चौकशीचीच मागणी करतील. आपण ठराविक पिरीयडमध्ये आपल्याला हा विषय थंड करुन खायचा नाहीतर गरमागरम करुनच हा विषय पुढे न्यायचा आहे. तरी या विषयाची त्वरित चौकशी करा.

**मा.प्रशांत शितोळे** -मा.महापौर साहेब,मा.आयुक्त साहेब,सर्व सन्मा.सभागृह,मा.आयुक्त साहेबांनी याबाबतीत खुलासा केला आहे की, शासकीय व खाजगी कंपन्यांच्याबाबतीत वेगवेगळी धोरणे आहेत. महापालिकेला कुठल्या गोष्टीचा तोटा आहे आणि आपण कुठल्या गोष्टीचे पैसे भरुन घेतोय याचे स्पष्टीकरण देण्याचा त्यांनी प्रयत्न केला आहे. चोरीच्या बाबतीत चोर कोण असतो हे नक्कीच महापालिकेला समजत नाही. परंतू त्याचा भूर्दंड असतो तो महापालिकेला सहन करावा लागतो आहे. माझी सूचना आहे की, मी याबाबतीत कालच बजेटच्या निमित्ताने बोललो की, एमएसईबी संपूर्ण महापालिकेला कमर्शियल रेटने चार्ज करते. आपण जर त्यांना सवलत देत असू, आपल्या दृष्टीने ते शासकीय संस्था आहेत तर आपण कोण आहोत. सगळीकडे देऊ नका. महापालिकेची किमान रुग्णालये व ज्या शाळा आहेत त्यांना तरी किमान रेसिडेन्शियल दराने दिले पाहिजे. आज सगळ्यांनी सांगितले, विजेचे हे दर बरेचसे वाढले आहेत. आज एकही

युनीट आपला एक्सप्रेस फिडर सोडता सगळे दर ८.१० पैसे युनीट च्या पुढे दर आहेत. ते त्यांच्या दरात आपल्याला सवलत देत नसतील, जरी त्यांचा वन टाईम जॉब असला तरी आपण तो दर इतरांना रु.६.५०/- प्रमाणे लावतो, त्याची जर तुलना केलीतर आपला रेव्हेन्यू बुडणार आहे. त्यामुळे आपण जी सवलत मागतोय, ती तुटपुंजी सवलत मागतोय. माझी या निमित्ताने एक सूचना राहील की, आपले एक्सप्रेस फिडर कुठे असतील, डब्ल्यूटीपी व एसटीपीला असतील किंवा आहेत. त्या व्यतिरिक्त रुग्णालये, सर्व प्रकारच्या स्ट्रक्चर असणा-या इमारती म्हणजे शाळा असेल,आपली ऑफीसेस असतील, सगळ्या इमारतींना स्वीटलाईन असेल ती जाऊ द्या. पण यांना त्यांनी ५० टक्के सवलत द्यावी. त्यांचा ५० टक्के दर कमी करावा. त्यांचेही नुकसान झाल्यासारखे वाटू नये. मा.आयुक्त साहेब, तुम्ही मला आज सांगा, गेल्या ४/५ वर्षांत एमएसईबी,संबंधीत मंत्रालय, विभागीय आयुक्त कार्यालय, पुणे महानगरपालिका आणि आपण यांच्यात गेल्या अनेक वर्षांत अनेक बैठका झाल्या. आत्ता परिस्थिती ही आहे की, हे लोक पैसे भरत नाहीत. म्हणून तो कॉन्ट्रॅक्टर अर्धवट काम सोडून जातोय. त्यामुळे आपल्या शहरात बकालपणाची परिस्थिती वाढायला लागली आहे. पण हे चालू होताना याकडे सुद्धा दुर्लक्ष होता कामा नये एमएसईबीचे काम चालू झाले की विक्रम जव्हेरी सारखा माणूस येतो आणि त्यात त्याची केबल टाकून जातो. त्यामुळे अशा चोरांवर मोर असलेल्यांवरसुद्धा आपल्याला लक्ष ठेवणे तेवढेच गरजेचे आहे. काल बराच वेळा झाला होता म्हणून मी बोलू शकलो नाही. मी काल बरेच रेव्हेन्यू मॉडेल आणले होते. नवी मुंबई महापालिकेत त्यांचे सगळे टॉवर रस्त्यांवर लावलेले आहेत. खाजगी परवानगीच देत नाहीत. आज त्यांचे रेव्हेन्यू मॉडेल आहे. आज पिंपळे सौदागरमधल्या केबलवाल्यांच्या,टॉवरच्या किती तक्रारी आहेत. प्रत्येक सोसायटीची केबलवाल्याची तक्रार आहे. त्याचे व्हिरिफिकेशन होते, जनरेशन, वायब्रेशन होते. माणसाच्या शरीरावर विपरीत परिणाम होतात. या लोकांना फक्त सरकारी जागेत परवानगी द्या. एका टॉवरला वीस ते पंचवीस हजार भाडे आहे. आज काल तर इतके मॉडर्न टॉवर आले आहेत, त्याची उंची आपल्या हायमास्क एवढी ३५ मी. असते. आणि त्या टॉवरवर सगळ्या कंपन्यांचे बीच असतात. एकदम हाटटेक आहे. एका सोसायटीला लाख, दोन दोन लाख इतके भाडे आहे. शहरात अलाऊड करु नका. आपल्या महापालिकेच्या उत्पन्नाचे साधन होईल. आपण जर त्यांना परवानगी देत असूतर त्यांचे सगळे टॉवर महानगरपालिकेच्या मोकळ्या जागेतच झाले पाहिजेत. म्हणजे कोणाची तक्रार येण्याचे काही कारणच नाही. रेव्हेन्यूच्या माध्यमातून अतिशय चांगली गोष्ट तुम्हाला उपलब्ध होईल. या गोष्टीकडे व्यावसायिक नजरेने बघितले तर अतिशय चांगले आहे. परंतू अशा प्रकारच्या गोष्टींना आमच्याकडे परवानगीसाठी यावे लागत असेलतर,त्याचे दर कमी करा म्हणून यावे लागत असेलतर आपल्या शहराचा बकालपणा सुद्धा वाढल्याशिवाय राहणार नाही. तुम्ही सांगितलेले स्पष्टीकरण जरी योग्य असले, शहरात बीएसएनएल, एमएनजीएल यांची कामे अपेक्षित असली, त्यांनी मागणी जरी केली असली तरी,

बीव्हीजीची वर्क ऑर्डर दोन अडीच वर्षांपूर्वीची नविन गव्हर्नमेंट येण्याआधीची आहे. परंतू आज परिस्थिती अशी आहे की, आज सुद्धा त्यांच्याकडून काम संपले जात नाही. एमएसईबी व महापालिका यांच्यातला ताळमेळ आजदेखील बसलेला नाही. तुमच्या अनेक बैठका होऊनदेखील त्या रेटमध्ये कुठेही तारतम्य आले नाही, तुमच्यात कुठेही एकमत झाले नाही. तुम्ही सांगायचे ६,५००/- ने भरा. एमएसईबीने सांगायचे आमची अजून प्रोसेस झालेली नाही. आमचे अजून टेंडर झालेले नाही. त्या कॉन्ट्रॅक्टरने पैसे भरायचे का नाही भरायचे हे ठरवायचे आहे. यात त्यांच्या-त्यांच्यात पण वाद होते. म्हणून हा सगळा घोळ झालेला आहे. त्यामुळे तुम्हाला पॉलिसी डिसिजन म्हणून सरकारी कंपन्यांसाठी सवलतीचे दर करावेत म्हणून हा दर ठेवलेला आहे. सवलत नक्की द्या. पण आत्ता जसे मा.अजित गव्हाणे यांनी सांगितले की, फार हायर रेट असतील तर तुमच्याकडे चोरी शंभर टक्के होणार. सरकारी कामावरचे नियंत्रण, खाजगी कामावरचे नियंत्रण हे आपल्याला कंट्रोल करावे लागेल. आत्ता मा.सिमा सावळे यांनी मागणी केली त्याप्रमाणे दक्षता समितीकडून याची चौकशी करा. भविष्यात, ज्या-ज्या गोष्टी या समितीकडून करता येऊ शकतील,ज्या-ज्या गोष्टी पारदर्शकपणे करता येऊ शकतील त्याकडेही लक्ष राहू द्या. प्रत्येक गोष्ट व्यावसायिकपणे बघितली तर महापालिकेचा तोटा कमी होईल. सरकारी यंत्रणा म्हटले की तोटा कमी असतोच. पण त्याचे प्रमाण बघितले तर त्याचे प्रमाण कमी करणे, त्याची गळती कमी करणे हे सुद्धा तुमचे एक प्रमुख काम आहे. किंवा विश्वस्त म्हणून आमचे सुद्धा काम आहे त्यामुळे तुम्ही ते करावे अशी मी तुम्हाला एमएनजीएल व एमएसईबी यांच्या विषयाच्या निमित्ताने विनंती करतो. एमएनजीएल बाबतीत तुम्ही एक चांगली गोष्ट सांगितली की, भविष्यात आपण स्मार्ट सिटी होऊ पाहणार आहोत. मुळात आहोतच. पण उद्याच्या काळात नागरीकांना बाकी सगळ्या त्रासाच्या गोष्टी कमी होणार आहेत. त्यातून इंधनाची बचत होणार आहे. त्यांच्या पैशांची बचत होणार आहे. आम्ही जेव्हा एमएनजीएलच्या अधिका-यांकडे बसलो तेव्हा आम्हाला सांगण्यात आले की, या सिलेंडरच्या सप्लायच्या तुलनेत किमान दोनशे, अडीचशे रुपयांची प्रत्येक महिन्याला बचत होईल. ती सीएनजीच्या माध्यमातून राहील. जर एवढा मोठा फायदा शहरातील प्रत्येक नागरीकाला होणार असेलतर मग आपण त्यांना शंभर टक्के सहकार्य केले पाहिजे. केबल हा विषय वेगळा आहे. एमएसईबी हा विषय वेगळा आहे, आणि एमएनजीएल हा विषय वेगळा आहे. तिघांनाही तिन्ही नजरेतून आपल्याला बघावे लागेल. मात्र आपल्याला नक्की विचार करावा लागेल. याचा प्रत्येक उपभोक्ता हा आपल्या शहरातील नागरीक, म्हणजे प्रत्येक जण हा असणारच आहे. पण याचे कनेक्शनच डायरेक्ट त्याच्या घरापर्यंत जाणार. त्यामुळे त्याचे कनेक्शन किती आहे, हाऊसहोल्ड किती आहे. तुम्हाला उद्या करसंकलनला गेल्यावर डेटा मॅच करताना याची मदत होणारच आहे. आज तुम्ही सुरुवात केली आहे. तुम्हाला भविष्यात एकमेकांचे कोऑर्डीनेशन हे लागणारच आहे. एमएनजीएल बाबतीत माझे मत शंभर टक्के अनुकूल राहील की, आपण

सवलतीचा दर एमएनजीएल सारख्यांना दिला गेला पाहिजे. एमएसईबीबाबतीत आपण सर्व एकमताने, कुणालाही अडचण होणार नाही. आता काय झाले आहे, आत्तापर्यंत सभागृहातील प्रत्येकाच्या चर्चेतून एक जाणवते की, खाजगी व सरकारी यांच्याकडे आपण एकाच नजरेतून पाहतोय. हे वेगवेगळे केलेतर आपल्याला सरकारी संस्था फायदेशीर आहेत. त्यांना निश्चित दर वेगळे ठेवा. मात्र खाजगी संस्थांना कुठेही माफी देऊ नका. त्यांना व्यावसायिकतेने बघा. २ एमबीपीएस हे तुम्हाला दाखवलेले लालूच आहे. पण २ एमबीपीएस म्हणजे महापालिकेला शुल्लक आहेत. आपल्या दृष्टीने तो स्पीड काहीच नाही. पण आजरोजी प्रती कनेक्शन बघायला गेलोतर वाय-फाय सिटी करा. एवढे शेअरींग झाले पाहिजे. काही दिवसांनी तुम्हाला सॅटेलाईटवरुनच सगळे होणार आहे. नंतर केबलची गरज नाही. भविष्यात काही टेक्नॉलॉजी येणार आहे. तोपर्यंत आपल्याबरोबर एमएनजीएल यांचे शेअरींग झाले पाहिजे. केवळ एका वेळचा खोदाई खर्च म्हणून बघा. सगळ्या गोष्टी कॅपेक्स म्हणून बघू नका. कॅपेक्स मधून लॉंगटर्ममध्ये जा याकडे २२ वर्षे, ५० वर्षे उत्पन्नाचे साधन म्हणून बघा. त्यांनी कुठलाही एक वेळेचा खर्च न घेता महापालिकेकडे कायमस्वरुपी उत्पन्न चालू राहील अशी सूचना राहील. मा.महापौर साहेब माझी विनंती आहे की, सरकारी संस्थांच्या दरांच्याबाबतीत सभागृह जो निर्णय घेईल त्याचा अवलंब तात्काळ झाला पाहीजे. शहरात जी विलंबाने झालेली कामे आहेत, त्यांचा मार्ग मोकळा करुन दिला पाहिजे. त्याप्रमाणे आपण निर्णय घ्यावा. धन्यवाद.

**मा.योगेश बहल** - मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सर्व सन्मा.सभागृह, मी पहिले अभिनंदन करेन कारण विभागीय आयुक्तांनी सांगितल्याप्रमाणे तुम्ही तुमचे अधिकार वापरले असतील. परंतू सभागृहाची परवानगी घ्यायला पाहिजे सभागृहासमोर सगळे विषय आणायला पाहिजेत. हा विषय तुम्ही अजेंडावर आणलात म्हणून तुमचे धन्यवाद अनेकांनी चर्चा केली. आणि चर्चेतून या शहरात काय घडते आहे ते सांगितले. अनेकांनी वेगवेगळ्या आठवणी सुद्धा केल्या. त्या आठवणींच्या अनुषंगाने मी सुद्धा सांगू इच्छितो की, सगळ्यांनी सांगितले आहे की अशा गोष्टींना जर कुठेतरी शिस्त लावायची असेलतर मा.श्रीकर परदेशी साहेबांची आठवण येते. पण या महापालिकेचे सौभाग्य म्हणा किंवा दूर्भाग्य म्हणा परंतू कन्क्लूजनला आले तर आम्हाला चांगले अधिकारी भेटले. आता मा.दिलीप बंड साहेबांबद्दल बोलायचे म्हटले तर एक बोल्ड ऑफीसर म्हणून त्यांची गणना करता येईल. He was a really bold officer. डिसीजन घ्यायचा म्हणजे घ्यायचा. त्यानंतर मा.आशिष शर्मा यांच्याबद्दल बोलायचे म्हटले तर Mr.Ashish Sharma was a very calculative & good officer. त्यांच्याबद्दल कधीही दुसरी कसली चर्चा झाली नाही. गुड ऑफिसर म्हणूनच त्यांची गणना होते. मा.श्रीकर परदेशी यांच्याबद्दल बोलायचे झाले तर he was a very disciplined & organized officer. ते खूप स्ट्रीक्ट होते. आणि मा.राजीव जाधव यांच्याबद्दल म्हणायचे तर he is a very clever officer. अशा चार अधिका-यांची तुलना केलीतर यात लोकप्रतिनिधी व आयुक्तांचा सुवर्णमध्ये

जो असतो, त्यासाठी फ्लेक्झिबिलिटी लागते. ती फ्लेक्झिबिलिटी मा.श्रीकर परदेशी यांच्याकडे नेमकी नव्हती. या शहरावर कोर्टाने निर्देश दिले, असा तुम्ही उल्लेख केली की, अमुक-अमुकची कारवाई करा. पाडा, झोडा सुरु झाले. ते अजिबात फ्लेक्झिबल नव्हते. म्हणून आम्हाला आमच्या माजी उपमुख्यमंत्र्यांच्या मागे लागून लागून एकदाची यांची इथून बदली करा तरच या शहरावरचा हातोडा थांबेल. आणि त्यामुळेच आम्हाला त्यांची इथून बदली करावी लागली. त्याचे कारणच असे होते. साहेब तुम्ही क्लेवर आहात, फ्लेक्झिबल आहात, बाकी सगळ्या गोष्टींत चांगले आहात. तुम्ही काही गोष्टी मान्य करता. सुधारणा करायचे पण मान्य केले आहे. आम्ही सुद्धा आम्हाला काही गोष्टी आवडत नाहीत त्या तुम्हाला सांगतो. अजूनही शहरात बेकायदेशीर बांधकामे चालली आहेत ती थांबली पाहीजेत. मी स्वतः पठाणताईंनी, बाकी सदस्यांनी देखील कितीवेळा सांगितले आहे की, शहरात बेकायदेशीरपणे टॉवर उभे राहतात. त्या टॉवरवर माझ्याच एका मित्राने मिलिंद म्हसकरने मेल टाकली आहे. गेल्या तीन महिन्यांत त्याने तुमच्याकडे एकाच टॉवरवर सहा सात मेल टाकल्या असतील. तो स्वरगंगामध्ये राहतो. त्याने आयुक्तांच्या नावाने सारथीवर मेल टाकली आहे. संबंधित एनक्रोचमेंट डिपार्टमेंटला मेल टाकली आहे. मी वॉर्डातल्या इंजिनिअर लोकांना सांगितले आहे. तरी तिथे कोणी थांबवायला गेले नाही. मुळात म्हाडाची जागा त्याला अधिकृतपणे बांधकाम करायला मिळाले तर त्याने ६५० फूटाचा डोलारा उभा केला. त्याने त्या तीन मजल्यांवर टॉवर उभा केला आहे. इतके बेकायदेशीर बांधकाम केले आहे. अशा प्रकारे स्वतःच्या मालकीच्या जागेत जरी कोणाला टॉवर उभा करायचा असेलतरी तो महापालिकेच्या परवानगी शिवाय उभा करु शकत नाही. हा कायदा आहे, असला पाहिजे. त्यासाठी त्याने शुल्क भरले पाहिजे. त्या टप्प्यातली फ्लेक्झिबिलीटी त्याने घेतली पाहिजे. एखादी जुनी इमारत असेल, एवढा मोठा टॉवर उभा केला तर, आत्ता मा.प्रशांत शितोळे यांनी सांगितल्याप्रमाणे त्याचा एक वॉईज येतो, त्यातून आजार पसरू शकतात. रात्री एक साऊण्ड येतो. त्याच्या वेव्हज् नी त्या मालकाच्या प्रकृतीवर परिणाम होऊ शकतो त्याचे रिफ्लेक्शन असताना सुद्धा, कंम्प्लेण्ट करुन सुद्धा लोक सर्रास कोणत्याही प्रकारची परवानगी घेत नाहीत. लोक सर्रास टॉवर उभे करतात. शहरात किती टॉवर आहेत. किती परवानग्या घेतल्या ते बघा. ज्यांनी परवानगी घेतली नाही त्यांच्यावर नोटीस बजावा. त्यांनी डेव्हलपमेंट ऑथॉरीटीची परमिशन घेतली पाहीजे. मा.आयुक्त साहेब, फंड माझा असलातरी मी माझ्या मनाने बांधू शकतो का. डेव्हलपमेंट ऑथॉरीटी म्हणून मी नकाशा सगळे परवानगीसाठी तुमच्याकडे देतोच ना. एवढे असून सुद्धा माझा बंगला असला, माझा बंगला परवानगीचा असलातरी कधी पाण्याची लाईन बदली करायची झाली, किंवा पाण्याची लाईन जुनी झाली असेल, तिथून दोन इंची, चार इंची लाईन गेली असेल त्यावेळी आम्ही वारंवार तक्रार केलीतर तेव्हा मी असेल किंवी कोणीही असला तरी आपले अधिकारी रिकरेक्शन चार्जेस भरायला सांगतात. मग नवीन लाईनवर कनेक्शन देतो असे म्हणतात. एखादा भाडेकरु राहणारा असेल

त्याच्या घरात स्वतःची लाईन जरी चोक अप झाली तरी त्याला देखील रिकरेक्शन चार्जेस भरावे लागतात. त्यासाठी तुमची परवानगी घ्यावी लागते. त्यासाठी तुमचा ऑथोराईजड प्लंबर येऊन करतो. सामान्य नागरिकांना एवढी प्रोसिजर फॉलो करावी लागते. अशा पद्धतीने शहरामध्ये कोणतीही कंपनी असेल, लाईन असेल, केबल असेल परमिशन न घेता, आपले रुल्स आणि रेग्युलेशन्स पर्टिक्युलर आहेत का नाहीत ते तुम्ही चेक करा त्याचे रेट फिक्स आहेत का ते तुम्ही चेक करा. रेट किती असावेत यासाठी त्या कंपनीशी चर्चा करा. त्या लोकांशी चर्चा करा. महापालिकेचे नुकसान होता कामा नये. महापालिकेच्या रस्त्यावर पडलेला दरोडा याची चौकशी करा. चालू असलेली चोरी ही थांबवा. दरोडा कुठे कुठे पडला आहे, किती पडला आहे. शहरातल्या किती किती ठिकाणी कोणकोणत्या कंपन्यांनी परवानगी न घेता काम केले आहे. तसे असेलतर ते कट करायचा आपल्याला अधिकार आहे. तुम्ही टॅक्स सोडता का. आता मा.भानुदास गायकवाड दवंडी पिटवत आहेत. अमुक अमुक करा. एवढ्या वेळात भरलातर एवढी बचत होईल. पुण्यामध्ये टॅक्स भरला नाहीतर त्याच्या घरासमोर जाऊन बँड वाजवतात. वसूली करायची आहे तर अशा मोठ्या धनदांगट लोकांना मोकाट सोडून द्यायचे का. काही लोक एजंट पण असतील. काही लोकं यावरचा मलिदा खात असतील तर आपण त्या लोकांना आवरले पाहिजे. मा.महापालिका सभेत हा विषय चार चार वेळा सांगितल्यानंतर सुद्धा होत नाही, तुम्हाला लोकांना सांगितल्यानंतरही त्यावर कारवाई होत नसेल तर आपले जे.ई. काय करतात, आपले बीट निरिक्षक काय करतात. ज्याच्या हाताखाली दोन स्थापत्य सहाय्यक असतात, मुकादम रोज फिरायला बघायला असतो. त्याला माहित नाही का की त्याच्या वॉर्डात काय चालले आहे. तुम्ही इन्स्ट्रक्शन द्या की, जिथे खोदाई चालू असेल तर तुम्ही कशाला थांबून विचारायला पाहिजे की तुमच्याकडे परवानगी आहे का. जर महापालिकेच्या आवारात स्वतःचे घर रिपेअर करायचे झालेतर तुमचे अधिकारी कसे बरोबर येतात. एकाने त्याचे घर गळतेय म्हणून त्याने वरचे सिलींग काढले तर लगेच आपला माणूस गेला त्याने फोटो काढला. लगेच नोटीस दिली की तू काम करु शकत नाही. पुन्हा रिपेअरींगची परवानगी घ्या म्हणून सांगितले असा एका टेनंटपर्यंत माणूस जाऊ शकतो तर शहरात भर दिवसा होत असलेली खोदाई. मी एकदा थरमॅक्स चौकापासून रात्री साडेआठ नऊच्या दरम्यान चाललो होतो. मी मंगलाताईंना फोन करुन सांगितले. मी व मा.उल्हास शेट्टी बरोबर होतो. मागील आठवड्यात इतके चांगले फूटपाथ केले होते. तुम्ही खंडोबा मंदीरापासून थरमॅक्स चौकापर्यंत इतकी स्वच्छता केली इतके चांगले केले आणि ते रात्रीची एवढी खोदाई करत आहेत. काय वाटलं असेल. त्यांनी फोन लावला व सांगितले. मा.उल्हास शेट्टी यांनी फोन लावला. उलट उल्हास शेट्टी यांना दुसऱ्यांचे फोन आले की, तू यात लक्ष घालू नकोस. या बाईंचे काम आहे. हे थांबले पाहिजे. माझे तर म्हणणे आहे, एखाद्या बाईला वर पैसे मिळत असतील तर मिळू देत. आम्हाला टोचायचे काही कारण नाही. पण किमान महापालिकेचे तरी पैसे मिळायला पाहिजेत. कालपरवा माझ्या

घरासमोरून लाईन गेली आहे. ती आता साईमंदीरापासून जाऊन फुलेनगर इथपर्यंत ती पाईपलाईन चालली आहे. आम्ही त्याला अडवले नाही. परवानगी सुद्धा विचारली नाही. परंतू हे काम करत असताना खंडोबा मंदीराच्या शेजारी त्यांनी खोदाई करताना आपली ड्रेनेज व पाण्याची अशा दोन लाईन तोडल्या. दोन दिवस झाले एवढं घाणेरडे पाणी तिथून वाहतेय. मी आज भोसलेंशी बोललो. मा.सुजाता पालांडे यांनी सांगूनसुद्धा ते पाणी दोन दिवसांत वाहायचे थांबले नाही. ते घाणेरडे पाणी सगळ्या सोसायटीमध्ये जातेय. पूलमध्ये जाते. भर रस्त्यात वाहतेय. म्हणजे रस्ता खोदाईचे पैसे नुसते घेऊन जमणार नाही, शिवाय डिपॉझिट ठेवले पाहिजे. ड्रेनेड लाईन, पाण्याची लाईन तोडली किंवा एमएसईबीची लाईन तोडली किंवा इतर सर्वीसेसच्या लाईन तोडल्या तर त्यासाठी त्याने आपल्याकडे ५ लाख किंवा १० लाख डिपॉझिट ठेवले पाहिजेत. संपूर्ण काम झाल्यानंतर त्याचे पैसे आपण रिफंड केले पाहिजेत. विकास व्हायला पाहिजे. स्मार्ट सिटी असेल, मॉडेल वॉर्ड असेल याचे इनकॉर्पोरेशन आपण केलेच पाहिजे. परंतू हे करत असताना या गोष्टीवर कारवाई होणे तितकेच गरजेचे आहे. बारकाईने लक्ष देणे सुद्धा तितकेच गरजेचे आहे. दुसरी गोष्ट सांगायची म्हणजे, आज तुम्ही पाहिलेतर मा.श्रीकर परदेशी असताना अजून एक गोष्ट होत होती. पंचिंग वेळेवर होत होते. दुपारी दोन नंतर टाईममध्ये झोनला, सगळ्या ऑफीसमध्ये सगळे ऑफीसमध्ये दिसायचे. आत्ता तुम्ही पाहिलेतर आपले लोक दिवसभर इथून रॉक्सी, रॉक्सीतून कॅन्टीन, कॅन्टीन मधून इकडे तिकडे सर्रास फिरत असतात. कोणालाही कशाची भिती राहीलेली नाही. त्यांच्यावर कोणाचाही वचक नाही. मा.आयुक्त साहेब, थोडासा डिसिप्लीन पाहिजे. सगळे ऑर्गनाईज पाहिजे. ऑफिस अवर्समध्ये ऑफिसरने ऑफिसर सारखेच वागले पाहिजे. कर्मचा-याने कर्मचा-यासारखेच वागले पाहिजे. आम्ही म्हणतो का त्यांना पाचवा वेतन देऊ नका. सहावा वेतन देऊ नका. बोनस देऊ नका. आम्ही म्हणतो का. त्यांना सगळ्या फॅसिलिटीज द्या. तुम्ही त्यांना कमी दरात हाऊसिंग लोन द्या, एज्युकेशन लोन द्या, व्यवहाराचे कर्ज द्या. मेडीकल फॅसिलिटी द्या. सगळे काही करा. परंतू हे करत असताना शिस्त लावली पाहिजे. ती आपल्याकडून अपेक्षित आहे. ही शिस्त आपण आपल्या अधिका-यांना लावावीत. थोडेसे स्ट्रीक्ट करा. काल मला ताईंना फोन केला होता. त्यांनी सांगितले, अधिका-याला फोन केला होता. तेव्हा तो अधिकारी कसा बोलला. जर त्या अधिका-यावर कारवाई केली असेलतर आमच्यासारख्या प्रतिनिधींनी तुम्हाला विनंती केली. त्याला सस्पेण्ड केले असेलतर दोन आठवड्यांसाठी त्याचे सस्पेन्शन ठेवले पाहिजे. तुम्ही लोकांचा रिस्पेक्ट ठेवल्यासारखे होईल. तुम्ही अधिका-याचाही सन्मान ठेवला आणि प्रतिनिधींचाही सन्मान ठेवल्यासारखे झाले. अजिबात ऐकले नाहीकी श्रीकर परदेशींसारखे होते. असे होऊ नये म्हणून आमची अशी विनंती आहे की, या सगळ्या गोष्टींकडे तुम्ही बारकाईने लक्ष द्या. हे जे टॉवर्स आहेत त्यांची सखोल चौकशी करा ज्या इमारतींना टॉवर लावले आहेत, त्याची फ्लेक्झिबिलीटी त्यांनी आर्किटेक्टकडून घ्यावी. मगच परवानग्या द्याव्यात. अन्यथा

दिलेल्या परवानग्या सुद्धा रद्द कराव्यात, काढायला लावाव्यात. कारण उद्या काही झाले, इमारत कोसळली किंवा तो टॉवर दुसऱ्या टॉवरवर पडला. त्यामुळे आपल्याला आपली जबाबदारी नाकारुन जमणार नाही. जसे टॅक्सबाबतीत होते. टॅक्सबाबतीत पण असेच होते की, स्वतः डिक्लेरेशन करायचे असते की मी या भागात रहायला गेलो आहे. नंतर आपले लोक असेसमेंट करतात. ते असेसमेंटच्या हिशोबाने दर लावतात. ते आपल्याला मान्य असते. तशा पद्धतीचे नागरीकांकडून डिक्लरेशन घ्या. नागरीकांनी केले नाही पण ते आपल्या सर्वेमध्ये आले तर त्याची शहानीशा करणे, सगळे पेपर तपासणे, याला बिल्डींग परमिशन आहे का, याचे बांधकाम अप्रूव्हड आहे का हे सगळे तपासून घेणे ही आपली जबाबदारी आहे. त्यातून महत्वाचे म्हणजे आपला महसूल हा बुडता कामा नये. इमारत जरी माझी असली तरी त्या एरियात लावतोय म्हणून त्याची परवाना फी असली पाहिजे. आपल्या शहरात सुविधा पुरवतोय, मग त्याच्याकडून शुल्क घेतले पाहिजे. आपला एलबीटी बंद झाला आहे, जकात बंद झाले आहे. सगळे उत्पन्नाचे स्त्रोत बंद झाले आहेत. मग जाहिरातींचे फलक असतील, होर्डींग असतील त्यातून चांगले उत्पन्न मिळाले पाहिजे. पाण्याच्या गळतीचे पहा. काल मी, मा.अजित गव्हाणे यांनी सांगितले. दहा-अकरा हजार भरुन कनेक्शन रेग्युलराईज करा. आपण एका कनेक्शनसाठी आठ हजार घेतो. महापालिकेच्या तिजोरीत आठ-साडेआठ कोटी येतील. पिंपरी चिंचवड शहरामध्ये फक्त २२०० अधिकृत कनेक्शन्स नोंद आहेत. मग इतके व्यवसाय होत असतील आणि इतके पाणी वापरले जात असेलतर २२०० लोकच उद्योगधंदा करणारे आहेत का ज्यांच्याकडून आपण बील घेतोय. म्हणजे आपला किती रेव्हेन्यू बुडतोय ते बघा ज्या कमर्शियल प्रॉपर्टीज् आहेत त्यांची असेसमेंट करायला लावा. रेग्युलर असेसमेंट करायला लावा. आपला टॅक्स बुडतोय. आपण एजन्सीला सर्वे करायला दिला आहे, त्यांच्याकडून माहिती घ्या. कमर्शियल कनेक्शन्स किती आहेत. आणि जे घरगुती वापरासाठी वापरत आहेत, त्या सर्वांना कमर्शियल रेटने कनेक्शन्स द्या. या अशा काही गोष्टी आहेत, त्यात you have to be organized, you have to be disciplined अशी विनंती करतो. आणि माझी मा.महापौर साहेब, व सभागृहाला देखील अशी विनंती असेन की, हा विषय दप्तरी दाखल न करता तहकूब ठेवावा. जेणेकरुन आयुक्त साहेबांना देखील त्या लोकांशी चर्चा करता येईल. त्यांचे काय म्हणणे आहे आणि सभागृहाचे काय म्हणणे आहे. त्या हिशोबाने आपण निर्णय घ्यावा. धन्यवाद.

**मा.आशा शेंडगे**-मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब,सर्व सन्मा.सभागृह, तुम्ही मला बोलायची संधी दिलीत तुमचे मनापासून धन्यवाद मानते. कोण काय बोलले, कशावर काय झाले आणि कोणाची मते काय हे मी सांगणार नाही. परंतू मघाशी आयुक्त साहेब तुम्ही कॅज्युअली एक वाक्य सांगितले, विभागीय आयुक्तांनी म्हटले आणि I have to do it. असे तुम्हाला कोणते अधिकार/राईटस् आहेत का की विभागीय आयुक्तांनी तुम्हाला सांगितले आणिyou have to implement. ज्यामध्ये महापालिकेचे आर्थिक हित न राखता तुम्ही ते काम करु शकता. उद्या

मुख्यमंत्री असतील, उपमुख्यमंत्री असतील, किंवा उद्या आम्ही नगरसेवक एखादे काम सांगू जे महापालिकेच्या हिताच्या विरोधात असेल तरी ते तुम्ही करु शकता. इतके कॅज्युअली तुम्ही बोललात. महापालिकेच्या इतक्या उच्च पदावर असताना आयुक्त म्हणून आम्ही तुमच्याकडे स्पेशल व्यक्ती म्हणून पाहतो. आणि तुमच्याकडून अशा प्रकारचे वक्तव्य तेही डायसवर बसून केले जाते. अत्यंत खेदजनक, दुःखद आहे. खरेतर तुम्हाला या विषयावर नोटीस पाठवली तर उत्तर द्यायला विभागीय आयुक्त येणार नाहीत. तुम्हाला उत्तर द्यावे लागणार आहे. आणि आम्हाला ते पाठवण्यात फार मोठेपणा असणार नाही. तुम्ही जर चुकीचे केलेतर आम्ही तुम्हाला सुद्धा नोटीस पाठवू शकतो हे सांगण्याचा हा प्रयत्न आहे इथून पुढे आपल्याकडून सभागृहात अशा प्रकारची कोणतीही चुकीचा घटना घडू नये आत्ता आपण खूप सांगितले हे करणार, ते करणार. मा.आयुक्त साहेब, तुम्हाला आठवत असेल मागील दोन/तीन वर्षे सलग सांगतेय की, तुम्ही युटीलिटी प्लॅन तयार करा. आपल्याकडे स्थायी समितीचे मिनिटस् दिले जात नाहीत. परंतू मी अनेकवेळा हे सांगितले आहे, तुम्हालाही पटले आहे की, आपल्या शहरात ज्या काही युटीलीटी असतात त्यांचा प्लॅन तयार असला पाहिजे. जसे आत्ता मा.सुलभाताई ऊबाळे यांनी सांगितले, मा.योगेश बहल यांनी सांगितले की, ड्रेनेज खोदायला गेले की पाण्याची लाईन फुटते. पाण्याची लाईन टाकायला गेले की आमच्या इलेक्ट्रीकच्या वायरी मध्ये येतात. हे सगळे कुटाणे कुणी सांभाळायचे. आम्हाला नागरीक सांगतात, ताई,आपल्याकडे ड्रेनेजची लाईन टाकली आणि स्ट्रीट लाईट बंद झाल्या. मग एखादा जेई शोधायचा आणि त्याला विचारायचे, लाईट का गेली. तो म्हणणार, ताई, तुमच्याच लोकांनी काम केले. त्या लाईन तुटल्या. आता आम्ही काही करु शकत नाही. इथे एम.टी.कांबळे साहेब बसलेले आहेत, त्यांची रिटायरमेंट आहे. त्यांनी मौन पाळले आहे. त्यांच्यासाठी हे चांगले आहे. काही गोष्टी नजरेआड करायच्या. असे म्हणतात ना की मांजर डोळे झाकून दूध पिते, तिला वाटते आपल्याला कोणीच बघत नाही, तशी आपल्या सगळ्या प्रशासनाची अवस्था झाली आहे. सगळ्यांना सगळे दिसते परंतू आम्ही बोलत नाही. कोण सन्माननीय आहेत, कोण खासदार आहेत, आमदार आहेत, कोण काका आहेत, मामा आहेत. काय वाट्टेल तेवढी पदे या शहरात आहेत. आणि त्या शहरातल्या यांच्या पदांच्या भितीपायी बोलत नाहीत का यांचे खिशे गरम होतात म्हणून बोलत नाहीत यावर मला अजिबात डिस्कशन करायचे नाही. परंतू मला आठवते की, पिंपळे सौदागरमध्ये खोदाई चालू होती. व्होडाफोन कंपनीची लाईन टाकत होते. आम्ही अधिका-यांना कळवले. नंतर कळाले, त्यांनी परमिशन घेतली नव्हती. पण आपले डक उपलब्ध आहेत. त्यांनी त्या डकमधून काम केले पाहिजे खरेतर आपल्या अधिका-यांची एवढी मानसिकता असली पाहिजे की, त्यांनी त्या कंपन्यांकडून त्या पद्धतीने काम करुन घेतले पाहिजे. आपल्या अधिका-यांकडून कोणत्याही प्रकारचे मॉनिटरींग केले जात नाही. बीट निरीक्षकांना काहीही सांगा. आपल्याकडे कोणतेही इम्प्लिमेंटेशन होत नाही. तुम्ही बोलता हे तुमच्यापुरतेच राहते खालच्या कनिष्ठ कर्मचा-

यापर्यंत ही प्रोसेसिंग व्हायला पाहिजे. तो प्रकार दिसत नाही. त्यामुळे कंट्रोल काहीच नाही. उद्या तुम्ही कितीही म्हटले की आज मला वाटतेय आपण डक तयार करायचे. या बजेटमध्ये तुम्ही नियोजन केलेत का. हा विषय सभागृहात येणार आहे हे तुम्हाला माहित होते उद्याच्या उद्या निविदा प्रक्रिया करायची. शहरात डक करायचे. शहराचा विकास होईल, आपल्याला भाडे मिळेल. हे डायसवर बोलणे फार सोप्पे आहे. तुम्हाला बोलायचे आहे, हे करायचे आहे हे तुम्हाला माहित होते. सभागृहाला माहित नव्हते. मग काय इम्प्लिमेंट केले. आम्हाला तुम्हाला दोष द्यायला अजिबात आवडत नाही. मी किमान पंचवीस वेळा तरी त्या सभागृहात बोलले असेन की युटीलिटी प्लॅन तयार करा. आपला एखादा जे.ई.असेल, डेप्युटी असेल त्याला तुम्ही इन्सेन्टीव्ह द्या काही हरकत नाही. काम केल्यावर आपण पैसे देणे लागतोच आणि दिलेच पाहिजेत. परंतू त्यातून आपल्या शहरात लाईन कुठून कुठे गेल्यात त्याची आपल्याला माहिती मिळणार आहे. आपण यावर कोणत्याही प्रकारे काम करत नाही. आत्ता तुम्ही असे सांगितलेय की आम्ही एमएसईबी ला असे असे सांगितले आहे. मा.आयुक्त साहेब, आपण कुणावर दया करायचे कारण नाही. माझ्या कासारवाडीत हिराबाई झोपडपट्टी असेल किंवा साईनगरचा परिसर असेल मी आमदार साहेबांना आमचा परिसर पाहण्यासाठी फोन केला की असे असे आहे. तर ते म्हणतात, काय करणार मॅडम, आमच्या विषयी असणारे तुमचा एकही नगरसेवक आम्हाला सहकार्य करत नाही. मग आम्ही तुमचा एखादा शब्द का ऐकावा. ही भाषा तिथे होते. आम्ही आमचे एखादे पर्सनल कनेक्शन, पर्सनल काम घेऊन गेलो नव्हतो. त्याठिकाणी एक पत्र्याचे घर आहे. त्या घरावरुन किमान ७०/८० कनेक्शन्स गेले आहेत. तिथे करंट येतो. पावसाळ्यात त्या घराला करंट येतो. आम्हाला तिथला डिपी बंद करावा लागतो. तिथून पुढे तिथला धोका टळलेला असतो. या धोक्यासंदर्भात आम्ही त्यांना कळवले तर त्यांनी या विषयासंदर्भात आम्हाला असे उत्तर दिले. तुम्हाला तिथे खोदाई करायला सांगितले आहे. तुम्ही करत नाही. मग तुम्ही आमच्याकडे काम का सांगता. कोणताही नगरसेवक याठिकाणी जात नाही की, आमचे बील कमी करा. आमचे रहिवासी आहेत त्यांचे बील कमी करा. पर्सनल काम घेऊन आम्ही कोणी जात नाही. त्यामुळे आम्ही कोणी त्यांच्याकडे पर्सनली जाण्याचे काही कारण नाही. हा विषय पुन्हा एकदा सभागृहासमोर आणावा अशी एकदा विनंती करते

**मा.मंगलाताई कदम** - मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब,सर्व सन्मा.सभागृह, दोन पासून पाच वाजेपर्यंत आपण एकाच विषयावर चर्चा करतोय. खरेतर हा विषय आम्ही दप्तरी दाखल करणार होतो. तुम्हाला असे वाटत असेल, आम्ही कुठल्याही गोष्टीच्या पाठिमागे आहोत का काय. अशी शंका मनात आलीतरी ती घेऊ नका. शेवटी आपण इथे महापालिकेचे हित जपण्यासाठीच बसलेलो आहोत. म्हणून व्हिपमध्ये जरी हा विषय दप्तरी दाखला करा असे असलेतरी स्थायी समितीने घेतलेलाच निर्णय आम्हाला मान्य आहे. आत्ताच्या तीन तासांच्या चर्चेनंतर आयुक्त साहेबांनी सभागृहात जो खुलासा केला या खुलाश्यानंतर, चर्चेनंतर असे

वाटते, ६,५००/- जो दर आहे नंतर आपण त्याचे ५० टक्के केले किंवा काही केले. अजून ब-याचशा गोष्टी समोर आल्या आहेत. रिलायन्स आहे, व्होडाफोन आहे यांनी किती लाईन टाकल्या आहेत, काय काय केले आहे. आयुक्त साहेब तुम्ही निर्णय घ्या. तुम्ही मला सकाळी सांगितले होते. तेव्हा मी तुम्हाला म्हणाले की, आम्ही हा विषय दप्तरी दाखल करणार आहोत. बरोबर आहे, तुम्हाला तुमच्या वरिष्ठांचे ऐकणे क्रमप्राप्त असते. त्यांनी तुम्हाला बोलवले. तुमची मिटींग घेतली. परंतू त्यांनी तुम्हाला लेखी सुद्धा दिले गेले पाहिजे तुम्ही निष्कारण कशाला अडकताय. म्हणून ते तुम्हाला काही सांगत असतील तर तुम्ही त्यांच्याकडून लेखी घ्या. हा महिना हा विषय दप्तरी दाखल न करता तहकूब ठेवू या. बाकी केबल सुद्धा शहरात कुठे कुठे परवानगी न घेता टाकल्या असतील असे कोण काय उद्योग करत असतील. साहेब, इतके सोप्पे नाही. तुम्ही मला सांगा. रस्ता रात्रीमध्ये खोदतात. केबल टाकतात पण आपल्याला माहित नाही असे होत नाही. नागरीकांमध्ये बक्षीस डिक्लेअर करा. महापालिकेच्या प्रॉपर्टीचा गैरवापर करणे, यात लोकांनी फोटो काढून व्हॉटस् अपवर जर पाठवला दोन तीन अधिका-यांचे नाव डिक्लेअर करा. किंवा कॉर्पोरेशनला सारथीवर कळवले. तर फार अवघड नाही. जसे मध्ये पाण्याचे बाबतीत केले होते. पाण्याचे लिकेज कळवा. बक्षीस मिळवा. अशा पद्धतीने ही योजना काढली. नागरीकांना ती खूप आवडली. शहराचे रक्षण करायचे काम नागरीकांचे सुद्धा आहे. त्या ॲक्टच्या माध्यमातून आपण नागरीकांपर्यंत सहज पोहोचू शकतो. नागरीक सुद्धा कंम्प्लेण्ट करु शकतात. सारथीची योजना चांगलीच होती. त्या त्या दिवशी नागरीकांच्या कंपलेण्ट गेल्या पाहिजेत. यासाठी आपल्याला सारथीचे बक्षिस सुद्धा मिळाले आहे. खूप चांगल्या पद्धतीने चालली गेली पाहिजे. आपल्याला बक्षीस मिळावे आणि आपण त्याचे गांभिर्य सोडून द्यावे अशातली ती गोष्टी नाही. म्हणूनच या सगळ्या गोष्टींचा सगळा विचार करु या. टॉवर्सचा सुद्धा इथे मोठ्या प्रमाणावर विषय निघाला. वाल्हेकरवाडीमध्ये काही टॉवर्स घेण्यासाठी मध्ये काही परमिशन आल्या होत्या. त्यांनी सागिंतले, तुमचे अनधिकृत आहे. आम्ही तुम्हाला काही कळवू शकत नाही. ती माणसे तुमच्याकडे परवानगी मागायला आले आहेत. लोक गपचूप करता अशातला भाग नाही. मग आपण त्यांना असे का म्हणायचे. तुम्ही अनधिकृत बांधकामांना शास्तीकर लावता. त्यांचे अनधिकृत घर असून सुद्धा तुम्ही घराचा टॅक्स घेता ते तुमच्याकडे रितसर परवानगी मागायला येतात. शेवटी लोक काय थांबणार आहेत का. तो पेपर घेतात. त्यांच्याकडे जातात. ते म्हणाले, तुमचेच आहे. मला दंड पडेल त्यावेळी मी भरेन. ही परिस्थिती नागरीकांमध्ये आहे. मी व्यक्तीच्या नावासकट सांगू शकते. म्हणजे या गोष्टी आपल्याला माहित असतात. पण आपण सहजरित्या दूर्लक्षित करतो. ते प्रामाणिक असताना आपण त्यांना अप्रामाणिक बनवण्याचा प्रयत्न करतो. हा सगळा विषय आहे. आयुक्तांना सुद्धा अधिकार आहेत. स्टॅंडींगमध्ये ज्यावेळी विषय मंजूर होत नाही त्यावेळी आयुक्तांना सुद्धा अधिकार आहे तो विषय मंजूर करायचा. किंवा सभागृहात एखादा विषय चुकीचा झालातर तो निर्णय घ्यायचा

सुद्धा अधिकार आयुक्तांना आहे. तुम्हाला अधिकार नाही असे आम्ही अजिबात म्हणणार नाही. तुम्ही तुमचे शब्द माघारी घ्या तुमचा कमीपणा झाला पाहिजे असे म्हणून आम्ही तुम्हाला कधीही दुखवणार नाही. परंतू ज्यावेळी पिंपरी चिंचवड शहराचा विचार करतो तेव्हा आपण जाणून बुजून चुकता कामा नये म्हणून मी महापौर साहेबांना विनंती करते की, हा विषय तहकूब करावा.

**मा.सुमन नेटके -** मा.महापौर साहेब, विषय क्रमांक १ चा विचार पुढील सभेचे वेळी करणेत यावा अशी सूचना मी मांडते.

**मा.आशा सुर्यवंशी** - मा.महापौर साहेब, सूचनेला अनुमोदन देते.

यानंतर सूचनेप्रमाणेचा ठराव मतास टाकणेत आला असता -

ठराव क्रमांक - ८३० विषय क्रमांक - १

दिनांक - १८/०३/२०१६ विभाग - मा.आयुक्त

संदर्भ - १) मा. महापालका आयुक्त यांचे जा.क्र. स्था/श.अ./तां/४/५१५/१५ दि.२८/१२/२०१५

२) मा.स्थायी समिती सभा ठ.क्र.१५१६६ दि.१७/०२/२०१६

विषय क्रमांक १ चा विचार पुढील सभेचे वेळी करणेत यावा.

अनुकूल - ८१ प्रतिकूल - ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

-------

**मा.मंदाकिनी ठाकरे -** मा.महापौर साहेब, विषय क्रमांक २ वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडते.

ठराव क्रमांक - ८३१ विषय क्रमांक -२

दिनांक - १८/३/२०१६ विभाग - मा.आयुक्त

संदर्भ :- १) मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.आप/२/कावि/१५४/२०१६ दि.९/२/२०१६

२) मा.स्थायी समिती सभा ठ.क्र.१५१९३ दि.१७/०२/२०१६

महानगरपालिकेचे उत्पन्नातील समतोल राखण्याचे हेतूने सन २०१६-२०१७ या आर्थिक वर्षाकरीता जाहिरात कराचे दरात परिशिष्ठ अ प्रमाणे व जागा भाडे दरात परिशिष्ठ ब मध्ये नमूद केलेप्रमाणे दरनिश्चित प्रस्तावित केली असल्याने त्यास मान्यता देणेची मा.आयुक्त

यांची मागणी असली तरी सन २०१५-२०१६ या आर्थिक वर्षाचे जाहिरात कर व जागा भाड्याचे दर सन २०१६-२०१७ या आर्थिक वर्षाकरीता कायम ठेवणेस मान्यता देणेत येत आहे.

**मा.मंदा आल्हाट -** मा.महापौर साहेब, ठरावास अनुमोदन देते.

**मा.सुमन नेटके -** मा.महापौर साहेब, जाहीरात कराचे दर निश्चित करण्यासाठी प्रस्ताव सादर करण्यात आला आहे त्याबाबत मी पुढीलप्रमाणे उपसूचना मांडते की शहरातील सर्व ठिकाणच्या व सर्व प्रकारच्या जाहीरात फलकासाठीचे जाहीरात कराचे सन २०१५-१६ या आर्थीक वर्षात निश्चित केलेल्या दरात ५ टक्के वाढ करुन सन २०१६-१७ या आर्थीक वर्षासाठीचे दर निश्चित करण्यात यावे.

**मा.आशा सुर्यवंशी-** मा.महापौर साहेब, उपसूचनेला मी अनुमोदन देते.

**मा.सुलभा उबाळे -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. याठिकाणी पुन्हा एकदा हा विषय महानगरपालिकेच्या उत्पन्नाच्या स्त्रोताविषयी आहे. याठिकाणी जे अनधिकृत जाहीरात फलक आहेत त्याची माहीती मी विभागाकडून घेतली त्याच्यामध्ये अ क्षेत्रीय कार्यालयामध्ये ७१, ब मध्ये ५६, क मध्ये ३, ड मध्ये २३, ई मध्ये ११२, आणि फ मध्ये ८३ असे एकूण ३४८ फलक अनधिकृत आहेत असे प्रशासनाने कळवल आहे. परंतु या आकडेवारीवर माझातरी स्वत:चा विश्वास नाही. एवढे जर बोर्ड अनधिकृत असतीलतर अधिकृत बोर्डची जी संख्या आहे परवानाधारक बोर्ड ते आहेत २७. महानगरपालिकेच्या जागेत परवानगी घेतलेल्या बोर्डाची संख्या फक्त २७ आहे. आणि जे खाजगी जागेमध्ये बोर्ड लावले गेले त्याची संख्या आहे १२१८. म्हणजे खाजगी जागेमधील परवानाधारकांचे असणारे बोर्ड. म्हणजे एकूण १५०४ टोटल आपल्याकडे संख्या आहे. परंतु तशी काल पण चर्चा झाली चौकाचौकातून ज्यावेळेस आपण जातो त्यावेळेस संख्या बघीतलीतर मला वाटत मुंबई-पुणे हायवेलाच हा कोठा संपतो. मग आपल्या शहराच काय. मा.महापौर साहेब, याच्यामध्ये काही अटि शर्ती आहेत म्हणजे खाजगी जागेतील बोर्डाला जेव्हा आपण परमीशन देतो त्यावेळेस आपण त्यांचा सात बारा घेतो, बाकीच्या काही एनओसी असतील त्या घेतो आणि त्याच्यावरती आपण परवानगी देतो. मा.महापौर साहेब, खाजगी जागेचा सात बारा देत असताना जस आपण टिडीआर देत असताना मोजणी वगैरे सगळी आपण त्याची स्क्रूटीनी करतो तसे हे फ्लेक्स देत असताना सात बारा एकीकडचा आणि परवानगी एकीकडची म्हणजे कागदाला फक्त कागद जोडले गेले आहेत. त्या परवानग्या सुध्दा तपासल्या पाहीजेत. काही ठिकाणीतर त्या परवानग्या सुध्दा नाहीत. काही बांधकाम व्यावसायीकांनी म्हणजे ज्याचे हे बोर्ड लावलेले आहेत त्याची ही संख्या ३४८ आहे. म्हणजे त्यांनी त्याच्या जागेमध्ये त्याच्या प्रॉपर्टीसाठी लावलेले हे बोर्ड आहेत. त्यांच्याकडून सुध्दा आपण उत्पादन शुल्क जाहीरातीच घेण्यात याव. परंतु आयुक्त साहेब, ही संख्या पुन्हा एकदा तपासली पाहीजे. महाराष्ट्र शासनाने काही दर आपल्याला देवू केलेले आहेत. आपण जे दर ठरवणार आहेत त्याची शासनाकडून परवानगी घेतली पाहीजे असे काहीतरी जाहीरात

कराच्या संदर्भामध्ये आहे. तरी आपण हे सांगाव हे जे दर आहेत ते योग्य आहेत का. याचा याठिकाणी खुलासा व्हावा आणि पुन्हा एकदा हे जे अनधिकृत फ्लेक्सच सर्वेक्षण आहे त्याच्या संदर्भामध्ये आपण सांगाव. इलेक्ट्रॉनिक्स बोर्ड जे लागले आहेत इलेक्ट्रॉनिक्स बोर्डच्या संदर्भामध्ये मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, चौकाच्या ठिकाणी असतीलतर त्यांच खुप मोठ रिफ्लेक्शन टू व्हीलर चालविणारे असतीलतर डोळयामध्ये होत. कलर कॉम्बीनेशनचे काही बंधन आहेत की नाहीत. त्यामुळे ॲक्सीडेंट होईल की काय अशी शंका आमच्या मनामध्ये येते. त्यामुळे इलेक्ट्रॉनिक्स बोर्डच्या संदर्भात सुध्दा काही नियम असतील किंवा तशाप्रकारच्या काही परवानग्या असतील याचा सुध्दा अभ्यास करावा आणि पुन्हा एकदा जाहीरात फ्लेक्सची अनधिकृत फ्लेक्सची चौकशी करावी.

**मा.माया बारणे -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. आपल्या सगळयांना माहीती आहे की पिंपरी चिंचवड महापालिकेच उत्पन्नाच स्त्रोत असणारी जकात बंद झाली त्यामुळे परिणामतः आपल उत्पन्न कमी झाल याचा परिणाम आपल्या विकास कामावरती दिसून येतो. त्यासाठी पालीकेने उत्पन्नाच स्त्रोत वाढविण्यासाठी विवीध प्रकारच्या उपाययोजना सुरु केल्या. त्या उपाययोजनाचाच एक भाग म्हणून आपण होर्डींग्ज वरती टॅक्स सुरु केला परंतु पुणे महानगरपालिकेचा टॅक्स आणि आपल्या पिंपरी चिंचवड महानगरपालिकेचा टॅक्स या दोघांची जर तुला केलीतर पुणे महानगरपालिकेच्या तुलनेत अतीशय कमी आपल्या पिंपरी चिंचवड महानगरपालिकेचा होर्डींग्जवरचा टॅक्स आहे. पुणे महानगरपालिकेचा होर्डींग्जवरचा टॅक्स प्रती वर्षी २२२ चौ.फुट इतकी वाढ करण्यात येते. म्हणजे त्यांचा मासीक दर आहे १८.५० पै. त्या तुलनेत पिंपरी चिंचवड महानगरपालिकेचा जाहीरातीचा मासीक दर आहे ७.८० पै. तरी आतीशय कमी प्रमाणात आपण ही वाढ करत असतो. मी सभागृहाच एका गोष्टीकडे लक्ष वेधते. हा शहराचा होडींग्जचा दर २००४-०५ चा १३७ रुपये प्रती चौ.मी. होता. त्यानंतर सलग दोन वर्षे आपण कुठल्याही प्रकारची वाढ केलेली नाही. २००७-०८ साली आपण फक्त १० टक्क्यानी वाढ केली आहे. २००८-०९ साली आपण ६५ टक्क्यांनी वाढ केली. त्यानंतर २००९-१० साली आपण १० टक्क्यांनी वाढ केली. परत दोन वर्षे आपण कुठल्याही प्रकारची त्यांना वाढ केलेली नाही. २०१२-१३ साली आपण ३० टक्क्यांनी वाढ केली. २०१३-१४ ला आपण पुन्हा १० टक्क्यांनी वाढ केली. सलग चार वर्षे आपण कुठल्याही प्रकारची वाढ केलेली नाही. जर आपण महानगरपालिकेच्या इतर उत्पन्नाचे स्त्रोत असणा-या विभागाकडे जर लक्ष दिलतर आपल्याला या गोष्टी कटाक्षाने जाणवतील. त्यासाठी प्रशासन आणि सभागृहाचाही इतर विभागाकडे लक्ष वेधण्याचा प्रयत्न करते. आपण पाणीपट्टीमध्ये २००२ साली ७२० रुपयानी देत होतो त्यात २००२-०३ साली १० टक्क्यानी वाढ केली. सलग त्यांना आपण प्रत्येक वर्षी १० टक्क्यांनी वाढ करत गेलो. २००६-०७ साली आपण २० टक्क्यांनी वाढ केली. त्यानंतर पुन्हा १० टक्क्यांनी दरवर्षी आपण वाढ करतो. खरंतर प्रशासनाने नागरीकांची एकप्रकारे फसवणूक

केल्यासारखे आहे. २४ शहराला पाणीपुरवठा करणार अशी घोषणा करुन सर्वसामान्य नागरीकांची एकप्रकारे फसवणूकच केलेली आहे आणि ही घोषणा केल्यानंतर त्यांना मीटर पध्दती लागू केली. मीटर पध्दतीवरती आमच सभागृह बोलतय की अवाजवी पाणीपट्टी सर्वसामान्य नागरीकांना भरावी लागते. एकतर मीटरपट्टी तुम्ही अवाजवी देतात, तक्रारी आल्यातरी त्याची दखल घेतली जात नाही. नागरीकांना ती पर्यायाने भरावीच लागते. म्हणजे आपण ज्या सर्वसामान्य नागरीकांना ज्या सुविधा गरजेच्या आहेत त्यांच्यामध्ये आपण प्रत्येक वर्षी वाढ करतो. हे सगळ करत असताना कुठेतरी असं म्हणाव लागेल की होर्डींग्जचे ठेकेदार आणि प्रशासन यांच्यामध्ये काही संगनमत आहे की काय हे सुध्दा कळत नाही. तसेच घरपट्टीच्या बाबतीतही विचीत्र असं आपल्याला कॉम्बीनेशन दिसतं. जे आरसीसीची घर आहेत त्यांना २००१ साली आपण ६० पै. प्र.चौ.फुट त्यांच्याकडन आपण घेत होतो. बिगर निवासीसाठी २.५० पै. प्र.चौ.फुट अशी होती त्यानंतर प्रशासनाने २००६-०७ साली त्याची अ,ब,क,ड अशी वर्गवारी केली. अ गटामध्ये प्राधिकरण म्हणजे जिथे आपल्या सुविधा चांगल्या प्रकारे आहेत हा संपुर्ण भाग अ गटामध्ये मोडला. ब गटामध्ये सांगवी, थेरगाव यांच्या कार्यालयातील सर्व गट समाविष्ट झालेला ग्रामीण भाग वगळून. क मध्ये च-होली, मोशी, चिखली, तळवडे, आदर्शनगर, दिघी गावठाण, थोडक्यात आता ज्या गावामध्ये डेव्हलपमेंट चाललेली आहे तो भाग क मध्ये मोडला आहे. ड गटामध्ये समाविष्ट आता झालेली गाव परंतु डेव्हलपमेंट झालेली नाहीत असे. अशी तुम्ही वर्गवारी केली परंतु हेही करत असताना त्यांचा टॅक्स पाहीलातर खुप तफावत आहे. अ गटाला २००६ साली १ रु. ६० पै. होता. तो २००९ साली २२.५० पै. केला. म्हणजे एकदम एवढा मोठा टॅक्स नागरीकांवर का लादला गेला. ठरावीक अशी रक्कम ठेवा की ती टप्याटप्याने वाढली पाहीजे. तुम्ही जर १ रु.चे डायरेक्ट २० रुपये करत असालतर याचा अर्थ यामध्ये काहीतरी काळबेर आहे हे सर्वांच्या लक्षात येत. बिगरनिवासीचही तुम्ही तेच केलेल आहे. जस तुम्ही पाणीपट्टीच्या बाबतीत दहा टक्केनी दरवर्षानी वाढ करतात तशी घरपट्टीमध्ये २००९ नंतर तुम्ही सलग वाढ करत गेलेले आहेत. मग असं होर्डींग्जच्या बाबतीत का होत तिथ तुम्ही १० टक्केच्यावर अजीबात वाढ केलेली नाही. होर्डींग्जचे ठेकेदार प्रशासनाचे काही जावाई लागतात का त्यांना प्रत्येक बाबतीत सुट दिली गेली. आताही सांगीतल की ५ टक्केनी वाढ केली, ५ टक्के म्हणजे त्यांच्या बाबतीत शुल्लक गोष्ट आहे. करायची म्हणून ही वाढ केलेली आहे याला काहीही अर्थ नाही. माझा प्रशासनाला एक प्रश्न आहे त्याच उत्तर मला दयाव. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम ९९ अन्वये करांचे दर २० फेब्रूवारी किंवा त्यापुर्वी निश्चित होण गरजेच होत. कायदयात तशी तरतूद आहे परंतु आपल्याकडे हा विषय मार्च महीन्याच्या जीबीला येतो याचा अर्थ काय होतो. आणि हा आता केल्यानंतर महानगरपालिकेला लागू होणार आहे का. संबंधीत अधिका-यांनी याचा खुलासा दयावा.

**मा.सुरेश म्हेत्रे -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. मला या विषयाचे परिशिष्ट अ/ब यामध्ये आपण निश्चित काय भाडेवाढ मागीतली याचा खुलासा करावा.

**मा.कडूसकर (सहा.आयुक्त ) -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. हा विषय आपल्याकडे स्थायी समितीमार्फत आपल्याकड आलेला आहे. करवाढ जी आहे ती आपल्या महानगरपालिकेला शासनाने लागू केलेली आहे. जाहीरातकर, परवाना फी आणि जागाभाडे हे तीन असते. जाहीरात कर हा संपुर्ण महाराष्ट्रामध्ये फक्त आपल्या महानगरपालिकेला लागू असणारा टॅक्स आहे. तो फक्त आपण लागू करुन घेतलेला आहे. त्याच्यानंतर जागा भाडे. प्रशासनाकडून यावर्षी आपण कोणतीही दरवाढ सुचवली नव्हती. कारण की जाहीरात कर हा शासन मान्य करुन यावा लागतो. शासनाची त्याला मान्यता लागते. २००४ साली आपण ज्यावेळेस जाहीरात कर केला होता त्यावेळेस याची मान्यता घेतली. त्याच्यानंतर केलेल्या कोणत्याही दरवाढीला आपण कशाही प्रकारची मान्यता घेतलेली नाही. जागाभाडे जे आहे ते आपण ३३ रु.७४ पै. पर स्क्वे.फुट प्रती महीना घेतला जातो. तो रेडीरेकनरपेक्षा जवळपास तीप्पट ते चौपट जास्त आहे. त्यामुळे यामध्ये आपण कोणतीही करवाढ प्रस्तावीत केलेली नव्हती. कारण की आपण उत्पन्नवाढीच्या दृष्टीने कोणत्याही निवीदा काढल्या तरी आपल्या ज्या निवीदेच्या रक्कमा होत्या त्याच्यामध्ये जागाभाडयाच कम्पोनंनट जवळपास ८० ते ८५ टक्के होत होता. त्यामुळे संपुर्ण आता पर्यंत काढलेल्या जाहीरात संबंधीच्या जेवढया पण निवीदा होत्या त्यांना कोणत्याही प्रकारे निवीदेला यश लाभलेल नाही. त्यामुळे उत्पन्न वाढीच्या दृष्टिने आपण या वर्षी म्हणल की जाहीरात करामध्ये किंवा जागाभाडे यामध्ये जर वाढ केलीतर येथून पुढे जे आपल्या जवळपास निवीदा असणार त्याच्यामध्ये कोणत्याहीप्रकारे हे होणार नाही. त्यामुळे आपण ही वाढ केली नव्हती. जागाभाडेमध्ये ऑलरेडी चौपट आपण घेतो त्यामुळे टॅक्सवाढ केलेली नव्हती. तीसरा जो विषय आहे तो परवाना फि चा आहे तो विधी मार्फत आपल्याकडे येतो त्यामुळे मॅडमचा जो प्रश्न होता २० फेब्रूवारीचा आपण कोणत्याही प्रकारची दरवाढ प्रस्तावीत केलेली नसल्यामुळे आपल्याला हे काही नाही. तीसरा जो विषय आहे तो परवाना फी चा त्यामध्ये कलम २४४,२४५ अन्वये फि घ्यावी लागते, परवाना शुल्क, परवाना फि. हा विधी मार्फत येणारा विषय आहे त्याच्यामध्ये करवाढ प्रस्तावित केलेली आहे.

**मा.योगेश बहल -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. त्यांनी आता सांगीतल की कलम २४४,२४५ अन्वये फि घ्यावी लागते. तो विषय पुर्वी आलेला असेल आणि विधी समितीने निर्णय दिलेला असेल परंतु आता जो आहे तो जागेभाडेचा विषय आहे त्याच्यामध्ये प्रशासनाने कोणतीच वाढ सुचविलेली नव्हती कारण आपण ऑलरेडी जास्तच घेतोय. सभागृहाच सुध्दा म्हणण असं आहे आणि बारणेताईच्या म्हणण्याशी पण मी सहमत आहे. त्यावेळेला विधी समितीने निर्णय घेतलेला असेल परंतु परवाना फि पुण्याच्या तुलनेमध्ये आपली खुप कमी आहे. त्यामध्ये वाढ व्हावी. दुसरा सुलभाताईनी येथे विषय मांडला की आम्ही

५ टक्के वाढवितो, ५ टक्के वाढविण क्रमप्राप्तच आहे. जीबी ने म्हणल की आता ५ टक्केनी वाढ करा ऑलरेडी आपण ३२ ते ३३ टक्के जास्त घेतो अजून आता ५ टक्के वाढ करायची तर हा सभागृहाने निर्णय घ्यायचा आहे

**मा.कडूसकर (सहा.आयुक्त ) -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह याच्यामध्ये १० रुपये आपल्याला शासनाने मान्यता दिलेली आहे. आपण २४ रु. ५० पै. प्र.स्क्वे.मी.सध्या आपण चार्ज करतो. स्क्वे. मी. चा जर फरक असेलतर २७ रु. ५० पै. म्हणजे २४ रु. ५० पै. आणि २७ रु. ५० पै. अशाप्रकारे आपण चार्ज करतो. त्याच्यानंतर जागाभाडे आपण त्यांना ४०X२ ची जरी जागा दिलीतरी आपण ४०X२० जरी फरक असेल म्हणजे ८०० स्क्वे.फुटचा तरी आपण संपुर्ण याला जागा भाडे लागू करतो. त्यामुळे हा दर लागू केलातर रेडीरेकनरपेक्षा जवळपास १० पट जास्त मिळतो. त्यामुळे आम्ही यामध्ये सध्यातरी दरवाढ करण्यात येवूनये असं केल होतं. कलम ९९ अन्वये स्थायी समितीने मान्यता दिलेली आहे जीबीमध्ये त्याच्यानंतर प्रस्ताव आलेला आहे, आता ५ टक्के दरवाढ लागू होवु शकते.

**मा.आयुक्त -** सन्मा.महापौर मॅडम, सन्मा.सभागृह आपण त्याच्यामध्ये रेडीरेकनरनुसार दर हे भाडे ठरविण्यासाठी घेतलेले आहे. रेडीरेकनर जस रजिष्टर एकदाच भरतो तसा नाही प्रकार हा. भाड ठरविताना ऑलरेडी आपण जास्त भाड ठरवलेल आहे तथापि आता महासभा म्हणते अजून ५ टक्के दरवाढ करा आपण परवान्यात वाढ केलेली नाही, ऍटलीस्ट येथे वाढ करुन त्यानंतर आपल्याला उत्पन्न मिळेल का हा प्रश्न आहे. यामध्ये कडूसकर एचओडी आहेत त्यांच असं म्हणण आहे अदिच आपल्याकडे टेंडरला प्रतिसाद येत नाही आपण जर परत हे भाड वाढविलतर आजून प्रतिसाद कमी येईल म्हणून पाच टक्के करायच का नाही याचा निर्णय महासभेने घ्यावा अशी विनंती आहे.

**मा.सुरेश म्हेत्रे -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. आता आयुक्त साहेबांनी खुलासा केला परवाना फि चा विधीला विषय आहे त्याबद्दल काही विषय नाही....

**मा.प्रशांत शितोळे -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह खरंतर बारणेताईनी विचारणा केली ती योग्यच आहे. फेब्रूवारीमध्ये जो विषय ठेवलेला आहे तो आजही विधी समितीमध्ये प्रलंबीत आहे. तो विषय एप्रिलला आला तर तो सुध्दा लागू होणार नाही त्यामुळे भुतकाळातले दर तुम्हांला पुन्हा कन्टिन्यू करावे लागेल. विधी समितीने सुध्दा या प्रकारचा निर्णय लवकर पटकन घेवूशी वाटेल असा प्रस्तावच आपल्याकडून आम्हांला अपेक्षीत आहे. फेब्रूवारीच्या अगोदर हा विषय अजेन्डयावर का आला नाही अशी शंका बारणेताईनी त्यामुळेही उपस्थित केली असेल. परंतु दोन्ही गोष्टी जाहीरात फी आणि जाहीरात परवाना या दोन्ही बाबी वगवेगळया असल्यामुळे हा विषय आता आलेला आहे. शहरामध्ये १२०० ते १३०० फलक खाजगी जागेमध्ये आहेत. आता तुम्ही जो दर सांगीतला तो सरकारी जागेचा आहे. आज या शहरामध्ये मा.अजीतदादा जेव्हा जेव्हा या शहरामध्ये येत असतात तेव्हा तेव्हा या फ्लेक्सच्या

नावाने बोलत असतात. आता सगळेच होर्डींग्जवाले अनधिकृत आहेत अशातलाही भाग नाही. पण काही काही ठिकाणी आपल्याला डिजीटल होर्डींग्ज पाहण्यास मिळतात. त्यांनी आरटाअची परवानगी घेतलेली आहे का. तुम्ही संध्याकाळी जा त्याचा डोळयाला त्रास होतो. जर आकर्षीत करणारी जाहीरात असेलतर ड्रायव्हींग करताना तुमच लक्ष विचलीत होतं. आपण केवळ फि लावतो, परवाना लावतो. म्हणजे आपला वर्षभराचा विषय संपला. आपण नागरीकांच्या सुरक्षीततेची पण जबाबदारी काही प्रमाणात घेतली पाहीजे. तुमच्या रात्रीच्या प्रकाशाची मर्यादा त्याची प्रखरता जी आहे ती संध्याकाळी कमी करायला पाहिजे. पिंपरी चौकामध्ये दोन तीन ठिकाणी आहेत. ते बोर्ड खुप चांगले दिसतात पण ते ५० लाखाच्या जवळपासच होर्डींग्ज असेल त्याला वेगळा कर आकारायला नको का. अनेकठिकाणी हे डिजीटल बोर्ड लावण्यात आलेले आहेत. या डिजीटल बोर्डसाठी वेगळे जाहीरातीचे दर आणि त्याचा परवाना शुल्क हे वेगळ केलं पाहीजे. त्यांच्या जागेचा दर सुध्दा वेगळा केला पाहीजे. याच कारण काय तर त्याची उभारणी करताना त्याच स्ट्रक्चर वेगळच आहे. त्याच स्ट्रक्चर मजबूत लागत. त्याच लाईटच मीटर त्याच्या बाकीच्या गोष्टी अतीशय चांगल्या पध्दतीने करण्याचा त्यांचा प्रयत्न असतो. पण आपण त्याची साध्या होर्डींग्ज प्रमाणे गणना करु नये. कारण की तो रेट घेताना वेगळा घेतो. याचा जर ४० ते ५० रु. स्क्वे.फुट प्रतिमहीना असेलतर डिजीटलचा ५०० रुपये असतो. दुसरी गोष्ट म्हणज आपल्या शहराच्या प्रमुख चौकामध्ये आजची परिस्थिती अशी आहे कोण कोणाची जाहीरात करतंय हेच कळत नाही. त्यासाठी काहीतरी मर्यादा पाहीजे. तुम्हांला उत्पन्न मिळतय म्हणून कितीही जाहीरातला परवाने देता. डॉ.बाबासाहेब आंबेडकर चौकातल उदाहरण घ्याव. तेथे मोजून बघाव किती बोर्ड आहेत आणि मला पटकन जाता जाता गाडीवर वाचून दाखवावेत ते आपण वाचूच शकत नाहीत. नजरेला व्यवस्थीत दिसेल आणि कळेल अशा पध्दतीची ती जाहीरात असावी. आज रोजी इतकी त्या चौकामध्ये बोर्डाची गर्दी झालेली आहे. शहरातील अनधिकृत फ्लेक्स काढा याचा अर्थ अधिकृत फ्लेक्स सगळीकडे देत असा होत नाही. एखादया ठिकाणी एक बोर्ड अधिकृत आहे त्याठिकाणी तुम्ही दहा परवानग्या दिल्या तरी तो तुमचा बकालपणा आहे तसाच राहणार आहे. म्हणजे तुम्ही काय केल बकालपणा आहे तसाच आहे फक्त तुम्ही त्याला अधिकृत करुन टाकल. ५० रु. स्क्वे.फुटला तुम्हांला मिळणार आणि तो अधिकृत करणार. यापेक्षा आपल्या शहरातील चौक सुध्दा स्टॅण्डर्ड फॉरमेट ठेवा. त्याचे फॉरमेट ठरलेले आहेत परंतु एका चौकात चार असावेत आठ असावेत इथपर्यंत मर्यादा ठेवा. चौकामध्ये ४० फ्लेक्स असतात कशी ती जाहीरात बघायची. आपल्या महापालिका चौकापासून सुरवात होते, महापालिका संपली की अखे फ्लेक्सच फ्लेक्स. तीन तीन मजली फ्लेक्स एकावर एक एकावर एक असे. इमारतीसारखे ते वाढत चालले त्याच्यावरती तो डिजीटल बोर्ड. त्याच्यामध्ये तुम्ही ते टेम्परेचरच लावता. या दोन्ही चौकामध्ये आपण काही खाजगी लोकांना परवानग्या दिल्यात. माझी एक सुचना आहे तिथं आपल्या शासनाचे राजमुद्रेच शिल्प उभा कराव.

जेणेकरुन त्या चौकाला शोभा येईल. तुमच्या फ्लेक्सची शोभा येणार नाही, या होर्डींग्जची शोभा येणार नाही परंतु केवळ तुमच्या उत्पन्नाच साधन म्हणून याला बघत असालतर त्याच्यामाग थोड शेफ्टीमेजर पण तुम्ही केल्या पाहीजेत. रोडवर असेलतर त्याला तुम्ही आरटीओचा नाहरकत दाखला तुम्ही कम्पलसरी करा. नाशिक फाटयाला ज्या लोकांच्या जागा बाधीत झालेल्या आहेत, ज्या लोकांच्या जागा ६१ मी. मध्ये गेलेल्या आहेत त्यांनी जाहीरात परवान्यासाठी अर्ज केला त्या लोकांना आपण परवानगी दयायला पाहिजे. त्याना परवानगी का दयायची नाही, आपल्याकडून जो बाधीत आहे, आपल्याकडून त्याच नुकसान झालेल आहे, त्याच कुटूंब रस्त्यावर आलेल आहे त्याला प्राधान्यक्रम दिला पाहीजे. त्यांनी आपल्याकडे अर्ज सादर केले आणि जर आपल्याला अशाप्रकारे कुठेना कुठेतरी ॲडजेस्टमेंट करता येत असेलतर अशा पध्दतीचे जाहीरात परवाने त्यांना दिलेतर, दरामध्ये सवलत दया असं आमच अजीबात म्हणण नाही. परंतु त्यांना परवाना दयावा. ५ टक्के दरवाढ करावी म्हणून उपसूचना दिलेली आहे परंतु आता आयुक्त साहेबांनी सांगीतल की आपला मुळातच १० रुपये रेडीरेकनरचा दर आहे. आपण आकरत असलेला ३३ रुपये आहे आता ५ टक्केनी वाढविलातर दोन ते तीन रुपयानी वाढ होईल. मुळातच आपण प्रॉफीटमध्ये आहोत. पुण्याची तुलनाजर केलीतर पुण्याची मार्केट व्हॅल्यु वेगळी आहे, पुण्यामध्य डेक्कनला गेलोतर ५० हजार रुपये स्क्वेअर फुटान दुकान मिळतं. आज आपल्या अख्या पिंपरी चिंचवड शहरात ५० हजाराचा दर कुठच नाही. त्यामुळे डेक्कन सारख्या भागात होर्डींग्जचा दर २०० ते २५० रुपये आहे. आज आपल्या शहरात कुठला पार्ट असा आहे कुठेच नाही. वाकड, पिंपळेसौदागर, या बाजूला मोशी, च-होली आहे परंतु व्यावसाय परवाना त्यांना देतो त्यावेळेला त्याला जर आपण ३३ च्या ऐवजी ६० झाल तर परवाना मागायला कोणी येणारच नाही. तेव्हा मात्र आपल्याकडे अनधिकृत फ्लेक्सची संख्या जास्त झालेली असेल. आज ५ टक्के दरवाढ सुचवलेली आहे ती माझ्या मताने योग्य आहे परंतु या गोष्टीचा सुध्दा विचार करावा की डिजीटल बोर्डाचा विचार आणि शहरातील चौकाची साईज पाहून पीएमपीएमएलला चांगले रोड कन्सलटंट आहेत त्यांच्याकडून सल्ले घ्या. की आपल्याला त्या रस्त्यावर किती जाहीरात करावी. किती लक्ष माणसांच दुर्लक्षीत व्हाव किती अपघात व्हावेत याच प्रमाण ठरलेल आहे. त्यामुळे त्याचा विचार या निमीत्तान करावा. अशी मागणी, सूचना व विनंती आहे मी आपल्याला याठिकाणी करतो, धन्यवाद.

**मा.मंगलाताई कदम -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. मी आयुक्तांना अशी विनंती करेल की ज्या पध्दतीन पिंपरी चिंचवड शहर सुंदर आणि स्मार्टच्या दिशेन आपण धावत आहोत. हे धावत असताना आपण शहरावर खुप खर्च करतो. वॉर्डामध्ये आपण कार्यक्रम करतो त्यावेळेला जाहीरात करण हे गरजेच असतं. तुमच्या त्याच्यासाठी जागा घ्या. कोर्टाने निर्णय दिला अनधिकृत फ्लेक्स लावू नका अधिकृत फ्लेक्स लावा. वॉर्डात कोणता कार्यक्रम असेल आणि तिथे जाहीरात लावायची तर त्याठिकाणी चार पाच पॉईंट करा. त्याच ठिकाणी

तुम्ही फ्लेक्स लावू शकता आणि त्याला भाड आकारणी सुरु करा. माझ्याकडून सुरवात करा, की वॉर्डामध्ये ज्यांना फ्लेक्स लावायचे आहेत त्याठिकाणी पाच पॉईंट ठरवा आणि त्या पाच ठिकाणी फ्लेक्ससाठी भाड आकारणी करण्यास सुरवात करा. म्हणजे अधिकृत फ्लेक्स लावण्याची सवय सर्वानाच लागेल, आणि सुरवात माझ्या वॉर्डा पासून करावी. सगळयाचच म्हणण आहे आणि जे संबंधीत एचओडी असतील त्यांनीही खुलासा केला आहे. रेडीरेकनर दराप्रमाणे आपण करतो आहोत त्यामुळे विषय आहे तसा मंजूर करावा. आणि उपसूचना ही मागे घ्यावी अशी मी विनंती करते.

**मा.सुमन नेटके -** मा.महापौर साहेब, मी वाचलेली उपसूचना मागे घेते.

**मा.आशा सुर्यवंशी -** मा.महापौर साहेब, उपसूचना मागे घेतली त्यास अनुमोदन देते

**मा.मंदाकिनी ठाकरे -** मा.महापौर साहेब, मुळ विषयाला मंजूरी देण्यात यावी.

यानंतर सदर ठराव मतास टाकणेत आला असता-

अनुकूल- ८१ प्रतिकुल- ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

-----

**मा.नंदा ताकवणे-** मा.महापौर साहेब, विषय क्रमांक ३ वर मी पुढील प्रमाणे ठराव मांडते.

ठराव क्रमांक - ८३२ विषय क्रमांक -३

दिनांक - १८/३/२०१६ विभाग - मा.आयुक्त

संदर्भ :- १) मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.पअक/२/कावि/०५/२०१६, दि.०६/०१/२०१६

२) मा.विधी समिती ठराव क्र. २८ दि.१५/०१/२०१६

३) मा.महापालिका सभा ठ.क्र.८२० दि.२०/०२/२०१६

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेसाठी घनकचरा व्यवस्थापन व हताळणी नियम २००० अंतर्गत उपविधी तयार करणे बाबत मा.तत्कालीन आयुक्त सो यांनी मा.अति. आयुक्त सो यांचे मार्गदर्शनाखाली करावयाच्या सुचना दिल्या होत्या त्यास अनुसरुन या क्षेत्रामधील तज्ञ तसेच विविध क्षेत्रामध्ये कार्यरत असलेल्या अनुभवी स्वंयसेवी संस्थेचे प्रतिनिधी (जनवानी परिसर, कागद काच पत्रा संघटना व संचालिका पर्यावरण प्रशिक्षण केंद्र इ.), मनपाचे अधिकारी यांचे सब ग्रुप तयार करणेत येऊन सदर सबग्रुपमार्फत तयार करणेत आलेल्या उपविधीच्या [Byelaws] च्या Pre Final Draft चे मा.अतिरिक्त आयुक्त सो यांचेकडे दिनांक ०३/०२/२०१४ रोजी सादरीकरण करणेत आले व यामध्ये मा.अतिरिक्त आयुक्त सो यांचे सुचनेनुसार आवश्यक ते बदल करणेत येऊन मा.आयुक्त सो यांचेकडे दिनांक १५/०९/२०१४ व दिनांक ०३/०२/२०१५

रोजी सादरीकरण करणेत आले. तसेच याबाबतचा उपविधी मसुदा [Draft Copy] महाराष्ट्र शासनाकडे माहितीकामी त्यांचे मागणीनुसार माहितीसाठी दिनांक १८/०२/२०१५ रोजी पाठविणेत आला आहे. घनकचरा व्यवस्थापन व हाताळणी नियम २००० अंतर्गत तयार करणेत आलेल्या उपविधी मसुदा मा.महापालिका सभेची मान्यता घेऊन अंतिम मंजुरीकामी तसेच अंमलबजावणी करणेकामी महाराष्ट्र शासनाची मंजूरी घेणे आवश्यक आहे. सद्यस्थितीमध्ये घनकचरा व्यवस्थापनासाठी तयार केलेला उपविधी मसुदा महाराष्ट्र शासनाकडील अंतिम मान्यता येईपर्यंत मा.मनपा सभेच्या मान्यतेने घनकचरा व्यवस्थापन व हाताळणी नियम अंतर्गत “मनपाचे घनकचरा व्यवस्थापन धोरण” म्हणून राबविणे शक्य आहे. तसेच या धोरणांस मा.महापालिका सभेची मान्यता मिळालेनंतर हा मसुदा मान्यतेकामी महाराष्ट्र शासनाकडे पाठविणेत येईल व त्यास मंजुरी मिळालेनंतर मनपा कार्यक्षेत्रात घनकचरा व्यवस्थापनासाठी उपविधीची अंमलबजावणी करणेत येईल. सबब घनकचरा व्यवस्थापन व हाताळणी नियम २००० अंतर्गत या क्षेत्रातील अनुभवी व तज्ञ स्वंयसेवी संस्थांचे प्रतिनिधी व मनपाचे अधिकारी यांचे सबग्रुपच्या मदतीने तयार करणेत आलेल्या मनपाचे घनकचरा व्यवस्थापन उपविधीच्या मसुद्यास अंतिम मंजुरीकामी महाराष्ट्र शासनाकडे पाठविणेसाठी व महाराष्ट्र शासनाकडील मान्यता मिळेपर्यंत सदरचे घनकचरा व्यवस्थापन उपविधी मनपाचे घनकचरा व्यवस्थापन धोरण म्हणून राबविणेस मान्यता देणेत येत आहे.

**मा.भारती फरांदे -** मा.महापौर साहेब, ठरावास अनुमोदन देते.

**मा.प्रशांत शितोळे -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. मा.आयुक्तांना माहिती आहे की या कागद, काच, पत्रा, बीव्हीजी, खाजगी संस्था आणि महानगरपालिका याच्यामध्ये प्रचंड वाद आहे. आज सांगवीमधील घडलेली घटना मी सांगतो. आमच्या येथे चार टेम्पोना ड्रायव्हर नाहीत. त्याचा कोण कॉन्ट्रॅक्टर आहे हे माहीत नाही. आमच्याकडे काम करणा-या संस्था आहेत, नवमहाराष्ट्र बेरोजगार संघ म्हणून आणि पिंपरी चिंचवड अपंग स्वयंरोजगार संस्था. या स्वयंरोजगार संस्थानी याचे चालक मालक भलतेच आहेत. सगळयांना माहीती आहे पण आपल्याला या स्वयंरोजगार संस्था त्यांनी चांगल काम कराव अशी आपल्याला अपेक्षा आहे त्यामुळे आपण त्यांना नियमानुसार काम दिलेल आहे. आज परिस्थिती अशी आहे की यात कोणाचाच ताळमेळ लागत नाही. माझ्या येथे अशी परिस्थिती आहे की या कागद, काच, पत्रा वाले म्हणजे आपले मालक नाहीत पण त्यांना जर रोजगार नियमीत पाहीजे असेल, त्यांना जर कामकाज नियमानुसार पाहीजे असेलतर त्यांनी काम सुध्दा चांगल्या प्रकारचच, चांगल्या दर्जाच आणि व्यवस्थीत करणं अपेक्षीत आहे. त्यांचा माणूस त्या टेम्पोमध्ये बसलेला असतो तो खाली उतरत नाही हे आम्ही पाहतो आहोत. त्यांचा माणूस त्या टेम्पोतून खाली उतरुन शिट्टी मारणे, घंटा वाजवणे, गचरा गोळा करणे हे त्याच काम असलतरी सुध्दा आज ते लोक व्यवस्थित काम करत नाहीत. यांच काम प्रायव्हेटवाल्यांवर ढकलतात,

प्रायव्हेटवाला म्हणतो स्वयंरोजगार, स्वयंरोजगारवाले म्हणतात महापालिका सहकार्य करत नाही. आज मला सांगा ब-याच ठिकाणी ही परिस्थिती आहे. मी आपल्याशी किमान सहा महीन्यामध्ये तीन वेळा याबाबतीत बोललो. मी दंडवते साहेबांशी बोललो, खालचे जे लोक आहेत, मी एसआय वाल्यापासून सुरवात केली. माझ्या एकटयाचा प्रॉब्लेम हा नाहीतर आम्ही ड मधुन क मध्ये आल्यानंतर तर गोंधळच गोधंळ. आमचे तीन वॉर्ड क ला जोडले आम्हांला वाळीत टाकल्यासारखच करुन टाकल. आज आमच्या वॉर्डातली इतकी घाणेरडी अवस्था झाली आहे की चार दिवस झाले रोज पेपरला फोटो आहेत. लोकमतला, पुढारीला आणि सकाळला. पेपरवाल्यांनी तेवढच करायच का, फक्त आमच्या येथे कचराच शोधत बसायच का. ज्यांना साफ करायचा आहे त्यांना व्यवस्थीत सांगावे. कागद, काच, पत्रावाले असो किंवा कोणी असो. त्यांचे नेते बाबा आढाव साहेब ते त्यांना न्याय मिळावा म्हणून सारखे झगडत असतात. त्यांनी त्यांना असं कुठेही म्हणलेल नाही की काम चुकीच करा. न्यायालयाने आपल्याला जे आदेश दिलेले आहेत ते काम चुकीच कराव म्हणुन दिलेल नाही काम करु नका म्हणुन दिलेले नाहीत. त्यांनी दिलेले आहेत की महानगरपालिकेनी प्राधान्याने त्यांना काम दयाव. आपण न्यायालयाच्या आदेशानुसार काम दिलं. मग न्यायालयाच्या आदेशानुसार जर कागद, काच,पत्रावाल्यांना काम दिलेल असेलतर त्यात असा कुठेही उल्लेख नाही की कामामध्ये कामचुकारपणा करा. काम व्यवस्थीत पार पाडा आणि तुमचा व्यवस्थीत मोबदला महापालिकेकडून मिळवा. सहा महीने झाले मी सारख यांच्याशी बोलतो कधी ड्रायव्हर नाही, ड्रायव्हर असेलतर पेट्रोल, डिझेल नाही. या गोष्टी आम्ही या सभागृहामध्ये सांगण्यासारख्या आहेत का. एका बाजूला आज आपल शहर भारतात नवव्या क्रमांकावर आहे. महाराष्ट्रामध्ये एक क्रमांकावर आणि आम्ही असं ईथ ओरडायच. या संस्थावाल्यांनाही येथे काहीतरी वाटल पाहीजे, आपण इतक्या चांगल्या पगारावर काम करुन घेत असू, प्रॉब्लेम काय आहे या संस्था खालच्या लोकांना पैसे देत नाहीत. आपण धोरण केलेल असताना असं का करतो हे कळत नाही. त्या लोकांच्या नावावर चेक काढायचा, याबाबतीत ईथ बोलण मला शंभर टक्के चुकीच वाटत. महाराष्ट्रामध्ये क्रमांक एकची महापालिका जर आरोग्याच्या बाबतीत असेलतर आरोग्याच्या बाबतीत तक्रार आलीच नाही पाहीजे. आपल्याकडे शेकडो गाडया आहेत, एकही गाडी नीट नाही, एकाही गाडीला ड्रायव्हर नाही.

**मा.झामाबाई बारणे -** मा.महापौर मॅडम, सर्व नगरसेवक, मा.सभागृह. कागद, काच, पत्राचा आता प्रशांत शितोळे यांनी सांगीतल आहे. खरंतर काही भागामध्ये गाडीजर चाललीतर ते लोक शिट्टी वाजवत नाहीत. बकेटमध्ये कचरा घेवून गेलेतर तो कचरा आमच्या गाडीमध्ये टाकायचा नाही. समोरुन गाडी चाललीतर लोक कचरा टाकयला जाणारच परंतु ते लोक कचरा घेत नाहीत. झाडूवाल्यांची अशीच परिस्थिती आहे, पुर्ण रोड असेलतर अर्ध्या रोडमध्येच झाडू मारतात. तो कचरा सुध्दा साईडला लावतात, तो कचरा सुध्दा ते उचलत नसतात. कुठतरी

साईडला लावून साईडला गप्पा मारत बसत असतात. महाराष्ट्रामध्ये आपण एक नंबरच बक्षीस घेतलेल आहे. आणि या कच-याची जर अशी दुरावस्था असेलतर याच्यावर लक्ष दिलेतर पिंपरी चिंचवड महानगरपालिका देशात एक नंबरची राहील. आणि अशी दुरावस्था राहीलीतर आपल्याला मिळालेल्या बक्षीसाच काय होईल. प्रशांत शितोळे यांनी त्यांच्या भागाची कशी परिस्थिती आहे ते सांगीतल आहे. तशीच थेरगावमधील पण परिस्थिती आहे. अनेक भागामध्ये साईडला आपल्या झाडूवाल्या जात  नाहीत. कचराकुंडया उचलण्याचा ठेका कोणाकडे आहे. या कचराकुंडया भरलेल्या असतात त्याच्या साईडने कचरा खाली पडलेला तो सुध्दा कोणी उचलू शकत नाही.  ही स्वच्छता कोणी करायची म्हणजे अशा परिस्थितीमध्ये दुर्गंधीचा एक भाग, नागरीकांच्या आरोग्याला धोका पोहचण्याच आपल्या संस्थेच्या लोकांच्या हालगर्जीच्यामध्ये नागरीकांचे हाल होतात. काही काही ठिकाणी कचरा बाजूला सरकवलेला असला आणि तो कचरा उचललातर त्यांची दुर्गंधी सूटते लोक नाकाला रुमाल लावून जातात असे काही काही ठिकाणच्या कचराकुंडया भरलेल्या असतात. त्याचा परिसरामधील लोकांना त्रास आहे. आपण त्या संस्थाना पैसे देत नाहीत का. झाडूवाल्या बाया जर असे उत्तर देत असतीलतर तो भाग आमचा  नाही, अर्धवट तुम्ही झाडता आणि आर्धवट तसंच ठेवतात मग त्याच्यावरती कोणाच नियंत्रण आहे. मी प्रभागाच्या मीटींगमध्ये सुध्दा जावून बोललेले आहे, परवा सुध्दा अधिका-यांना तेथे जावुन मी बोललेले आहे.  असं होत असेलतर आम्ही काय करायच. आम्ही झाडूवाल्यांच्या मागे उभा रहायच का, आम्ही कॉन्ट्रॅक्टच्या मागे जायच का. ही कुंडी भरलेली आहे ती उचलली पाहीजे. याच्यावर नियंत्रण कोणाच आहे. आणि आता ते कचरा घेवून चाललातर आमच्या गाडीमध्ये टाकायचा  नाही. आणि २० रुपये लोकांनी दिले की कचरा कशाकाय घेतात. बाजूचा कचरा घ्यायचा असेलतर ते गाडीवाले २० रुपये घेतात. २० रुपये दिल्यावर कसे घेतात. याच्यावर नियंत्रण कोणाच आहे. आपल शहर स्वच्छ आहे आपल्याला बक्षीस मिळालेल आहे आणि याच्यामध्ये जर अशा हलगर्जीपणामुळे लोकांचा गैरसमज होणार आहे. मागच्यावेळेस पण आपल्याला पेपरला फोटो पहायला मिळाले असतील. ते सुध्दा रोडच्या कडेचे, आतमध्ये पण  नाही. मेन रोडला कचराकुंडया भरलेल्या त्याचे फोटो पेपरला आलेले होते. अशा पध्दतीने ते लोक काम करत असतीलतर मग ते दुस-याना दया, त्यांनाच का देता. यांना काम करण्यास त्रास होत असेलतर त्यांना कशाला ठेवता. या झाडूवाल्या बाया असं उत्तर देत असतीलतर त्यांना काढून टाका नाहीतर त्यांच्या बदल्या करा. माझ्या वॉर्डात पण खोदाई झालेली आहे त्याचा सुध्दा रोडारोडा झालेला आहे. नागरीकांना त्रास होतो काहींचे ॲक्सीडेंट होतात. टुव्हीलरवाले पडतात, तरी राडारोडा उचलण्याची ज्यांची जबाबदारी आहे ती त्यांनी करावी.

**मा.रामदास बोकड -**  मा.महापौर मॅडम, सर्व नगरसेवक, मा.सभागृह. कच-याच्या संदर्भात बोलायचजर झालतर आयुक्त साहेब मी आपल्याला विनंती करतो की आपल्या मुख्यालयामध्ये

दंडवते साहेबांकडे आरोग्याचा कार्यभार दिलेला आहे प्रत्येक प्रभागावरती त्यांचा आंकुश आहे की नाही हे बारकाईने परिक्षण करण्याची गरज आहे. आरोग्य अधिका-यांनी सर्व प्रभागावरती बारकाईने लक्ष दयायला पाहीजे. आरोग्याचा विषय हा शहराचा महत्वाचा विषय आहे. गेल्या महीन्यामध्ये माझ्याकडे डेंग्यूचे चार ते पाच पेशंट सापडले आपल्या ड प्रभागामध्ये आरोग्याचे जे अधिकारी आहेत त्यांना आम्ही वारंवार सूचना देतो. याठिकाणी आता झामाताई बोलल्या, प्रशांत शितोळे बोलले. ज्या संस्था आहेत त्या संस्थेवरती आपल्या अधिका-यांचा आंकुश आहे का हे पहील आयुक्त साहेब आपण तपासून पाहील पाहीजे. त्या संस्थेचा असणारा मनमानी कारभार. नागरीक आम्हांला सांगतात की सकाळी ९ वाजता जी गाडी त्याठिकाणी जायला पाहीजे ती गाडी दुपारी ३ ला आणि ४ ला जाते. नागरीकांना सवय लागलेली आहे की त्यांना जो वेळ बांधुन दिलेला आहे त्या वेळेलाच गाडी जायला पाहीजे व त्याप्रमाणे नियोजन व्हायला पाहीजे. सांगायला कागदावर आहे की एका प्रभागात पाच गाडया असतात पण कार्यवाहीत मात्र एकच गाडी असते. चार गाडया कुठ गायब असतात हे अधिका-यांनाही माहीत नसतं आणि संस्थेलाही माहीत नसतं. ज्या संस्थेनी काम घेतल त्या संस्थेची तर एवढी हिम्मत झाली त्यांना जर विचारल का रे बाबा कच-याच्या गाडया नाहीत तर तो नगरसेवकांना डायरेक्ट उत्तर देतो माझ काम नाही, माझा काम फक्त लेबर पुरवायच आहे. बाकीच नियोजन करायच काम आपल्या प्रशासनाच आहे. असं काही आपल प्रशासनाच ठरलेल आहे का. संस्थेला काम देताना काही नियम अटी लावलेल्या आहेत का नाही. मनमानी कारभार संस्थेवाले करतात. ना त्याच्याकड एसआय लक्ष देत ना आरोग्य अधिकारी लक्ष देत. शेवटी नगरसेवकांनाच कच-याची गाडी आली, नाही आली, नागरीकांचा कचरा घेतला ते नगरसेवकांनाच बघाव लागतं. अधिकारी मात्र पगार घेण्यापुरते. आरोग्याच्या संदर्भात सभागृहाचा कल बघा. केवळ कचरा न उचलल्यामुळे सगळीकडे कचराच कचरा शहरामध्ये आहे. रोज पेपरला फोटो येतात. एका बाजूने आपण ॲवॉर्ड घेतो आणि एका बाजूने कच-याचे असे. आयुक्त साहेब मला विनंती करायची आहे आपण संस्थेवरती बंधन ठेवा आम्हांला ते काम करताने त्रास होतो. संस्थेच्या लोकांचा मनमानी कारभार झालेला आहे आणि आपले प्रशासन उघडया डोळयानी बघतयं हे मला या सभागृहामध्ये प्रामुख्याने सांगायच आहे तरी या विषयी आपण काळजी घ्यावी आणि संस्थेवरती आंकुश ठेवा. जेणेकरुन शहरामधील रस्त्यावरती नागरीक कचरा टाकणार नाहीत याची काळजी घ्या.

**मा.राजेंद्र जगताप -** मा.महापौर मॅडम, सर्व नगरसेवक, मा.सभागृह. खरंतर कच-याची परिस्थिती आमचे पिंपळेगुरव आणि प्रभाग क्र. ५६ आणि ५७ अशी परिस्थिती आहे की ५६ आणि ५७ हा प्रभाग ड मध्ये येतो आणि कचरासंकलन जे आहे ते क मध्ये येते. ते क मध्ये असल्यामुळे इकडचा कचरा तीकड टाकु देत नाहीत असं आम्हांला वेळोवेळी ऐकायला मिळतं. कारण दंडवते साहेबांना ज्या वेळेस फोन करावा लागतो त्यावेळेस कचरा तीकड टाकू दिला

जातो. तरी आपण लक्ष दयाव. कचरा कशामुळे एवढा साचतो कारण क मध्ये कचरासंकलनमध्ये टाकू दिला नाहीतर असे होते. आपण पुण्याचा कचरा पिंपरी चिंचवड शहरात टाकू देत नाहीत. आपण एकच आहोत क आणि ड हे पिंपरी चिंचवड शहरातच आहेत कचरासंकलन तिथ असताना तो आपल्याला टाकू दिला जात नाही म्हणून आपल्याकडे कचरा जास्त तसाच राहतो. त्यासाठी दंडवते साहेब आपण साहेबांशी चर्चा करा. नगरसेवकांचे काही प्रॉब्लेम असतीलतर आम्ही चर्चा करु. तरी ड प्रभागाचा कचरा हा क प्रभागामधील कचरासंकलनामध्ये घ्यायला पाहीजे याची अपण दखल घ्या.

**मा.सुरेश म्हेत्रे -** मा.महापौर मॅडम, सर्व नगरसेवक, मा.सभागृह. मला या संदर्भात एकच सुचना करायची आहे की, आपल्याकडे कच-याच्या गाडया आहेत त्याची अवस्था फार बिकट आहे. प्रभागस्तरावर भरपूर चर्चा यावर झालेल्या आहेत. स्क्रॅप करण्याच्या पध्दतीच काही गाडया झालेल्या आहेत त्यामुळे सर्व सदस्यांची ओरड आहे की गाडया प्रभागामध्ये कचरा घेण्यासाठी वेळेवर येत नाहीत. अनेक गाडया खराब झालेल्या आहेत तरी अपण या बजेटमध्ये त्यासाठी तरतूद करावी असे मी गावडे साहेबांना प्रभाग समितीमध्ये सांगीतल होतं. ते मोठया गाडया घेणार आहेत. आमच्याकडे छोटे छोटे रस्ते आहेत त्याठिकाणी हे करता येत नसेल याच गाडया जावु शकतील अशी परिस्थिती आहे. परंतु ज्या खरोखर स्क्रॅप झालेल्या गाडया आहेत त्या स्क्रॅप करा. रोज पन्नास गाडयामधुन दहा गाडयाच रोडवर असतीलतर कचरा उचलला जाणार नाही हे साहजीकच आहे म्हणून गाडया घेण्याकरिता आपण त्याबाबत कार्यवाही करावी. एवढच मला सांगायच आहे, धन्यवाद.

**मा.आर.एस.कुमार -** मा.महापौर मॅडम, सर्व नगरसेवक, मा.सभागृह. आठरा गाडयांची बॅटरी चोरी झालेली आहे. त्यामुळे पाच दिवस गाडया आम्हांला मिळाल्या नाहीत. प्रायव्हेट कंपन्यावाले बॅटरी चोरी गेलीतर दुस-या दिवशी बॅटरी फिक्स करतात आणि ताबडतोब कामावर पाठवतात. आपले पाच दिवस झाले, पहीला प्रश्न आहे तिथ सिक्यूरीटी होत का. त्या सिक्यूरीटी कडून तुम्ही पैसे वसूल केले का किंवा इन्शुरन्स मधुन ते पैसे वसुल केले का याबाबत ताबडतोब आपण निर्णय घ्यायला पाहीजे आणि दुस-या दिवशी गाडी रस्त्यावर यायला पाहीजे पण असं होत नाही. आता सांगीतल्या प्रमाणे अनेक गाडया जुन्या झाल्या आहेत. ड्रायव्हर गाडया कशाही चालवतात. त्या चांगल्याप्रकारे चालवल्यातर जास्त दिवस टिकणार. चुकीच्या पध्दतीने गाडया वापरतात आणि अशी चोरी व्हायला नाही पाहीजे. कारण तिथ सिक्यूरीटी आहे. एखादया गाडीच समजू शकतो पण आठरा गाडयाची बॅटरी चोरी झालेली आहे. दुसर म्हणजे या गाडयाना कॉन्ट्रॅक्ट देताना त्यच्यामध्ये घराघरातला कचरा, रस्त्याच्या साईडने झाडू मारुन तो उचलला पाहीजे. रस्त्याचे कडेला छोटेछोट ढिग असतात ते उचलत नाहीत. आपण झाडू आणि गटर साफ करण्यासाठी जे कॉन्ट्रॅक्ट दिलेल आहे त्यांना आपण मिनीमम वेजेस देतो परंतु ते लोक त्यांना मिनीमम वेजेस देत नाहीत. त्यांना आपण म्हणतो दहा हजार

आहेत. ॲक्च्यूली मिनीमम वेजेस म्हणजे ५० टक्के कस आहे, पीएफ कॉन्ट्रिब्यूशन, बोनस कॉन्ट्रिब्यूशन असं जे एक्स्ट्रा एक्सेस होते ते ३२ ते ५० टक्के असतं. तुम्ही जर त्या मिनीमम वेजेस वरती ३२ ते ५० टक्के नाही दिलतर मग कर्मचा-यांना किती पैसे मिळतात. मिनीमम वेजेस दहा हजार असेलतर त्यांना ४५०० हजार ते ५ हजार मिळतात. आपण पीएफ कॉन्ट्रिब्यूशन आणि ऑदर याच्यासाठी कॉन्ट्रॅक्टरला पैसे देत नसल्यामुळे कॉन्ट्रॅक्टर मिनीमम वेजेस देत नाही. आता त्यांनी युनीयन जॉईन केलेल आहे. आता युनियन मार्फत ते कोर्टात जाणार. आताच आपण १६ कोटीची केस हारलो ५६० कर्मचा-याच्या संदर्भात असेच हे कर्मचारी कोर्टात जातील आणि परत आपल्याला बोलन बसेल. त्यामुळे मला आपल्याला विनंती आहे की मिनीमम वेजेस देताना तुम्ही दहा हजार देत असालतर तो सहा हजारच देणार. त्या दहा हजारामधुनच तो हे कटींग करतो, त्याचे प्रॉफीट काढतो आणि ५० टक्के सॅलरी सुध्दा कामगारांच्या हातात जात नाही. मी आताच सांगतो एका केसमध्ये आपल्याला १६ कोटी फरक दयावा लागतो आणि हे सुध्दा कर्मचारी युनियन जॉईन करतात, युनियन जॉईन केल्यानंतर दोन तीन वर्षा नंतर असांच सुप्रिमकोर्ट आदेश देणार आणि परत तुम्हांला भूर्दंड बसणार आहे यामुळे या विषयावरती चर्चा करा आणि योग्य ते पेमेंट मध्ये वाढ करा. म्हणजे मिनीमम वेजेस देवून इन्डायरेक्ट वेजेस दया म्हणजेच त्यांना मिनीमम वेजेस मिळेल.

**मा.अनिता तापकीर -** मा.महापौर मॅडम, सर्व नगरसेवक, मा.सभागृह. आजतर आमच्याकडे कच-याची गाडीच आली नाही. मागच्यावेळेस तर आठ आठ दिवस कच-याच्या गाडया येत नव्हत्या. रोज लोक पोत्यांनी कचरा भरुन ठेवायचे. रोडने कचरा फेकला की कुत्रे तिथे येतात. कच-याच्या गाडयावाल्याकड शिट्टी सुध्दा नाही. मागच्या गल्लीबोळाच्या ज्या लाईनी आहेत तिथपर्यंत ती गाडी जात नाही मेन रोडलाच ती गाडी उभा राहते. शिट्टी वाजवून त्या लोकांचा कचरातरी घेतला पाहीजे. त्यामुळे लोक कुठतरी लांब कचरा नेऊन टाकतात. आताच झामाताईन सांगीतल त्याप्रमाणे वॉर्डात सुध्दा झाडूवाले कमी आहेत. जेव्हा आम्ही वॉर्डात जात असतो तेव्हा तिथ नागरीकांची अक्षरश: नागरीकांची ओरड असते की आमच्या इकड आठ आठ, पंधरा पंधरा दिवस झाडूवाले येत नाहीत. आणि आलेतरी व्यवस्थित काम करत नाहीत. त्या महीला झाडू मारला की कुठतरी विश्रांतीला बसतात. नागरीकांनी सांगीतल ईथ झाडू मारायचा राहीलातर ते त्यांना उलट उत्तर देतात. अशी आपली परिस्थिती आहे. पुर्ण शहराचा कच-याच्या बाबतीत खुप मोठा प्रॉब्लेम झालेला आहे. कच-याच्या गाडया दोन दोन दिवस चार चार दिवस येत नाहीत त्या रेग्यूलरतरी चालू कराव्यात एवढ मी सांगते आणि थांबते.

यानंतर सदर ठराव मतास टाकणेत आला असता-

अनुकूल- ८१ प्रतिकूल- ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

------

**मा.नंदा ताकवणे-** मा.महापौर साहेब, विषय क्रमांक ४ वर मी पुढील प्रमाणे ठराव मांडते.

ठराव क्रमांक - ८३३ विषय क्रमांक -४

दिनांक - १८/३/२०१६ विभाग - मा.आयुक्त

संदर्भ - १) मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.नरवि/कावि/पिं.गुरवाटे-८/६८८६/२०१५, दि.०१/१०/२०१५

२) मा.शहरसुधारणा समिती ठ.क्र. ५२ दि.१६/०२/२०१६

मौजे पिंपळे गुरव भागाची विकास योजना महाराष्ट्र शासन, नगरविकास विभाग, यांचेकडील अधिसुचना क्र.TPS/1893/1276/CR-1974/93/UD-13 दि. १८ सप्टेंबर १९९५ अन्वये शासनाकडून मंजूर करणेत आली आहे. सदर विकास योजनेनुसार मौजे पिंपळे गुरव येथील स.नं.७९ पैकी व ८० पैकी जागेत आरक्षण क्र.३५६, " प्राथमिक शाळा विस्तार " प्रस्तावित केलेले आहे. सदरचे आरक्षण डी.पी.रिपोर्टनुसार सुमारे १५००.०० चौ.मी. क्षेत्रावर आहे. प्रत्यक्षात मंजूर विकास आराखडयात दर्शविलेनुसार सदरचे क्षेत्र सुमारे २५००.०० चौ.मी. क्षेत्रावर असून त्यापैकी ५००.०० चौ.मी. क्षेत्रावर शाळा विकसित आहे. सदर आरक्षणाचे जागेपैकी सुमारे ९००.०० चौ.मी. क्षेत्र टि.डी.आर.च्या बदल्यात महानगरपालिकेच्या ताब्यात सद्यस्थितीत आलेले आहे. ताब्यात नसलेल्या क्षेत्रावर अनधिकृत बांधकामे आहेत. आरक्षणाचे उर्वरित क्षेत्र टि.डी.आर. किंवा खाजगी वाटाघाटीने मोबदला अदा करणेच्या बदल्यात महानगरपालिकेच्या ताब्यात मिळणेकरीता प्रयत्न करणेत आलेले आहे. सदर आरक्षण विकसित करणे आवश्यक असल्याबाबत स्थानिक प्रतिनिधी या विभागाकडे मागणी करीत आहे. त्यामुळे उर्वरित क्षेत्र भूसंपादनाने संपादीत करता येवु शकते. त्यामुळे सदर आरक्षण पूर्णपणे विकसित करता येईल. केंद्र शासनाने **" The Right to fair compensation and Transparency in land acquisition, Rehabilitation Resettlement Act 2013 "** हा नवीन भूसंपादन कायदा तयार केला असून दि. १ जानेवारी २०१४ पासून सदर कायदा अंमलात आला आहे. तरी उपरोक्त प्रस्तावित आरक्षणाखालील जमीन महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम १२६ व नवीन भूसंपादन कायदा अन्वये संपादन करणेकामी सदर आरक्षणाचा भूसंपादन प्रस्ताव मा.जिल्हाधिकारी, पुणे यांचेकडे पाठविणेस मान्यता देणेत येत आहे.

**मा.भारती फरांदे -** मा.महापौर साहेब, ठरावास अनुमोदन देते.

यानंतर सदर ठराव मतास टाकणेत आला असता-

अनुकूल- ८१ प्रतिकूल- ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

------

**मा.नंदा ताकवणे-** मा.महापौर साहेब, विषय क्रमांक ५ वर मी पुढील प्रमाणे ठराव मांडते.

ठराव क्रमांक - ८३४ विषय क्रमांक - ५

दिनांक - १८/३/२०१६ विभाग - मा.आयुक्त

संदर्भ :- १) मा.महापालिका आयुक्त यांचेकडील
जा.क्र.निवडणुक/१/कावि/४६/२०१६ दि.२०/०२/२०१६

मा.राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र यांच्याकडील पत्र क्र. माजअ-२०१५/प्र.क्र.५/का-१० दिनांक १४/१२/२०१५ तसेच मा. माहिती व जनसंपर्क अधिकारी राज्य निवडणूक आयोग यांचेकडील पत्र क्र. माजअ-२०१५/प्र.क्र.५/का-१० दिनांक ०८/०१/२०१६ पत्रान्वये भारत निवडणूक आयोग व राज्य निवडणूक आयोग यांचे कार्यक्षेत्र, अधिकार शक्ती व दर्जा इ. बाबत माहिती कळविली आहे.

मा.राज्य निवडणूक आयुक्त यांच्या आदेशानुसार सदर पत्र माननीय लोकप्रतिनिधीना (खासदार/आमदार) पत्र पाठविण्यात आलेले आहे. सदर पत्रामध्ये विषयासंदर्भात स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका लोकसभा / विधानसभेप्रमाणे निर्भय, मुक्त व पारदर्शक वातावरणात पार पाडण्यासाठी १९९२ मध्ये भारतीय संविधानामध्ये दुरुस्ती करुन प्रत्येक राज्यामध्ये स्वतंत्र राज्य निवडणूक आयोग कार्यरत आहे.

मा.सर्वोच्च न्यायालयाच्या निरनिराळया निकालानुसार (प्रामुख्याने सिव्हिल अपिल क्रमांक-५७५६/२००५ श्री.किशनसिंग तोमर विरुध्द अहमदाबाद महानगरपालिका व इतर) राज्य निवडणूक आयोगाने दिलेले आदेश व सूचनांची अंमलबजावणी करणे राज्य शासनावर बंधनकारक आहे, असे असताना भारत निवडणूक आयोग व राज्य निवडणूक आयोग यांचे कार्यक्षेत्र, अधिकारी, शक्ती व दर्जा इत्यादीबाबत लोकांच्या मनामध्ये संभ्रम आहे. म्हणून याविषयीच्या काही ठळक मुद्दांबाबत वस्तुस्थितीवर नमूद पत्रामध्ये नमुद करण्यात येत आहे

भारत निवडणूक आयोग व राज्य निवडणूक आयोग यांचे कार्यक्षेत्र, अधिकार, शक्ती व दर्जा इत्यादींबाबतचे पत्र मा.नगरसदस्यांच्या माहितीसाठी सदरचा विषय ठेवणेत आला.

**मा.सुमन नेटके-** मा.महापौर साहेब, ठरावास अनुमोदन देते.

**(मा.डॉ.यशवंत माने (सहा.आयुक्त) यांनी मा.राज्य निवडणूक आयोग यांचे सचिव मा.प्रदिप व्यास यांचे पत्राचे वाचन केले.)**

यानंतर सदर ठराव मतास टाकणेत आला असता-

अनुकूल- ८१ प्रतिकूल- ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

------

**मा.नंदा ताकवणे-** मा.महापौर साहेब, विषय क्रमांक ६ वर मी पुढील प्रमाणे ठराव मांडते.

ठराव क्रमांक - ८३५ विषय क्रमांक - ६

दिनांक - १८/३/२०१६ विभाग - मा.आयुक्त

संदर्भ :- १) मा.महापालिका आयुक्त यांचेकडील जा.क्र.आरोग्य/२/कावि/१४४/२०१६ दि.०८/०३/२०१६

देशातील सर्व शहरां मधील नागरिकांना स्वच्छ पर्यावरण व चांगले आरोग्य मिळावे या करीता शहरांना स्वच्छतेची आणि या शहरातील व सर्व नागरिकांना शौचालयाची सुविधा उपलब्ध करून देण्याचे ध्येय गाठण्यासाठी केंद्रशासनाने स्वच्छ भारत अभियान संपूर्ण देशामध्ये राबविण्याची घोषणा दि.२/१०/२०१४ पासून केलेली आहे. महाराष्ट्र शासनाने देखील केंद्र शासनाच्या “स्वच्छ भारत अभियान”च्या धर्तीवर राज्यामध्ये “स्वच्छ महाराष्ट्र अभियान (नागरी)” राबविणेबाबत नगर विकास विभाग, महाराष्ट्र शासन, शासन निर्णय क्र. स्वभाअ/२०१५/ प्र.क्र.२३/नवि/३४, दि.१५/५/२०१५ अन्वये कळविणेत आलेले आहे. तसेच या अभियानाचे अनुषंगाने केंद्र व राज्य शासनाचे हिस्स्याची रक्कम (अनुदान) क्र.स्वमअ-२०१५/प्र.क्र.४०/नवि-३४ दि.१४/८/२०१ अन्वये निर्गत करणेत आलेली आहे.

सदर अभियानाचे अनुषंगाने शहरातील ज्या कुटुंबाकडे स्वत:चे स्वतंत्र शौचालय नाही त्यांचेकरिता शौचालय उभारणेसाठी निधी उपलब्ध करून शहर हागंदारी मुक्त करणे (Open Defecation Free) हा या अभियानाचा मुळ उद्देश आहे. राष्ट्रीय जनगणना २०११ नुसार पिंपरी चिंचवड महानगरपालिका क्षेत्रातील एकूण११,६८४ कुटुंबे अभियानांतर्गत वैयक्तीक शौचालय उभारणी करीता निधी उपलब्ध करणे आवश्यक आहे. नगर विकास विभाग मंत्रालय, मुंबई -३२ यांचे कडील प्राप्त पत्र क्र.स्वमअ-२०१५/प्र.क्र.४०/नवि-३४, नगर विकास विभाग दि.१७/८/२०१५अन्वये सदर अभियानाचे अनुषंगाने केंद्र शासन व राज्य शासन यांचेकडून खालील प्रमाणे अनुदान प्राप्त झाले आहे.

**स्वच्छ महाराष्ट्र अभियान (नागरी) केंद्रशासन व राज्य शासन हिस्सा वाटप तक्ता**

| क्र | तपशील | केंद्र शासन अनुदान | राज्य शासन अनुदान |
|---|---|---|---|
| १ | वैयक्तिक घरगुती शौचालय | ८४,९६,०००/- | १,१७,५७,०००/- |
| २ | सामुदायिक शौचालय | ३४,६७,०००/- | ८,०९,०००/- |
| ३ | स्वच्छ महाराष्ट्रअभियानाचे ब्रँडिंग (माहिती, शिक्षण व | ५,९०,०००/- | १,३७,०००/- |

| | | | |
|---|---|---|---|
| | प्रसार आणि जन जागृती) | | |
| ४ | क्षमताबांधणी | १,५०,०००/- | ३४,०००/- |
| ५ | **एकूण** | **१,२७,०३,०००/-** | **२७,३७,००० /-** |
| | | **केंद्रशासन व राज्य शासन एकूणअनुदान** | **२,५४,४०,०००/-** |

वरील प्रमाणे प्राप्त अनुदान व मनपा हिस्सा यामधून प्रत्येक लाभार्थीस केंद्र शासनाचे र.रु ८०००/- , राज्य शासनाचे र.रु. ४०००/- व मनपा हिस्सा र.रु. ४०००/-याप्रमाणे वैयक्तिक घरगुती शौचालय बांधणेसाठी अनुदानाची रक्कम अदा करणेत येईल.

त्यानुसार सदर अभियान सुरु झालेपासून दिनांक२९/२/२०१६ अखेर प्रपत्र "अ " प्रमाणे कामकाज झालेले आहे.शासन निर्णय क्र. स्वभाअ/२०१५/प्र.क्र.२४९/नवि-३४,दिनांक १९/११/२०१५ अन्वये "नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांमधील स्वच्छ महाराष्ट्र अभियान (नागरी) च्या अंमलबजावणीचा आढावा घेण्याची बाब संबंधित नागरी स्थानिक स्वराज्य संस्थेच्या प्रत्येक महिन्याच्या सर्व साधारण सभेच्या विषय सूचीवर कायम स्वरूपी समावेश करून या विषयाचा सविस्तर आढावा सर्व साधारण सभेमध्ये घेण्यात यावा " असे कळविलेले आहे.

स्वच्छ महाराष्ट्र अभियान ( नागरी ) अंतर्गत महापालिकेने दिनांक २९/२/२०१६ अखेर केलेल्या कार्यवाहीची माहिती खालील प्रमाणे

**प्रपत्र “अ”**

| **महानगरपालिकेचेनाव** | | **पिंपरी चिंचवड महानगरपालिका** | **शेरा** |
|---|---|---|---|
| जिल्हा | | पुणे | |
| वैयक्तिक शौचालय बांधकामासाठी अर्ज केलेल्या कुटुंबांची संख्या | | ३६८६ | |
| केंद्र शासनाचे “स्वच्छ भारत अभियान”च्या संकेत स्थळावर अपलोड करणेत आलेल्या एकूण अर्जांची संख्या | | ३२३८ | |
| मंजूर अर्जांची एकूण संख्या | | १७५८ | |
| बांधकाम सुरु झालेल्या शौचालयांची संख्या | वैयक्तिक घरगुतीशौचालय | ९१४ | |
| बांधकाम पूर्ण झालेल्या | वैयक्तिक घरगुती | ४१७ | |

| | | | |
|---|---|---|---|
| शौचालयांची संख्या | शौचालय | | |
| बांधकाम सुरु झालेल्या शौचालयांची संख्या | सामुदायिक शौचालय | ६२ सीटस | |
| निर्गत करणेत आलेला पहिलाहप्ता | १५७७ लाभार्थी | GOI+GOM=९४.६२ लाख | GOI = २०००/-व<br>GOM=४०००/- हिस्सा |
| | | ULB =३१.५४ लाख | ULB =२०००/- हिस्सा |
| | **एकुण** | **१२६.१६लाख** | |
| निर्गत करणेत आलेला दुसरा हप्ता | १४८ लाभार्थी | GOI+GOM=८.८८लाख | GOI = २०००/-व<br>GOM=४०००/-हिस्सा |
| | | ULB =२.९६ लाख | ULB =२०००/- हिस्सा |
| | **एकुण** | **११.८४ लाख** | |

सबब, महापालिकेकडून राबविणेत येत असलेल्या स्वच्छ महाराष्ट्र अभियान (नागरी) अंमलबजावणीचा आढावा अवलोकन करणेत आला.

**मा.मंदा आल्हाट -** मा.महापौर साहेब, ठरावास अनुमोदन देते.

यानंतर सदर ठराव मतास टाकणेत आला असता-

अनुकूल- ८१ प्रतिकूल- ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

------

**मा.नंदा ताकवणे-** मा.महापौर साहेब, विषय क्रमांक ७ वर मी पुढील प्रमाणे ठराव मांडते.

ठराव क्रमांक - ८३६ विषय क्रमांक - ७

दिनांक - १८/३/२०१६ विभाग - मा.नगरसचिव

**मा. विधी समिती**

अ) दि.५/२/२०१६ चा सभावृत्तांत कायम करणेत येत आहे.

ब) दि.२५/२/२०१६ चा सभावृत्तांत कायम करणेत येत आहे.

**मा.मंदा आल्हाट -** मा.महापौर साहेब, ठरावास अनुमोदन देते.

यानंतर सदर ठराव मतास टाकणेत आला असता-

अनुकूल- ८१ प्रतिकूल- ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

------

**मा.नंदा ताकवणे-** मा.महापौर साहेब, विषय क्रमांक ८ वर मी पुढील प्रमाणे ठराव मांडते.

ठराव क्रमांक - ८३७ विषय क्रमांक - ८

दिनांक - १८/३/२०१६ विभाग - मा.नगरसचिव

**मा.महिला व बालकल्याण समिती**

अ) दि.२७/१/२०१६ चा सभावृत्तांत कायम करणेत येत आहे

ब) दि.१०/२/२०१६ व दि.१८/२/२०१६ चा सभावृत्तांत कायम करणेत येत आहे.

**मा.मंदा आल्हाट -** मा.महापौर साहेब, ठरावास अनुमोदन देते.

यानंतर सदर ठराव मतास टाकणेत आला असता-

अनुकूल- ८१ प्रतिकूल- ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

------

**मा.नंदा ताकवणे-** मा.महापौर साहेब, विषय क्रमांक ९ वर मी पुढील प्रमाणे ठराव मांडते.

ठराव क्रमांक - ८३८ विषय क्रमांक - ९

दिनांक - १८/३/२०१६ विभाग - मा.नगरसचिव

**मा.शहर सुधारणा समिती**

अ) दि.२/२/२०१६ व दि.४/२/२०१६ चा सभावृत्तांत कायम करणेत येत आहे.

**मा.मंदा आल्हाट -** मा.महापौर साहेब, ठरावास अनुमोदन देते.

यानंतर सदर ठराव मतास टाकणेत आला असता-

अनुकूल- ८१ प्रतिकूल- ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

------

**मा.नंदा ताकवणे -** मा.महापौर साहेब, विषय क्रमांक १० वर मी पुढील प्रमाणे ठराव मांडते.

ठराव क्रमांक - ८३९ विषय क्रमांक - १०

दिनांक - १८/३/२०१६ विभाग - मा.नगरसचिव

**<u>मा.क्रीडा, कला, साहित्य व सांस्कृतिक समिती</u>**

**अ)** दि.३/२/२०१६ चा सभावृत्तांत कायम करणेत येत आहे.

**ब)** दि.१७/२/२०१६ चा सभावृत्तांत कायम करणेत येत आहे.

**मा.मंदा आल्हाट -** मा.महापौर साहेब, ठरावास अनुमोदन देते.

यानंतर सदर ठराव मतास टाकणेत आला असता-

अनुकूल- ८१ प्रतिकूल- ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

------

**मा.भारती फारांदे -** मा.महापौर साहेब, विषय क्रमांक ११ वर मी पुढील प्रमाणे ठराव मांडते.

विषय क्रमांक - ११

दिनांक - १८/३/२०१६ विभाग - मा.आयुक्त

**संदर्भ -** १) मा.प्रशांत शितोळे, मा.किरण मोटे यांचा प्रस्ताव.
२) मा. क प्रभाग समिती सभा दि.२/३/२०१६ ठराव क्र.१६४
३) मा. क्षेत्रीय अधिकारी यांचे जा.क्र.कक्षे/कावि/४५/२०१६ दि.८/३/२०१६

पिंपरी चिंचवड शहराचे जुन्या हद्दीची सुधारित विकास योजना शासनानेदि.१८/९/१९९५ रोजीच्या अधिसूचनेद्वारे मंजुर केली.सदर विकास योजनेत मौजे सांगवी येथील स.नं.८३ पैकी व ८४ पैकी मधील क्षेत्र काही भाग अस्तित्वातील रस्त्यातील असून उर्वरित क्षेत्र निवासी विभागात समाविष्ठ आहे.तसेच सदर क्षेत्राचा काही भाग नदीच्या निळया व लाल पूर रेषेने बाधीत आहे.सदर जागा मुंबई-पुणे रस्त्यांपासून साधारणपणे १-२ कि.मी.अंतरावर आहे.सदर निवासी विभागातील जागा सदयस्थितीत अविकसित मोकळी आहे.सदर जागा पुणे व पिंपरी चिंचवड शहराच्या मध्यवर्ती ठिकाणी आहे याठिकाणी सिटी लेव्हलची काही सुविधा नागरिकांना विकसित करणे संयुक्तिक ठरेल व नागरिकांना सोईची होणार आहे.

सांगवी येथील सदरचे क्षेत्र हे १८.०० मीटर रुंदीचे रस्त्याच्या लगत आहे.सदर जागा महापालिका उपयोगासाठी व खुले क्रीडा संकुल **( Open Sports Complex)**योजनासाठी आरक्षित केल्यास शहरातील सर्व नागरिकांना मध्यवर्ती अशी सिटी लेव्हलची सुविधा उपलब्ध करुन देणे शक्य होईल. तसेच शहरातील हजारो नागरिकांनी याठिकाणी विविध उपक्रमांमध्ये सहभाग घेतला आहे.

सदर जागेवरील उत्तर-दक्षिण असणा-या १८ मी.रुंदीचे रस्त्यालगत शासनाच्या पाटबंधारे विभागाचे इमारतीचे उत्तर दिशेस इमारतीलगत पासून पाटबंधारे वसाहतीचे पंप हाऊसची जागा व इतरत्र मोकळया जागेत स्थलांतरीत करुन घेणेसह व त्याठिकाणी होणा-या मोकळया जागेसह या जागेलगत पुर्व-पश्चिम असा रस्ता व असणा-या नाल्यालगतची अंदाजे १८ एकर मोकळया जागेत नागरिकांना अत्यंत उपयुक्त होईल अशा स्वरुपाची आरक्षणे असणे व विकसित करणे अशी मागणी आहे.

म्हणुन पिंपरी चिंचवड महापालिकेच्या सुधारित मंजुर विकास योजनेतील मौजेसांगवी येथील स.नं.८३ पैकी व ८४ पैकी सुमारे १८ एकर मोकळया जागेत सार्वजनिक प्रयोजनासाठी आरक्षणे प्रस्तावित करण्यास महापालिका उपयोगासाठी व खुले क्रीडा संकुल **( Open Sports Complex)** या प्रयोजनासाठी आरक्षित करण्यास महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम,१९६६ चे कलम ३७ नुसार फेरबदलाची कार्यवाही पुर्ण करुन फेरबदलाचा प्रस्ताव शासनास सादर करण्याकामी आयुक्त, पिंपरी चिंचवड महानगरपालिका यांना प्राधिकृत करण्यास मान्यता देणेत येत आहे.

**मा.सुमन नेटके -** मा.महापौर साहेब, ठरावास अनुमोदन देते.

**मा.उल्हास शेट्टी -** मा.महापौर साहेब, मी पुढीलप्रमाणे उपसूचना मांडतो- पिंपरी चिंचवड मनपाच्या हद्दीतील मौजे सांगवी येथील सर्व्हे क्र. ८३ व ८४ मधील जागेत (सुमारे १८ एकर) म.प्रा.व न.अ. १९६६ चे कलम ३७ नुसार महापालिका प्रयोजनासाठी, खुले क्रिडा संकूल (Open Sports Complex) तसेच क्लब हाऊसचे प्रयोजनासाठी फेरबदल व्हावा. तसेच पिंपरी चिंचवड महानगरपालिकेचे जुन्या हद्दीबाबत प्रस्तावित असणा-या सुधारित विकास आराखडयामध्ये मनपा प्रशासनाने सदर जागेवरील महापालिका उपयोगासाठी, खुले क्रिडा संकुल व क्लब हाऊस करीता PLU मध्ये समावेश करणेस मान्यता देणेत यावी.

**मा.राजू मिसाळ -** मा.महापौर साहेब, उपसूचनेस मी अनुमोदन देतो.

**मा.राजेंद्र जगताप -** मा.महापौर साहेब, मी पुढीलप्रमाणे उपसूचना मांडतो- मौजे पिंपळे गुरव येथील स.नं. ४४, ४५ व ४६ पैकी जागेत मंजुर विकास योजनेतील आरक्षण क्र. ३४४ अ पार्कचे (उद्यान) आरक्षण आहे सदर आरक्षणाच्या जागेवर स.नं. ४४ पैकी जागेत विकास योजना मंजूर होणेपुर्वीची घरे आहेत. सदर घरे सर्वसामान्य कामगार वर्गाची आहेत. सदरचे आरक्षण

संपुर्णपणे विकसित केल्यास येथील नागरिकांना विस्थापित (बेघर) होण्याची वेळ येईल. सदर आरक्षणापैकी उपलब्ध मोकळी जागा ब-याच प्रमाणात आहे.

तरी स.नं. ४४ पैकी जागेत सुमारे १२ ते १५ कुटूंबाचे क्षेत्र व त्यांना जाणे-येणेसाठी आवश्यक रस्ता सोडून उर्वरित जागेत आरक्षणाचा विचार करावा. तसेच सदरचे क्षेत्र निवासी विभागात समाविष्ट करणेकामी महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ कलम ३७ नुसार फेरबदल करणेकामी हरकती व सुचना मागवून अंतिम निर्णय घेणेकामी सदरचा विषय पुढील कार्यवाहीकरिता व शासनास प्रस्ताव सादर करणेकरिता मा.आयुक्त पिं.चि.म.न.पा. यांना अधिकार प्रदान करणेस मान्यता देणेत यावी.

**मा.प्रशांत शितोळे -** मा.महापौर साहेब, उपसूचनेस मी अनुमोदन देतो.

**मा.भारती फरांदे -** मा.महापौर साहेब, उपसूचना स्विकारल्या आहेत.

यानंतर उपसूचनांप्रमाणेचा दुरुस्त ठराव मतास टाकणेत आला असता-

ठराव क्रमांक - ८४० विषय क्रमांक - ११

दिनांक - १८/३/२०१६ विभाग - मा.आयुक्त

**संदर्भ -** १) मा.प्रशांत शितोळे, मा.किरण मोटे यांचा प्रस्ताव.
२) मा. क प्रभाग समिती सभा दि.२/३/२०१६ ठराव क्र.१६४
३) मा. क्षेत्रीय अधिकारी यांचे जा.क्र.कक्षे/कावि/४५/२०१६ दि.८/३/२०१६

पिंपरी चिंचवड शहराचे जुन्या हद्दीची सुधारित विकास योजना शासनानेदि.१८/९/१९९५ रोजीच्या अधिसूचनेद्वारे मंजुर केली.सदर विकास योजनेत मौजे सांगवी येथील स.नं.८३ पैकी व ८४ पैकी मधील क्षेत्र काही भाग अस्तित्वातील रस्त्यातील असून उर्वरित क्षेत्र निवासी विभागात समाविष्ठ आहे.तसेच सदर क्षेत्राचा काही भाग नदीच्या निळया व लाल पूर रेषेने बाधीत आहे.सदर जागा मुंबई-पुणे रस्त्यांपासून साधारणपणे १-२ कि.मी.अंतरावर आहे.सदर निवासी विभागातील जागा सदयस्थितीत अविकसित मोकळी आहे.सदर जागा पुणे व पिंपरी चिंचवड शहराच्या मध्यवर्ती ठिकाणी आहे याठिकाणी सिटी लेव्हलची काही सुविधा नागरिकांना विकसित करणे संयुक्तिक ठरेल व नागरिकांना सोईची होणार आहे.

सांगवी येथील सदरचे क्षेत्र हे १८.०० मीटर रुंदीचे रस्त्याच्या लगत आहे.सदर जागा महापालिका उपयोगासाठी व खुले क्रीडा संकुल **( Open Sports Complex)**योजनासाठी आरक्षित केल्यास शहरातील सर्व नागरिकांना मध्यवर्ती अशी सिटी लेव्हलची सुविधा उपलब्ध करुन देणे शक्य होईल. तसेच शहरातील हजारो नागरिकांनी याठिकाणी विविध उपक्रमांमध्ये सहभाग घेतला आहे.

सदर जागेवरील उत्तर-दक्षिण असणा-या १८ मी.रुंदीचे रस्त्यालगत शासनाच्या पाटबंधारे विभागाचे इमारतीचे उत्तर दिशेस इमारतीलगत पासून पाटबंधारे वसाहतीचे पंप हाऊसची जागा व इतरत्र मोकळया जागेत स्थलांतरीत करुन घेणेसह व त्याठिकाणी होणा-या मोकळया जागेसह या जागेलगत पुर्व-पश्चिम असा रस्ता व असणा-या नाल्यालगतची अंदाजे १८ एकर मोकळया जागेत नागरिकांना अत्यंत उपयुक्त होईल अशा स्वरुपाची आरक्षणे असणे व विकसित करणे अशी मागणी आहे.

म्हणुन पिंपरी चिंचवड महापालिकेच्या सुधारित मंजुर विकास योजनेतील मौजेसांगवी येथील स.नं.८३ पैकी व ८४ पैकी सुमारे १८ एकर मोकळया जागेत सार्वजनिक प्रयोजनासाठी आरक्षणे प्रस्तावित करण्यास महापालिका उपयोगासाठी व खुले क्रीडा संकुल **( Open Sports Complex)** या प्रयोजनासाठी आरक्षित करण्यास महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम,१९६६ चे कलम ३७ नुसार फेरबदलाची कार्यवाही पुर्ण करुन फेरबदलाचा प्रस्ताव शासनास सादर करण्याकामी आयुक्त, पिंपरी चिंचवड महानगरपालिका यांना प्राधिकृत करण्यास मान्यता देणेत येत आहे. तसेच पिंपरी चिंचवड मनपाच्या हद्दीतील मौजे सांगवी येथील सर्व्हे क्र. ८३ व ८४ मधील जागेत (सुमारे १८ एकर) म.प्रा.व न.अ. १९६६ चे कलम ३७ नुसार महापालिका प्रयोजनासाठी, खुले क्रिडा संकूल (Open Sports Complex) तसेच क्लब हाऊसचे प्रयोजनासाठी फेरबदल व्हावा तसेच पिंपरी चिंचवड महानगरपालिकेचे जुन्या हद्दीबाबत प्रस्तावित असणा-या सुधारित विकास आराखडयामध्ये मनपा प्रशासनाने सदर जागेवरील महापालिका उपयोगासाठी, खुले क्रिडा संकुल व क्लब हाऊस करीता PLU मध्ये समावेश करणेस मान्यता देणेत येत आहे. तसेच मौजे पिंपळे गुरव येथील स.नं. ४४, ४५ व ४६ पैकी जागेत मंजुर विकास योजनेतील आरक्षण क्र. ३४४ अ पार्कचे (उद्‌यान) आरक्षण आहे सदर आरक्षणाच्या जागेवर स.नं. ४४ पैकी जागेत विकास योजना मंजूर होणेपुर्वीची घरे आहेत सदर घरे सर्वसामान्य कामगार वर्गाची आहेत. सदरचे आरक्षण संपुर्णपणे विकसित केल्यास येथील नागरिकांना विस्थापित (बेघर) होण्याची वेळ येईल. सदर आरक्षणापैकी उपलब्ध मोकळी जागा ब-याच प्रमाणात आहे.

तरी स.नं. ४४ पैकी जागेत सुमारे १२ ते १५ कुटूंबाचे क्षेत्र व त्यांना जाणे-येणेसाठी आवश्यक रस्ता सोडून उर्वरित जागेत आरक्षणाचा विचार करावा. तसेच सदरचे क्षेत्र निवासी विभागात समाविष्ट करणेकामी महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ कलम ३७ नुसार फेरबदल करणेकामी हरकती व सुचना मागवून अंतिम निर्णय घेणेकामी सदरचा विषय पुढील कार्यवाहीकरिता व शासनात प्रस्ताव सादर करणेकरिता मा.आयुक्त पिं.चि.म.न.पा. यांना अधिकार प्रदान करणेस मान्यता देणेत येत आहे.

अनुकूल- ८१ प्रतिकूल- ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

------

**मा.नंदा ताकवणे -** मा.महापौर साहेब, विषय क्रमांक १२ वर मी पुढील प्रमाणे ठराव मांडते.

विषय क्रमांक - १२

दिनांक - १८/३/२०१६ विभाग - मा.आयुक्त

संदर्भ - १) मा.आयुक्त यांचेकडील जा.क्र.नावियो/२/कावि/१५१/२०१६
दि.१६/३/२०१६
२) मा.आयुक्त यांचेकडील जा.क्र.नावियो/२/कावि/१५२/२०१६
दि.१६/३/२०१६

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या नागरवस्ती विकास योजना विभागामार्फत विविध प्रकारच्या कल्याणकारी योजना राबविण्यात येतात. यामध्ये इ. १० वी १२ वी च्या गुणवंत विदयार्थ्यांना बक्षीस रक्कम योजना कार्यान्वित आहे. मा.महापालिका सभा ठराव क्र. ६०७ दि.२०/११/२०१४ अन्वये पिंपरी चिंचवड महानगरपालिका हद्दीत राहणाऱ्या व पिंपरी चिंचवड महानगरपालिका हद्दीतील खाजगी मान्यताप्राप्त विदयालयातील इ. १० वी १२ वी च्या विदयार्थ्यांना खालीलप्रमाणे बक्षीस रक्कम देण्यात येते.

१. इ. १० वी मध्ये ८५% ते ९०% गुण प्राप्त विदयार्थी र.रु.१००००/-
२. इ. १० वी मध्ये ९०% पेक्षा जास्त गुण प्राप्त विदयार्थी र.रु.१५०००/-
३. इ. १२ वी मध्ये ८५% पेक्षा जास्त गुण प्राप्त विदयार्थी र.रु. १००००/-

परंतु या योजनेच्या मंजूर धोरणानुसार जे विदयार्थी पिंपरी चिंचवड महानगरपालिका हद्दीत वास्तव्यास आहेत परंतु शिक्षणासाठी पिंपरी चिंचवड महानगरपालिका हद्दीबाहेरील शाळेत जात आहेत असे विदयार्थी या योजनेत लाभापासून वंचित रहात आहेत. हे गुणवंत विदयार्थी लाभापासून वंचित राहू नये म्हणून जे विदयार्थी पिंपरी चिंचवड महानगरपालिका हद्दीत वास्तव्यास असून पिंपरी चिंचवड महानगरपालिकेची विद्‌यालये वगळता इतर कोणत्याही विदयालयात शिक्षण घेत असलेल्या इ. १० वी १२ वी च्या विद्‌यार्थ्यांना या योजनेचा लाभ देण्यास मान्यता देणेत येत आहे.

**मा.भारती फरांदे -** मा.महापौर साहेब, ठरावास अनुमोदन देते.

**मा.आशा शेंडगे -** मा.महापौर साहेब, मी पुढीलप्रमाणे उपसूचना मांडते पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या हद्दीबाहेर शाळेत शिक्षण घेत असलेले जे विदयार्थी आहेत सन २०१५-१६ या आर्थीक वर्षात ज्यांनी अर्ज केला आहे त्यांना सुध्दा या योजनेचा लाभ मंजूर करुन अर्थसहाय्य देण्यात यावे.

**मा.मंगलाताई कदम -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. आताचा जो विषय दिलेला आहे तो पुण्यातील लोकांना किंवा पुणे जिल्हयातील लोकांसाठी तर नाहीनां हा. आताचा १ के चा विषयच तो आहे.

**मा.प्रशांत खांडकेकर (सहा.आयुक्त)** - मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. हा जो विषय १ के खाली आला आहे. आपल्याकडे जो मुळ ठराव झाला होता त्याला अमेन्डमेंट आपण सुचवलेली आहे. पीसीएमसी हद्दीच्या बाहेरच्या ज्या स्कुल आहेत त्याच्यामध्ये जे शिक्षण घेणारे विदयार्थी होते त्यांच्यासाठी आपल्याला ही योजना एक्सटेन करण्यासाठी आपण हा १ के खालचा प्रस्ताव सादर केलेला आहे. परंतु ज्यावेळेला आपण हा असा प्रस्ताव ठेवल्यानंतर मागच्या अपात्र अर्जाना लागू करायचा असेलतर आम्ही प्रशासन म्हणून देवू शकत नाही, उपसूचना दिल्यास करु.

**मा.प्रशांत शितोळे -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहब, सन्मा.सभागृह. विषय अतीशय चांगला आहे, पिंपरी चिंचवड शहरातल्या विशेषत रोख रक्कमा ज्या दिल्या त्यामध्ये अशी एक जाणीव झाली की, कुठल्याही शाळेत असलातरी त्याला गुण अतीशय चांगले आहेत जो आपल्या बक्षीस पात्र झालेला आहे तो आपला मतदार आहे, शहराचा नागरीक आहे तो त्या बक्षीसापासून वंचीत राहीला त्यामुळे मी अतीशय चांगल्या प्रकारची सुचना आहे.

मी पुढीलप्रमाणे उपसूचना मांडतो- पिंपरी चिंचवड मनपा हद्दीबाहेरील शाळेत शिक्षण घेत असलेल्या ज्या विद्यार्थ्यानी सन २०१५-१६ या आर्थिक वर्षात लाभ मिळणेकामी अर्ज केलेला आहे. त्यांना सुध्दा या योजनेच्या मंजूर धोरणानुसार बक्षिस रक्कमेचा लाभ मिळणेस मान्यता देणेत यावी तसेच सदर योजनेमध्ये अर्जदार विदयार्थ्यांना पात्र करुन घेणे, नव्याने अर्ज घेवून मनपा हद्दीतील विदयार्थ्यांना व हद्दीबाहेरील विदयार्थ्यांना पात्र करुन येणा-या प्रत्यक्ष खर्चास व पुन्हा प्रक्रिया तातडीने राबविणेस मान्यता देणेत यावी.

**मा.उल्हास शेट्टी -** मा.महापौर साहेब, उपसूचनेस मी अनुमोदन देतो.

**मा.नंदा ताकवणे -** मा.महापौर साहेब, उपसूचना स्विकारली आहे.

यानंतर उपसूचनेप्रमाणेचा दुरुस्त ठराव मतास टाकणेत आला असता-

ठराव क्रमांक - ८४१ विषय क्रमांक - १२

दिनांक - १८/३/२०१६ विभाग - मा.आयुक्त

संदर्भ - १) मा.आयुक्त यांचेकडील जा.क्र.नावियो/२/कावि/१५१/२०१६
दि.१६/३/२०१६
२) मा.आयुक्त यांचेकडील जा.क्र.नावियो/२/कावि/१५२/२०१६
दि.१६/३/२०१६

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या नागरवस्ती विकास योजना विभागामार्फत विविध प्रकारच्या कल्याणकारी योजना राबविण्यात येतात. यामध्ये इ. १० वी १२ वी च्या गुणवंत विदयार्थ्यांना बक्षीस रक्कम योजना कार्यान्वित आहे. मा.महापालिका सभा ठराव क्र. ६०७ दि.२०/११/२०१४ अन्वये पिंपरी चिंचवड महानगरपालिका हद्दीत राहणाऱ्या व पिंपरी चिंचवड महानगरपालिका हद्दीतील खाजगी मान्यताप्राप्त विदयालयातील इ. १० वी १२ वी च्या विदयार्थ्यांना खालीलप्रमाणे बक्षीस रक्कम देण्यात येते.

१. इ. १० वी मध्ये ८५% ते ९०% गुण प्राप्त विदयार्थी र.रु.१००००/-

२. इ. १० वी मध्ये ९०% पेक्षा जास्त गुण प्राप्त विदयार्थी र.रु.१५०००/-

३. इ. १२ वी मध्ये ८५% पेक्षा जास्त गुण प्राप्त विदयार्थी र.रु. १००००/-

परंतु या योजनेच्या मंजूर धोरणानुसार जे विदयार्थी पिंपरी चिंचवड महानगरपालिका हद्दीत वास्तव्यास आहेत परंतु शिक्षणासाठी पिंपरी चिंचवड महानगरपालिका हद्दीबाहेरील शाळेत जात आहेत असे विदयार्थी या योजनेत लाभापासून वंचित रहात आहेत. हे गुणवंत विदयार्थी लाभापासून वंचित राहू नये म्हणून जे विदयार्थी पिंपरी चिंचवड महानगरपालिका हद्दीत वास्तव्यास असून पिंपरी चिंचवड महानगरपालिकेची विद्यालये वगळता इतर कोणत्याही विदयालयात शिक्षण घेत असलेल्या इ. १० वी १२ वी च्या विद्यार्थ्यांना या योजनेचा लाभ देण्यास मान्यता देणेत येत आहे. तसेच पिंपरी चिंचवड मनपा हद्दीबाहेरील शाळेत शिक्षण घेत असलेल्या ज्या विद्यार्थ्यांनी सन २०१५-१६ या आर्थिक वर्षात लाभ मिळणेकामी अर्ज केलेला आहे. त्यांना सुध्दा या योजनेच्या मंजूर धोरणानुसार बक्षिस रक्कमेचा लाभ मिळणेस मान्यता देणेत येत आहे तसेच सदर योजनेमध्ये अर्जदार विदयार्थ्यांना पात्र करुन घेणे, नव्याने अर्ज घेवून मनपा हद्दीतील विदयार्थ्यांना व हद्दीबाहेरील विदयार्थ्यांना पात्र करुन येणाऱ्या प्रत्यक्ष खर्चास व पुन्हा प्रक्रिया तातडीने राबविणेस मान्यता देणेत येत आहे.

अनुकूल- ८१ प्रतिकूल- ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

-----

**मा.महापौर**- सर्वांचे आभार मानून आजची सभा संपली असे जाहीर करणेत येत आहे.

(धराडे शकुंतला भाऊसाहेब)
**महापौर**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११०१८

पिंपरी चिंचवड महानगरपालिका
नगरसचिव कार्यालय
क्रमांक - नस/९/कावि/१५४/१६
दिनांक - ७/४/२०१६



**नगरसचिव**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी – ४११ ०१८.

प्रत - सर्व संबंधित शाखाप्रमुख व शाखाधिकारी यांजकडे पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी रवाना.